**अरुणोदय ज्ञान प्रसारक मंडळ संचलित,**

**कला, वाणिज्य व गृहविज्ञान महिला महाविद्यालय, जळगाव**

**यु. जी. सी. अनुदानित**

# लघु शोध प्रकल्प

**(Mnor Research Project)**

**:: विषय ::**

# कॉ. शरद पाटील यांच्या निवडक वैचारिक लेखनाचा अभ्यास

**-: संशोधक :-**

**(Principal Investigator)**


**डॉ. प्रकाश घनशाम कांबळे**

(एम.ए.,एम.,फिल.,नेट.,पीएच.डी.)
साहाय्यक प्राध्यापक ,मराठी विभाग
अरुणोदय ज्ञान प्रसारक मंडळ संचालित,
कला,वाणिज्य व गृहविज्ञान महिला महाविद्यालय, जळगाव.


**: वर्ष :**

**ऑक्टोबर - २०२०**

# -: प्रमाण पत्र :-

प्रमाणित करण्यात येते की, **प्रा.डॉ.प्रकाश घनशाम कांबळे** हे अरुणोदय ज्ञान प्रसारक मंडळाच्या कला, वाणिज्य व गृहविज्ञान महिला महाविद्यालयात मराठी विषयाचे साहाय्यक प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. त्यांनी **'कॉ.शरद पाटील यांच्या निवडक वैचारिक लेखनाचा अभ्यास'** या विषयावरील यु.जी.सी.अनुदान प्राप्त लघुशोध प्रकल्प (M. R. P.) स्वतंत्रपणे पूर्ण केलेला असून तो यापूर्वी कोठेही प्रकाशित केलेला नाही. सदर लघु शोध प्रकल्प (M. R. P.) स्वीकारण्याची मी शिफारस करते.

**डॉ. जयश्री नेमाडे**
प्राचार्या
कला, वाणिज्य व गृहविज्ञान
महिला महाविद्यालय, जळगाव

ठिकाण : जळगाव

दिनांक :

# -: प्रतिज्ञा पत्र :-

प्रतिज्ञापूर्वक नमूद करतो की, मी अरुणोदय ज्ञान प्रसारक मंडळाच्या कला, वाणिज्य व गृहविज्ञान महिला महाविद्यालयात मराठी विषयाचा साहाय्यक प्राध्यापक म्हणून कार्यरत असून. **'कॉ.शरद पाटील यांच्या निवडक वैचारिक लेखनाचा अभ्यास'** या विषयावरील यु. जी. सी. अनुदान प्राप्त लघुशोध प्रकल्प (M. R. P.) सादर करत आहे. सदर लघु शोध प्रकल्प मी स्वतंत्रपणे पूर्ण केलेला असून तो यापूर्वी कोठेही प्रकाशित केलेला नाही. संशोधनासाठी वापरण्यात आलेल्या इतर आधारभूत संदर्भ ग्रंथाची नोंद योग्य त्या ठिकाणी करण्यात आलेली आहे.

ठिकाण : जळगाव

दिनांक :

**डॉ. प्रकाश घनशाम कांबळे**
(संशोधक)
कला, वाणिज्य व गृहविज्ञान
महिला महाविद्यालय, जळगाव

# -: ऋणनिर्देश :-

वैचारिक लेखन ही आता माझी प्राथमिक गरज झालेली आहे. मी एम.ए.ला असताना लोकसाहित्य आणि वैचारिक साहित्य असे दोन पर्याय उपलब्ध असताना आम्हा साठ विद्यार्थ्यांपैकी केवळ दोघांनी वैचारिक साहित्याचा पर्याय निवडला होता त्यापैकी मी एक होतो. तेव्हापासून आपल्या चिंतनाचाच विषय हा आपल्या पदवीचाही असावा याची दक्षता मी घेत आलो आहे. म.जोतिराव फुले यांच्या अखंड रचनेवर एम.फिल साठी प्रबंधिका सदर केली तेव्हाच डॉ.रावसाहेब कसबे आणि तत्सम विचारवंताच्या लेखनावर पीएच.डी करावयाचे निश्चित केले होते. त्याचे पर्यवसन म्हणजे '१९६० नंतरचे वैचारिक साहित्यः एक अभ्यास (विशेष संदर्भः कुरुंदकर,भोळे,वाघमारे आणि कसबे)' या विषयावर २ जानेवारी २०१८ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने मला पीएच.डी. पदवी प्रदान केली. दरम्यानच्या काळात संदर्भ ग्रंथ म्हणून कॉ.शरद पाटील यांचा 'मार्क्सवाद-फुले-आंबेडकरवाद' हा ग्रंथ वाचनात आला होता.लघु-शोध (Minior Research Project) प्रकल्प टाकावयाचे निश्चित झाले तेव्हा कसलाही विचार न करता 'कॉ.शरद पाटील यांच्या निवडक साहित्याचा अभ्यास' असा विषय घेऊन विद्यापीठ अनुदान आयोगाकडे पाठवून दिला आणि प्रपोजल मंजूर झाले. सुरुवातीचे काही महिने कॉ. पाटलांच्या साहित्यावर आपल्याला प्रोजेक्ट मिळाला आहे याच्या अभिमानात आणि फुशारकीत गेले. पीएच.डी. च्या कामाला उशीर झाला असल्यामुळे प्राधान्यक्रमाने ते मार्गी लावणे आवश्यक होते. तसे ते लावलेही. नंतर कॉ. पाटील यांचे सर्व साहित्य जमा करून वाचायला सुरुवात केली, तेव्हा कोमात जायचे तेवढे बाकी उरले होते. आपले काही खरे नाही याने हबकून जायला झाले. हे काम आव्हानात्मक जरी असले, आपली कुवत नाहीं याची नम्र जाणीव जरी असली तरी यानिमित्ताने हे महत्त्वपूर्ण साहित्य वाचून होईल. भारतीय सांस्कृतिक इतिहासाची ओळख होऊन पुढील अभ्यासाची ती नांदी ठरेल, या नम्र भूमिकेतून यथाशक्ती हा प्रकल्प पूर्ण करावयाचे ठरवले. खूप उशीर झालाय ही अपराधी भावना मनात आहेच. तरीही हा लघु-शोध पूर्ण झाल्याचे समाधान आणि त्याला आपण न्याय देऊ शकलो नाहीं याची अस्वस्थ सल हृदयात आहेच. समाधानापेक्षा सल अधिक खोलवर आहे. पुढे याच विषयावर तपशीलात जात अभ्यास करेपर्यंत ही वेदना राहणारच आहे. पुढच्या अभ्यासाला ती कायम प्रेरणा देत राहील याची मला खात्री आहे. हा लघू-शोध पूर्ण करत असताना अनेकांचे

सहकार्य मिळाले त्यांचे आभार मानने त्यांना आवडणार नाहीं. मात्र त्यांच्या नावाचा उल्लेख केल्याशिवाय या संशोधनाला पूर्णत्व येणार नाही असे मला वाटते. आमच्या संस्थेचे अध्यक्ष मा. प्रा. ए. पी. चौधरी, सचिव मा. प्रा.बी.एम.महाजन हे मान्यवर आम्हा सर्व प्राध्यापकांना विविध प्रकारच्या संशोधनासाठी नेहमीच प्रोत्साहन देत असतात. माझा हा प्रकल्प मंजूर झाला प्रसिद्ध समीक्षक डॉ.किसान पाटील प्राचार्य असण्याच्या काळात आणि पूर्ण होतोय डॉ.जयश्री नेमाडे प्राचार्या असताना. मध्ये डॉ.संजय भारंबे प्राचार्य असताना या कामाला वेळ देता आला नाही. या सर्वानीच मला खूप सहकार्य केले. या  विषया संदर्भात चळवळीमधील अनेक मित्रांशी झालेल्या चर्चा फार उपयोगाच्या ठरल्या, त्यामध्ये प्रामुख्याने प्रा.अनिल माने, प्रा.सुमेध रणवीर, प्रा.सुमीत वाघमारे, प्रा.बाळासाहेब कटारे, प्रा.माधव पाटील डॉ.अशोक काकडे, डॉ.विनोद उपर्वट यांच्या नावाचा उल्लेख करावा लागेल. चळवळ ही माझी उर्जा आहे. मात्र त्यासाठी हवा तितका वेळ देता येत नाही याची खूप वेदना आहे. तरीही यथाशक्ती योगदान देण्याचा माझा प्रयत्न असतो. ज्यांच्यामुळे माझी येथील परिवर्तनवादी चळवळीतील असंख्य कार्यकर्त्यांशी ओळख झाली ते बहुजन क्रांती मोर्च्याचे मा.मुकुंद भाऊ सपकाळे, लोकसंघर्ष मोर्च्याच्या अध्यक्षा मा.प्रतिभाताई शिंदे, बी. एस. पी. बामसेफचे आणि इतरही परिवर्तनवादी चळवळीतले असंख्य कार्यकर्ते या सर्वाचा मी कृतज्ञतापूर्वक उल्लेख करतो. चळवळ माणसाला सतत उर्जस्वल ठेवण्याचे काम करत असते. नव्हे; ती जीवनरस पुरवत असते, नवे वाचायला/ लिहायला / बोलायला प्रवृत्त करत असते म्हणून उपरोक्त  व्यक्तींचा उल्लेख मला आवश्यक वाटतो. आमचे मित्र प्रा.सुनील वाघमारे यांनी मला अनेकवेळा दुर्मीळ ग्रंथ उपलब्ध करुन दिलेले आहेत त्याचबरोबर डॉ.सतीश जाधव, डॉ.सोमनाथ लोकरे डॉ.संजय रणखांबे या माझ्या मित्रांनी या प्रकल्पासाठी फार मोलाचे साहाय्य केले. मी अडचणीत असलो की, ती सोडवण्यासाठी माझा प्रिय मेव्हणा मनोज(बंटी) क्षणार्धात हजर असतो.खरेतर यापैकी कोणालाच त्यांचे आभार मानलेले आवडणार नाहीत म्हणून केवळ  त्यांचे स्मरणच करतो. आणि माझ ी आई जिला आम्ही  'बाय' म्हणतो. चोवीस तास बाईच्या Micro Observation खाली राहणे फारच जिकीरीचे आहे. तिला कितीही रागावले तरी तिचे प्रेम अजिबात कमी होत नाही. माझी प्रिय पत्नी मीनाक्षी हिच्याबद्दल काय लिहावे. ती शब्दातीत आहे. माझा प्रिन्स आणि साऊसह माझ्या सर्व भावंडांचाही यावेळी उल्लेख करतो, कारण ही सर्व माणसं माझी उर्जा आहेत. सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे विद्यापीठ अनुदान आयोग नवी दिल्ली आणि डब्लू. आर. ओ. पुणे या संस्थाप्रती मनापासून कृतज्ञता व्यक्त  करुन झालेल्या

दिरंगाईबद्दल दिलगिरी व्यक्त करतो. शेवटी आमचे सन्मित्र दीपक दलाल सर यांच्याप्रती मनपूर्वक कृतज्ञता व्यक्त करतो कारण त्यांनी आगदी कमी वेळेत या संशोधन प्रबंधाचे अचूक असे डीटीपी करुन देऊन फार मोलाचे काम केले आहे.

**डॉ. प्रकाश घ.कांबळे**
**संशोधक**

# -: अनुक्रमणिका :-


| अ.क्र. | विवरण | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| **प्रकरण- १** | प्रास्ताविक | **१ - ९** |
| **प्रकरण- २** | दास शूद्राची गुलामगिरी : अन्वयार्थ | **१० - २४** |
| **प्रकरण- ३** | जाति व्यवस्था सामंती सेवकत्व : अन्वयार्थ | **२५ - ४८** |
| **प्रकरण- ४** | रामायण महाभारतातील वर्ण संघर्षाचा अन्वयार्थ | **४९ - ६८** |
| **प्रकरण - ५** | समारोप | **६९ - ७३** |
| | संदर्भसूची | **७४ - ७६** |

# प्रकरण - पहिले

# प्रास्ताविक

कॉम्रेड शरद पाटील भारतीय तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रातील एक अनन्यसाधारण असे नाव. तत्त्वज्ञान, प्राच्चविद्या ही विशिष्ट अशा वर्गाची मक्तेदारी असण्याच्या काळात शरद पाटलांनी तिथे केवळ शिरकावच केला नाही तर अथक परिश्रमाच्या जोरावर थक्क व्हावे अशी प्रतिभा कमवून त्या क्षेत्रावर आपल्या नावाची ठसठशीत अशी मद्रा उमटवली अर्थात आपण प्राच्चविद्या पंडित व्हावे अथवा तत्त्वज्ञांनी होऊन महान तत्त्ववेत्ता म्हणून मिरवण्यासाठी म्हणून कॉ. शरद पाटलांनी हा अट्टहास केला असे मात्र अजिबात नाही. या देशातील शूद्रातिशूद्राचा इतिहास हा गुलामीचा राहिलेला आहे. ही गुलामी अनेक पाताळ्यांवरची आहे. वर्ग-वर्ण-जात व स्त्री-पुरुष दास्य' ही तिची काही कांगोरे आहेत. हे दास्य निसर्ग निर्मित नव्हे; तर मनुष्यनिर्मित आहे. इतकेच नाही तर या गुलामीचा संस्कृतीचा भाग मानून तिला पावित्र्य प्रदान केल्यामुळे ती शतकानुशतके अबाधित राहील याचीही काळजी घेतली गेली. तिला हादरे देण्याचे काम चार्वाक- बुध्द-कबीर- शिवाजी- तुकाराम- पेरियार डॉ. आंबेडकर इत्यादी महापुरुषांनी केले आणि मानवमुक्तीचे नवे तत्त्वज्ञानही मांडले. तत्त्वज्ञानाच्या शस्त्रागाराशिवाय कुठल्याही चळवळीना व्यापक अधिष्ठान प्राप्त होत नाही. कारण कृती कार्यक्रमासाठी तत्त्वज्ञान ही अत्यावश्यक गरज असते. उपरोक्त महापुरुषांचे कार्य पुढे घेऊन जाणे ही आपली स्वत:ची जबाबदारी आहे असे कॉ. शरद पाटलांनी मानले आणि त्यासाठी स्वत:ला सर्व पातळ्यांवर सक्षम करण्याच्या आवश्यकतेतून एक लढवय्या कार्यकर्ता ते थोर प्राच्चविद्या पंडित व्हाया पुरोगामी चळवळीचा प्रखर नेता असा त्यांचा प्रवास झालेला आहे. सर्वसामान्य चळवळीमध्ये विचारवंत हे ग्रंथालयामध्ये बसून किंवा चार भिंतीच्या आत बसून आपले विचार प्रसवत राहत असतात आणि फारच झाले तर ते चळवळीसाठी थिंक टँक म्हणून काम करण्यात समाधान मानत असतात किंवा 'लेखन ही सुध्दा कृती असते' असे मानणारा वर्गही या क्षेत्रात मोठांच आहे. मात्र कॉ. शरद पाटील या महत्तम विद्वानाने आपल्या लेखनीचे शस्त्र तर केलेच

त्याचबरोबर रस्त्यावरच्या लढाईतही ते सर्वांच्या अग्रभागी राहीले. त्यांच्या या वेगळेपणाची नोंद घेतांना प्रसिध्द अभ्यासक रविन्द्र घोडराज म्हणतात, "ते शासनाच्या दडपशाही विरोधात लढत असतांना दुसरीकडे त्यांचे अभ्यास व संशोधन चालूच होते. दिवसा ग्रामीण, गोरगरीब व अतिशूद्रासाठी लढायचे आणि रात्री त्यांच्या देशाचा इतिहास जाणण्यासाठी पुस्तकांशी असा त्यांचा दिनक्रम चाले."[१] ग्रंथालयातील अभ्यासाला रस्त्यावरच्या लढाईची जोड दिल्याशिवाय कुठलेही व्यक्तिमत्त्व झळाळून उठत नाही हा जगभराचा इतिहास आहे. कारण समाज ही शहाणपणाची प्रयोगशाळा असते. समाजाचे नेमके दुखणे काय आहे समाजात गेल्याशिवाय कळत नाही आणि त्यावरील औषण ग्रंथालयाशिवाय इतरत्र सापडत नाही. निष्णात शास्त्रविशारद होण्याची ही पूर्वअट आहे. कॉ. शरद पाटील यांनी या दोन्हीच्या हृदयाशी आपली नाळ जोडून घेतली होती आणि ती त्यांच्या अखेरच्या श्वासापर्यंत अगदी घट्ट होती. आयुष्याच्या शेवटी सुध्दा ते म्हणाले होते, "माझं शरीर थकलं आहे पण मेंदू थकलेला नाही. मरण्या आधी मी पुस्तकाचा पाचवा खंड पूर्ण करुनच मरेन आणि मला मृत्यु सुध्दा एखादा लढा लढतांना रस्त्यावर यावा. घरात येऊ नये."[२] समाजा प्रतीची कमालीची तळमळ आणि विचारांवरची अविचल निष्ठा सर्वसामान्य कुटूंबात जन्मलेल्या शरद पाटील नावाच्या मुलाला क्रांतिकारी सत्यशोधक कॉम्रेड शरद पाटील बनवून गेली. एक असामान्य व्यक्तिमत्त्व निर्माण होण्यापाठीमागची कारणमीमांसा समजून घेतल्याशिवाय कॉ. शरद पाटील यांचे व्यक्तिमत्त्व आणि त्यांचे लेखनही समजून घेणे कठीण आहे. म्हणून त्यांची जडणघडण थोडक्यात समजून घेऊ.

**कॉम्रेड शरद पाटील यांची वैचारिक जडणघडण:-**

म. जोतिराव फुले यांच्या सत्यशोधक चळवळींची पार्श्वभूमी असलेल्या धुळ्यातील सत्यशोधक कुटुंबात १७ सप्टेंबर १९२५ रोजी शरद पाटील यांचा जन्म झाला. "शिक्षण विभागाचे सुपरवायझर असलेले त्यांचे वडील तानाजी तुकाराम पाटील (भामरे) हे जिल्ह्यातील पहिल्या पिढीतील सत्यशोधक होते; तर बडोद्याचे जागृतिकार पाळेकर आईकडील नात्याकडून आजोबा लागत."[३] त्यामुळे बालपणापासूनच त्यांच्यावर सत्यशोधकी संस्कार झाले. म. फुले

यांच्या विचाराचे बालपणापासूनच संस्कार म्हणजे चेतणे, पेटणे आणि बंडखोरी करणे हे अपरिहार्यच म्हणावे लागेल. मात्र केवळ विचारांच्या व संस्काराच्या वारशाने माणसे महान बनतात हे पूर्ण सत्य नाही. दिशा भरकटत नाही असे मात्र अपरिहार्यपणे म्हणावे लागेल. त्यामुळे शरद पाटील यांची दिशा भरकटणे शक्यच नव्हते हे जरी खरे असले तरी त्यांनी या संस्काराला आणि वारशाला चिवट अशा व्यासंगाची जोड दिली. आवांतर वाचनामुळे भूमिका बनायला मोलाची मदत झाली. ध्येयवादाच्या व सामाजिक बांधिलकीच्या प्रेरणा तर बालपणापासूच मिळाल्या होत्या, नंतरच्या काळात त्या त्यांनी अधिक वाढवत नेल्या. शाळेत असतानाच त्यांनी संपूर्ण शेक्सपिअर व जिल्हा गरुड वाचनालयातील महत्त्वाची सर्व इंग्रजी पुस्तकं वाचून काढली होती. चित्रकलेची आवड असल्यामुळे त्यांनी एक वर्ष बडोद्याच्या कला भवनात पेंटींगला (१९४३) त्यानंतर मुंबई येथील सर जे.जे. स्कूल ऑफ आर्टस् मध्ये प्रवेश घेतला. तेथे तिसऱ्या वर्षाला असतांना राज्यव्यापी विद्यार्थी संपामुळे त्यांना शिक्षण अर्धवट सोडावे लागले.

**कम्युनिस्ट चळवळीचे आकर्षण आणि जीवनदायी कार्यकर्ता: पूर्ण विचारांती घेतलेला निर्णय-**

स्वातंत्र्यानंतरच्या पहिल्या पिढीवर जसा गांधी आणि डॉ. आंबेडकर यांचा फार मोठा प्रभाव जाणवत होता अगदी तसाच मार्क्सवादाचाही. मार्क्सच्या प्रभावाने सर्व जाती-धर्मातील तरुण प्रभावित झालेले होते. बालपणापासूनच व्यासंगी आणि विचारी असलेले शरद पाटीलही मार्क्सच्या या आकर्षणापासून अलिप्त सूटणे केवळ अशक्य होते. त्यातल्या त्यात धुळे जिल्हा तर चळवळीचे महत्त्वाचे केंद्र होते. अशातच १९४५ साली कम्युनिस्ट नेते नथुभाऊ पारोळेकर यांच्या निवडणुक प्रचारार्थ शाहीर दत्ता गव्हाणकर, शाहीर अमर शेख व शाहीर अण्णाभाऊ साठे या त्रिमूर्तिची धुळ्यात प्रचार सभा होती. ते त्या सभेला गेले असता या तिघा शाहीरांशी परिचय झाला. नंतरच्या काळात ते या कम्युनिस्ट चळवळीकडे अधिकाधिक झुकत गेले ते इतके की त्यांनी आपले शिक्षण थांबवले व १९४६ साली जीवनदायी कार्यकर्ते बनले. पाटलांचा हा निर्णय त्यांचे संपूर्ण जीवन बदलवून टाकणारा होता. त्यांचे भलेबुरे परिणाम त्यांना त्यांच्या पुढील आयुषत भोगावे लागणार होते.

शाहीर गव्हाणकरांच्या संपर्कातूनच त्यांचा जेष्ठ कम्युनिस्ट नेते बी. टी. रणदिवे यांच्याशी परिचय झाला. त्यांनी काढलेले रणदिवेंचे तैलचित्र बेहद आवडले होते. त्यांची इतरही चित्र रणदिवेंनी पाहिले. पाटलांची चित्रकलेची आवड लक्षात घेऊन रणदिवेंनी त्यांना मुंबईच्या हेडक्वार्टरला 'स्टाफ आर्टिस्ट' म्हणून काम दिले. मात्र वाचनाची आणि रस्त्यावरच्या आंदोलनाची उर्मी त्यांना स्वस्थ बसू देत नव्हती. परिणामी केवळ एका वर्षातच ते धुळ्यात परतले आणि गिरणी कामगार चळवळीचे काम सुरु केले. दरम्यानच्या काळात त्यांचे वाचन अधिकच वेगवान झाले होते. अभिजात अशा ग्रंथाच्या वाचनाने ते अधिकाधिक परिपक्व होत होते. त्यातूनच त्यांची स्वत:ची अन्वेषण पध्द्त विकसित होत होती व रस्त्यावरच्या आंदोलनात उतरुन ते स्वत:ला पुन्हा पुन्हा तपासूनही घेत होते.

**आंदोलने आणि तुरुंगवास : व्यक्तीमत्त्वाला पैलू पाडणाऱ्या प्रयोगशाळा:-**

कॉ.शरद पाटील यांनी हे व्रत आंधळेपणाने घेतलेले नव्हते तर संपूर्ण विचारांन्ती घेतलेला हा निर्णय होता. हा मार्ग फुलांच्या राशिंचा नव्हे तर खाच-खळगे अन् काटयाकुटयांचा आहे आणि आपण रक्तबंबाळ होणार याची त्यांना पूर्ण जाणीव होती. त्याचप्रमाणे हा मार्ग सत्याचा आहे याचीही खात्री होती. म्हणूनच कॉ.शरद पाटील यांनी ग्रंथावर आणि तत्त्वज्ञानावर जितके प्रेम केले तितकेच आंदोलन आणि कारागृहावरही. ते अनेक आंदोलनात अग्रभागी राहिले व तितक्याच खिलाडूवृत्तीने कारावासही भोगला. १८४५ साली झालेल्या पहिल्या देशव्यापी विद्यार्थी संपात ते सहभागी झाले होते. या संपानंतर त्यांनी आपले शिक्षण अर्ध्यावरच सोडले व जीवनदायी कार्यकर्ते बनले. त्यानंतर वाचन व आंदोलनाचा सिलसिला सुरु झाला तो आयुष्याच्या अखेर पर्यंत. १९४९ साली ते धुळ्याच्या कापड कामगारांच्या संपात सहभागी झाले होते. त्यामुळे त्यांना धुळे-नंदूरबार आणि नाशिक भागातून हद्दपार व्हावे लागले. हद्दपारी मोडून ते धुळे येथे परत आल्याने त्यांना धुळे कारागृहात ६ महिने सक्त मजुरीची शिक्षा भोगावी लागली. कारागृहातून सुटताच त्यांना पुन्हा हद्दपार व्हावे लागले. १९५५ साली गोवा-मुक्ती सत्याग्रह झाला. या सत्याग्रहातील सक्रीय सहभागामुळे त्यांना पोर्तुगीज पोलीसांचा मारही खावा लागला. मात्र शरद पाटलांनी त्याची कधीही पर्वा केली नाही. १९५६ साली उकाई धरणाचे

काम सुरु झाले. यामुळे विस्थापित होणाऱ्या धरणग्रस्तांचे मोठ्या प्रामणात हाल होणार होते. सामान्य माणसाविषयी कमालीची कळकळ असणारे कॉ. पाटील स्वस्थ बसणे शक्यच नव्हते. कॉ. पाटलांनी या धरणग्रस्तासाठीचा पहिला लढा उभारला. आचार्य अत्रे यांनी या लढ्याला पूर्ण पाठींबा दिला होता. या उकाईग्रस्तांसाठी ज्यात आदिवासींचा भरणा सर्वाधिक होतात. ज्यामुळे जवळपास ५० हजार आदिवासी देशोधडीला लागणार होते. शेवटचे शस्त्र म्हणून कॉ. पाटील "मे महिन्याच्या अखेरीस उकाई येथे १६ दिवसांच्या उपोषणाला बसले."[४] या उकाई चळवळवळीवर आचार्य अत्रे यांनी एक विशेषंकाही काढला होता. वन अतिक्रमणाच्या लढ्यामध्येही त्यांना अकोला कारागृहात स्थानबध्द व्हावे लागले होते. अर्थात् ते तुरुंगात असतानाही स्वस्थ बसत नव्हते, तर तेथील कैद्यांना मार्क्स आणि इतर तत्त्वज्ञानही समजावून सांगत असत. आणिबाणीच्या विरोधातला लढा असो की विद्यापीठ नामांतराचा या सर्व लढ्यामध्ये कॉ. पाटील योध्यासारखे अग्रभागी राहीले. त्यामुळे त्यांना अनेकवेळा जेलमध्ये जावे लागले. त्यांनी आपले जेलमध्ये जाणे एखाद्या पदकासारखे मिरवले आणि तिला त्यांनी प्रयोगशाळा ही बनवले होते म्हणूनच त्यांच्या विचाराचे अभ्यासक रविन्द्र घोडराज म्हणतात ते खरे आहे, ते असे "तुरुंग म्हणजे त्यांच्यासाठी अभ्यास शिबीराचे केंद्रच बनले होते."[५] या सगळ्या संघर्षांनी कॉ. पाटील तावून सुलाखुन निघत होते आणि जोडीला अव्याहत वाचन चालू होते. स्थान बध्दतेत असतांना त्यांनी मार्क्सवादावरचे सर्व वाङ्मय वाचून काढले होते. या सततच्या वाचनातून त्यांची बुध्दी अतिशय तीक्ष्ण झाली होती. ती इतकी की त्यांनी प्रत्यक्ष मार्क्सच्या चुकीवर बोट ठेवले. "तीन वर्षाच्या स्थान बध्दतेत त्यांनी कार्ल मार्क्सचा 'भांडवल' हा ग्रंथ समजून घेतला. चित्रमय टिपणे काढून पारायणे केली. दुसऱ्या खंडात मार्क्सने सोडवलेले गणित चुकीचे असल्याचे लक्षात येताच त्यांनी बी.टी. रणदिवेंना पत्र पाठवून खुलासा मागवला. "मार्क्स चुकला आहे. इतक्या खोलवर विचार कुणी केला नाही' रणदिवेचे उत्तर आले."[६] कार्ल मार्क्सने केलेल्या भारतीय चित्रणा संदर्भातही कॉम. पाटलांचे मतभेद होते. "भारताविषयीचे विवरण वाचत असतांना त्यांना मार्क्सच्या मर्यादाही लक्षात येत गेल्या. भारतीय समाज व इतिहास हा मार्क्सच्या तोकड्या लिखाणावरुन समजून घेता येणार नाही."[७] कार्ल मार्क्स यांनी

न्यूयार्क डेली ट्रिब्यून मध्ये इ.स.१८५३ साली भारतापुढील समस्येचा विचार करणारी लेखमाला लिहिली होती हे खरे आहे. मात्र ते तोकडे होते असे जे पाटील म्हणतात ते खरेच आहे. मात्र या तोकडेपणाची मीमांसा करत असातंना डॉ. रावसाहेब कसबे यांनी जे मत नोंदवले आहे तेही आपणाला लक्षात घ्यावे लागेल. "कार्ल मार्क्स हे भारतीय समाजाचा विचार आशियाई समाजाच्या व्यापक पार्श्वभूमीवरच करत होते हे स्पष्ट आहे."[८] रावसाहेबांचा हा प्रतिवाद बरोबर असला तरी कॉ.पाटलांना झापडबंदपणा मान्य नव्हता यातून पूर्णपणे बाहेर येऊन त्यांनी या विषयावर स्वतंत्रपणे लेखन करावे असे ठरवले. तयांच्या या क्रांतिकारी लेखनाची नोंद आपण घेणारच आहोत. तत्पूर्वी त्यांनी स्थापन केलेल्या पक्षाविषयी...

**सत्यशोधक कम्युनिस्ट पक्षाची स्थापना:-**

कॉ. शरद पाटलांचा पिंड हा क्रांतिकारी योध्दयाचा होता. ते केवळ अकॅडामिशियन नव्हते. केवळ विव्दान म्हणून मिरवण्यासाठी ते प्रयत्नाची पराकाष्ठा करत नव्हते तर आपल्या ज्ञानाचा उपयोग समाज बदलासाठी / क्रांतिसाठी झाला पाहिजे यासाठी ते आपले ज्ञान पणाला लावत होते. केवळ ग्रंथालयात बसून आणि ग्रंथ लिहून क्रांती होणार नाही याची त्यांना खात्री होती. त्यामुळेच ते सन १९४६ साली जीवनदायी कम्युनीस्ट बनले. रस्त्यावरचा संघर्ष आणि स्वत:ची तात्त्वीक बैठक वाढवणे या दोन्ही गोष्टी ते समांतरपणे करत होते. भारतीय समाजाची संस्कृती आणि इतिहास मुळापासून समजून त्याचा अन्वयार्थ लावायचा असेल तर वैदिक वाङ्मय मुळ संस्कृतमधून वाचायला हवे यासाठी त्यांनी वैदिक संस्कृत शिकण्यासाठी ते १९६६ साली बडोद्याला गेले. बडोद्याच्या वास्तव्यात त्यांनी पहिले वर्ष सेंट्रल फॉर सोशल स्टडीज या संस्थेत संशोधनासाठी घालवले. त्यानंतर दुसऱ्या वर्षी पंडित विद्याभास्कर मणिशंकर उपाध्याय यांच्या मार्गदर्शनाखाली वर्षभर संस्कृत (पाणिनी) व्याकरणाचे अध्ययन केले मात्र शरद पाटील ज्या कम्युनिस्ट पक्षामध्ये काम करत होते. त्यातील उच्चवर्णियांच्या दृष्टीने शरद पाटील घेत असलेल्या ज्ञानाचा शोध द्रोह होता. अधिक्षेप होता. "चळवळीच्या हमालीत आनंद न मानता शरद पाटील इतिहासातज्ज्ञ बनायचा उपद्व्याप करतो आहे. असे म्हणून त्यावेळी माकप च्या नेत्यांनी त्यांचा उपहास केला होता."[८] मात्र शरद पाटील यामुळे कधीही हतोत्साहित झाले

नाहीत आणि आपणा सर्वांना हे माहितच आहे की कॉ.शरद पाटलांनी हा आपल्या ज्ञान शोधाचा प्रवास महान प्राच्य विद्यापंडित ही उपाधी मिळवे पर्यंतच नव्हे तर शेवटच्या श्वासापर्यंत चालू ठेवला. सततच्या संघर्षातून आणि वाचन लेखनातून कॉ. शरद पाटलांची दृष्टी व्यापक झाली होती. भारतीय समाजातले 'जात' हे वास्तव आहे आणि या जातीला भेदल्याशिवाय या देशात क्रांती केवळ अशक्य आहे, हे त्यांनी जाणले होते. मात्र कॉ. पाटील ज्या कम्युनिस्ट चळवळीमध्ये काम करत होते ती चळवळ आणि पक्ष जात हे वास्तव मानायला तयार नव्हता. तो वर्गांताची भूमिका मांडत होता. कॉ. पाटलांचे अनेक मुद्यावर त्यांच्याशी मतभेद असले तरी 'जात' हा त्यातला कळीचा मुद्दा होता. पक्षाने जातिव्यवस्था विरोधातला लढा उभारायलाही नकार दिला. "या सर्व पार्श्वभूमीवर अखेर त्यांनी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचा राजीनामा देऊन आपल्या सहकाऱ्यांसमवेत 'मार्क्सवाद-फुले आंबेडकरवाद ह्या विचारावर अधिष्ठित 'सत्यशोधक कम्युनिस्ट पक्षा'ची १९७८ मध्ये स्थापना केली." अमुलाग्र क्रांतीसाठी कॉ. पाटलांनी निर्माण केलेला हा स्वतंत्र रस्ता होता. तर स्वत:च्या लेखणीतून व वाणीतून क्रांति तत्त्वज्ञान निर्माण करुन या देशातील बहुजनांच्या हाती क्रांतीचे शस्त्र देण्याचे कामही केले.

**शरद पाटील यांचे क्रांतिकारी साहित्य:-**

केवळ रस्त्यावरील संघर्षाने क्रांती होत नसते. जोडीला क्रांती तत्त्वज्ञानाचीही नितांत आवश्यकता असते. आपल्या मुळांचा शोधही आवश्यक असतो म्हणजे सिंहावलोकन करुन पुढे जाण्याचा मार्ग नि:संक होत असतो. या सर्व गोष्टींचे भान प्राच्यविद्यापंडित कॉ. पाटील यांना असल्यामुळे त्यांनी आपल्या लेखनाच्या माध्यमातून संस्कृती उत्खननाचे ऐतिहासिक असे काम केले. ज्यामुळे प्रस्थापित हादरुन गेले. सचिन माळीच्याच शब्दात सागांयचे तर "प्राच्यविद्या-पंडित कॉ. शरद पाटील यांनी महाराष्ट्राच्या विचारविश्वात आपल्या वैचारिक योगदानाने भुकंप उभे केले. प्राचीन भारताचा इतिहास अभ्यासाची नवीन संशोधन पध्दती पुढे आणली आणि जाति वर्चस्ववादी पितृसत्ताकता यांच्या प्रभावातून इतिहास लेखनास मुक्त केले. समाज परिवर्तक प्रवाहाच्या हाती नवी विचार साधने दिली. एक नवा इतिहास घडविला. भारतीय प्रबोधनाचे शस्त्रागार अभ्यासकांना दिले."[११] हे भारतीय प्रबोधानाचे शस्त्रागार महणजे त्यांची

क्रांतिकारी अशी ग्रंथ संपदा ती खालीलप्रमाणे-

**ग्रंथ संपदा:-**

दास शूद्रांची गुलामगिरी भाग १ व २, रामायण महाभारतातील वर्ण संघर्ष, जातिव्यवस्थाक सामंती सेवकत्व, शिवाजीच्या हिंदवी स्वराज्याचे खरे शत्रू कोण? महमंद की ब्राह्मणी? जात्यान्तक भांडवलदारी लोकशाही क्रांती व तिची समाजवादी पूर्ती (इंग्रजी व मराठी), प्रिमिटिव्ह कम्युनिझम, मातृसत्ता स्त्री सत्ता आणि भारतीय समाजवाद (इंग्रजी व मराठी खंड)

**काही महत्त्वाची पुस्तके-**

अब्राह्मणी साहित्याचे सौंदर्यशास्त्र, 'मार्क्सवाद फुले-आंबेडकरवाद', 'भारतीय तत्त्वज्ञान व नास्तीक मत', 'बुध्द- भारतीय इतिहासातील लोकशाही, स्वातंत्र्य व समतेचा अग्निस्रोत', 'पश्चिम भारतीय स्वायत्त, आदिवासी राज्याची भूमिका', 'नामांतर औरंगाबाद आणि पुण्याचे', 'स्त्री शूद्राच्या स्वराज्याचा राजा' (नाट्यसंहिता), 'शोध मुलनिवासींचा की शूद्र वर्णाचा की जात्यान्तक समतेचा?' 'बुध्द भिक्कु आनंद, धम्म-आनंद- वधू विशाखा.'

**शोषितांच्या मुक्तीचं तत्त्वज्ञान उभारणाऱ्या लढवय्याची अखेर:-**

'माझं शरीर थकलं आहे पण मेंदू थकलेला नाही. मरण्या आधी मी माझ्या पुस्तकाचा पाचवा खंड पूर्ण करुनच मरेन.', 'मला मृत्यू एखादा लढा लढतांना रस्त्यावर यावा. घरात येवू नये.' हे दोन्ही विधानं प्राच्यविद्यापंडित कॉ. शरद पाटील यांचीच आहेत. पहिलं विधान ज्ञानाची असीम भूक असलेल्या तत्त्वज्ञानी विचारवंताचं आहे; तर दुसरे विधान सर्वहाराच्या बाजूने रस्त्यावर उतरुन संघर्ष करणची न थकणारी उर्मी असलेल्या लढवय्याचे आहे. आयुष्यभर दुहेरी संघर्ष करणाऱ्या, शोषितांच्या मुक्तीचे तत्त्वज्ञान उभारणाऱ्या लढवय्याच्या या दोन्ही अपेक्षा मात्र पूर्ण होऊ शकल्या नाहीत. एकोणनव्वद (८९) वर्षाचे प्रदिर्घ आयुष्य मिळालेल्या कॉ. शरद पाटील यांचे निधन १२ एप्रिल २०१४ रोजी त्यांच्या राहत्या घरी धुळे येथे झाले आणि अवघा महाराष्ट्र सुन्न झाला. जयभिम। लाल सलामच्या गजराबरोबर त्या अलोट गर्दीने कॉ. शरद पाटील अमर रहे चा उद्‌घोष केला तेव्हा संपूर्ण धुळे स्तब्ध झाले होते.

**संदर्भ:-**

१) सत्यशोधक कॉम्रेड शरद पाटील, (संपा.) चव्हाण रमेश, हर्मिस प्रकाशन, पुणे, पृ.क्र.२३.

२) नरे-पवार संध्या, चित्रलेख, २८ एप्रिल २०१४ चा अंक, पृ.क्र.२०, उद्धृत.

३) उनि, पृ. क्र.१७

४) उनि, पृ. क्र. २१

५) तत्रैव, पृ. क्र.२१

६) तत्रैव, पृ. क्र.२२

७) तत्रैव, पृ. क्र.२२

८) कसबे रावसाहेब भक्ती आणि धम्म, लोकवाङ्मय गृह, मुंबई, पृ.क्र.३५४

९) उनि, पृ.क्र.२२

१०) तत्रैव, पृ.क्र.

११) माळी सचिन, एकाकी आणि लोकाकी प्रज्ञासूर्य कॉ. शरद पाटील, सुगावा प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती २०१४, पृ.क्र.०२.

## प्रकरण - दुसरे

# दास शूद्राची गुलामगिरी : अन्वयार्थ

कॉम्रेड शरद पाटील यांनी आयुष्यभर भारतीय संस्कृतिचे आणि इतिहासाचे उत्खनन केले. भारतीय दार्शनिक संघर्षाचा चिकित्सक वेध घेऊन इथल्या मार्क्सवादी चिकित्सेलाही प्रश्नांकित करायला त्यांनी मागे-पुढे पाहिले नाही. मुळात भारतीय मार्क्सवादी पंडितांनी भारतीय हिंदु परंपरा व समाजरचना यांच्या चिकित्सक अभ्यासाकडे फार मोठ्या प्रमाणात दुर्लक्ष केल्यामुळे त्यांची चिकित्सा वास्तवभिमुख आणि वस्तुनिष्ठ होऊ शकली नाही. त्यामुळे भारतीय मार्क्सवाद इथे क्रांतीच्या प्रेरणा देऊ शकला नाही. भारतीय मार्क्सवाद्यांनी जातीच्या प्रश्नाचा फार गांभिर्याने कधी विचारच केला नाही. जात मिथ्य आणि वर्गच सत्य अशीच त्यांची भूमिका राहिली. युरोपपेक्षा भारतातील सरंजामशाही पध्दत अनेक पातळ्यावर वेगळी आहे याचा त्यांनी विचारच केला नाही. मार्क्सच्या 'पाया आणि इमला' या संकल्पनेचा त्यांनी चुकिचा अन्वयार्थ लावला. त्याचे मुख्य कारण भारतामध्ये मार्क्सवाद थ्रो ब्राह्मीण आला आणि इथल्या मार्क्सवादी चळवळीचे शीर्षस्थ नेतृत्व ब्राह्मणच राहिले. या सर्व गोष्टींचा प्रभाव मार्क्सवादी चिकित्सेवरही मोठ्या प्रमाणात झाला, हे नाकारता येत नाही. मुळचे आणि परकीय असा जगभरातल्या अनेक राष्ट्रांचा संघर्ष राहात आलेला आहे आणि मूळ लोकांचा सांस्कृतिक आणि दार्शनिक इतिहास नष्ट करण्याचाच अधिक प्रमाणात प्रयत्न झालेला आहे अथवा डोक्यावर तरी उभा केलेला आहे म्हणजेच तोडून मोडून पेश केलेला आहे. भारतात तर ते अधिकच प्रमाणात झालेले आहे. मूळ भारतीयांना क्रांतिसाठी आपल्या तत्त्वज्ञानाचा शोध घेऊन वर्तमान परिप्रेक्ष्यामध्ये अन्वयार्थ लावणे ही तातडीची गरजच असते कारण त्याशिवाय क्रांती दृष्टीक्षेपात येत नसते. प्रबोधनाची क्रांती ही राजकीय क्रांतीची पूर्व अट असते हे खरेच आहे. मात्र प्रबोधनाच्या क्रांतीसाठी आपले मूळ तत्त्वज्ञान आणि इतिहासाला आपल्या पायावर उभे राहणे आवश्यक असते. त्यासाठी चिकित्सक बुध्दीच असून चालत नाही तर प्रत्यक्ष रण मैदानामध्ये लढण्याचे धैर्यही असावे लागते. त्याशिवाय कुठलिही चिकित्सा अर्थवा तत्त्वज्ञान लोकाभिमुख

आणि क्रांतिभिमुख होऊ शकत नाही. कॉ. शरद पाटील यांच्याकडे ही दोन्ही सामर्थ्य असल्यामुळेच अब्राह्मणी तत्त्वज्ञान आणि त्यांचा सांस्कृतिक इतिहास उजळून काढला म्हणूनच त्यांच्या या अलौकिक कार्यकर्तृत्वाचा धांडोळा घेताना सुप्रसिध्द शाहिर सचिन माळी म्हणतात, "कॉम्रेड शरद पाटील यांनी त्यांच्या ज्ञानाला व्यवहाराशी जोडत आयुष्यभर जनलढ्याचे नेतृत्वही केले. जनता हीच त्यांची शिक्षक होती. त्यामुळे दिवसभर जनसंघर्षात व्यस्त राहणारे कॉम्रेड शरद पाटील रात्र जाळत जाति अंताचा सिध्दांत विकसित करण्यात व्यस्त राहिले. अप्तांनी घात केल्यावरही हा दार्शनिक खचला नाही. सरकारने तुरुंगवास घडवला तरी विझला नाही. तो लोकांना समर्पित होता, तो लोकाकी राहिला."[१]

आयुष्याच्या शेवटच्या क्षणापर्यंत ते लोकाभिमुख राहिल्यामुळेच त्यांना क्रांती दिसत होती. म्हणूनच ते सचिन व शितल माळी यांच्यासाठी बोलतांना म्हणाले होते, "दिग्नाग ही कोंडी फोडेल. मला क्रांती दिसत आहे ती जरुर येईल पण त्यासाठी पात्र आणि प्रामाणिक कॅडरची गरज आहे."[२] आणि शेवटी तेच झाले. अशाप्रकारचे प्रामाणिक व तळमळीचे कार्यकर्ते म.फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना भेटले नाहीत आणि जे आहेत ते भाबडे तरी आहेत किंवा भावनिक तरी. कॉ. पाटलांना तर या आघाडीवर अपयशाचाच सामना करावा लागला. याचा अर्थ त्यांनी मांडलेले सिध्दांत अथवा त्यांनी दिलेल्या वैचारिक योगदानाचे महत्त्व कमी महत्त्वाचे आहे असे नाही किंबहुना कुठलाही तत्त्ववेत्ता आपले तत्त्वज्ञान वर्तमानाबरोबरच भविष्य डोळ्यासमोर ठेवूनच मांडत असतो. म्हणून भविष्यातील पिढीने हे तत्त्वज्ञान नीटपणे समजून त्याचा जनसामान्य माणसाच्या उत्थानासाठी शस्त्र म्हणून वापर करायचा असतो.

**शोध : दास शुद्राच्या गुलामगिरीचा:-**

खरेतर आपल्या मूळांचा शोध घेणे ही सोपी गोष्ट नसते. स्वत:चेच उत्खनन करावे लागते. हे उत्खनन कमालीचे जीवघेणे असते. अफ्रो अमेरिकन (नीग्रो) ॲलेक्स हॅले या लेखकाने त्याच्या 'रुट्स' (Roots) या कादंबरीमध्ये अशाप्रकारे स्वत:चा शोध घेतलेला आहे. हा लेखक 'कुंटा-किंटो' या नायकाच्या माध्ण्यमातून आपली पाळंमुळं खणून काढतो आणि आपल्या मुळापर्यंत पोहोचण्यात यशस्वी होतो. या कादंबरीने जवळपास २०० वर्षाचा आवकाश

व्यापलेला आहे. तरीही ही कादंबरीच आहे, हे आपणाला विसरता येत नाही किंवा त्याकडे दुर्लक्ष करता येत नाही. कॉ. शरद पाटलांनी तयांच्या 'दास-शुद्राची गुलामगिरी' या ग्रंथाच्या माध्यमातून भारताच्या दोन-अडीच हजार वर्षातील इतिहासाचे, संस्कृतीचे आणि तत्त्वज्ञानाचे उत्खनन करुन या सगळ्यांवर भाष्य करणाऱ्या अनेक महापंडितांची चिकित्सा करत आपल्या मुळापर्यंत पोहोचण्यात यशस्वी झाले आहेत. आणि भारतीय चार्तुवर्ण्य व्यवस्थेने ज्यांना शुद्रातिशूद्र म्हणून घोषित करुन त्यांना आपले दास केले ते खरेच मूळचे शूद्र होते का? नसतील तर त्यांच्यावर कोणी शूद्रत्व लादत त्यांना गुलामासारखी वागणूक कोणी दिली याची तर्कशुध्द दृष्टीकोनातून मार्क्सवादी अन्वेषण पध्दतीने चिकित्सा केली. कॉ. पाटलांच्यापूर्वी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 'शूद्र पूर्वी कोण होते?' या ग्रंथामध्ये हा शोध घेतलेला आहे व कॉ. पाटलांनीही डॉ. बाबासाहेब आंबेडकरां संदर्भात गौरवोद्‌गार काढताना म्हटले आहे की, 'आंबेडकर हे पहिले शूद्र होते की, ज्यांनी १९४६ साली, देश स्वातंत्र्याच्या उंबरठ्यावर उभा असता, प्राचीन भारतीय इतिहासाला मूलभूत प्रश्न विचारला- 'शूद्र कोण होते? आणि त्याचे उत्तर द्यायचा गंभीर प्रयास केला.'[३] डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या ग्रंथामध्ये दोन प्रश्न उभे केलेले आहेत १) शूद्र पूर्वी कोण होते? २) आणि चौथा वर्ण म्हणून त्यांची गणना हिन्दी आर्य समाजात कशी करण्यात आली आणि या प्रश्नाची साररुपाने उत्तरे त्यांनी खालील प्रमाणे दिलेली आहेत.

१) सूर्यवंशाच्या ज्या आर्य जमाती होत्या त्यातील एका जमातीचे शूद्र होते.

२) एक काळ असा होता की, ज्यावेळी आर्य समाज फक्त तीन वर्ण म्हणजे ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य मानीत होता.

३) शूद्रांचा स्वतंत्र असा वर्ण नव्हता. हिंदी आर्य समाजातील क्षत्रिय वर्णाचा एक भाग असा शूद्रांचा दर्जा होता.

४) शूद्र राजे आणि ब्राह्मण यांच्यामध्ये एकसारखे झगडे चालू असत, या झगड्यांमुळे ब्राह्मणांवर अनेक अत्याचार आणि अपमानास्पद दुराचार करण्यात आले होते.

५) शूद्रांनी आपल्यावर अत्याचार व जुलूम केले ही जाणीव ब्राह्मणांच्या अंत:करणाला

एकसारख्या टोचण्या देत होती, म्हणून ब्राह्मण शूद्रांचा व्देष करु लागला व व्देषामुळे शूद्रांचे उपनयन करणचे ब्राह्मणांनी नाकारले.

६) शूद्रांना उपनयन नाकारल्यामुळे शूद्र आपल्या मूळच्या क्षत्रियपदापासून च्युत झाले व सामाजिक दृष्टीने त्यांची अधोगती झाली त्यामुळे त्यांचा दर्जा वैश्यांच्या खालचा झाला.

याप्रमाणे त्यांचा चौथा वर्ण उत्पन्न करण्यात आला. अशाप्रकारे राज्यकर्ते असलेल्या आणि क्षत्रियांचा एक भाग असलेल या समुदायाला ब्राह्मणांनी दुटप्पीपणाने मुंज नाकारुन शूद्र म्हणून घोषित केले. पेरियार वामस्वामी नायकार यांचाही असा युक्तिवाद होता की, "ब्राह्मणांनी द्रविडांचे सामाजिक अवमूल्यन केले आणि त्यांना अस्पृश्य ठरवले."[५] आम्ही डॉ.बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठात विद्यार्थी चळवळीत असतांना विद्यार्थ्यांसमोर भाषण करत असताना 'आम्ही उध्दवस्त राजपूत आहोत.' असे म्हटले की समोरील विद्यार्थी टाळ्यांचा कडकडाट करायचे. त्यांना ते मनापासून पटायचे. त्यावेळी बोलतांना हे विधान मी करायचो. मात्र त्याचा तपशील फार माहित नव्हता. डॉ. बाबासाहेबांचे 'हू वेअर शूद्राज' हा ग्रंथ त्यानंतर फार उशीरा वाचनात आला आणि कॉ. पाटलांचे लेखन तर आता आता वाचतोय. सर्व तरुणांना संस्कारशील वयात हा आपला सगळा इतिहास वाचता आला तर ही तरुणाई क्रांतिभिमुख झाल्याशिवाय राहणार नाही. डॉ. बाबासाहेब किंवा पेरीयार रामस्वामी नायकर यांनी जो भारतीय शूद्रत्वाचा बोध घेऊन निष्कर्श नोंदवले आहेत तसेच काहीशी भूमिका कॉ.पाटील यांनीही घेतलेली आहे. ती अशी 'प्राचीन भारताचे धन निर्माते- वरकड मालांच्या अर्थी दास व शूद्र होते. सुमारे ३००० वर्ष त्यांनी ऊर फुटेतो अखंडपणे श्रम केले त्या श्रमांनी जी महान प्राचीन भारतीय संस्कृती जन्माला घातली, व पोसली, तिनेच त्यांच्या गुलामगिरीच्या बेड्या घडवल्या व घट्ट केल्या. राज्संस्थेने त्यांना धुमस्त्या दास्यात दडपून ठेवले. धर्माने त्यांच्या दास्याच्या कर्म कहाणीचे संकिर्तन केले आणि तत्त्वज्ञानाने त्यांना या दु:खमय जगाच्या क्षणभंगुरतेचा व मिथ्यत्वाचा आणि त्या "आनंदमय जगाच्या शाश्वततेचा व सत्याचा साक्षात्कार घडवला."[६] या दास व शूद्र लोकांना आक्रमक परदेशी आर्यांनी पराभूत करुन गुलाम केले असे मानले जाते. पण आर्यपूर्व दासांची संस्कृती तुलनात्मक दृष्ट्या खुपच पुढारलेली होती आणि

पशुपालक आर्यांच्या टोळधाडी इ.पू. १७३० पासून भारतात शिरायला लागण्यापूर्वी निदान १००० वर्ष तरी ती भरभराटीत होती. हाडाप्पा आणि मोहेंजादाडो शहराच्या उत्खननातून ते पुरेसे स्पष्टही झाले आहे. आर्यपूर्व सिंधू संस्कृती किती सुजलाम-सुफलाम होती हे आपणा सर्वांनाच माहित आहे. हा सर्व समुह उत्पादक समुह होता. आर्य या अनुत्पादक समुहाने त्यांना केवळ शूद्रच नाही तर दासही अर्थात गुलामही केले. जगभरातल्या गुलामी संदर्भात आणि त्यांना मिळत असलेल्या अमानुषत्वपूर्ण वागणुकी संदर्भात इथल्या उच्चवर्णिय अभ्यासकांना उच्छवास काढतांना कंटाळा येत नाही. त्या संदर्भात आपली काही तक्रार नाही मात्र आपल्याच देशातील भुमिपुत्रांना गुलाम / दास म्हणून अनन्वीत अत्याचाराला समोरे जावे लागलतेय हे मात्र दिसत नाही किंवा ते फारच सुखावह वाटते. कसे ते पहा. "भारतात खिस्तपूर्व ४ थ्या शतकात दासप्रथा विशेष आढळून येत नव्हती, किंवा भारतात दासांना एवढे चांगले वागवले जात होते की, ग्रीसमधल्या दासपालनाला सरावलेल्या मेगॅस्थिनीनसारख्या परेदशी निरीक्षकाला वाटले की, या देशात दासप्रथाच नाही."[७] हे निरीक्षण कोणा साध्या-सुध्या अभ्यासकाचे नाही तर महामहोपाध्य पां. वा. काणे या अग्रग्रण्य पारंपरिक पंडिताचे आणि टिळकांच्या अनुयायाचे आहे. स्वत: टिळकांची भूमिकाही यापेक्षा वेगळी नव्हती. मात्र वस्तुस्थिती काय होती? शूद्र, अतिशूद्र किंवा अस्पृश्यतेसारख्या भयंकर अमानवी प्रथेबद्दल आपणा सर्वांनाच आता कमी-अधिक प्रमाणात माहिती आहे. वाचून / ऐकून अथवा इतरही माध्यमातून मात्र आपल्याकडेही ग्रीस, इंग्लड, अमेरिका अथवा आफ्रिकेसारखे माणसाला गुलाम केले जात होते त्यांची खरेदी विक्री केली जात होती हे मात्र कॉ. पाटलांनी विविध अभ्यासकांचा हवाला देऊन पहिल्यांदाच सिध्द केले आहे. गुलामगिरी प्रथेची भारतात काय वस्तुस्थिती होती "भारतातील दासप्रथेच्या अंताने (ज्याचा कायदेशीर अंमल १८४३ पासून सुरु झाला) आपल्याला काही मौलिक माहिती पुरवली आहे. दस्तऐवज सिध्द करतात की, दासप्रथा देशाच्या जवळ जवळ सर्व भागात प्रचलित होती, आणि तिला हिंदू धर्मशास्त्राची मान्यता असून तिचे अस्तित्व पूर्वापारपासूनचे आहे असे प्रत्येकजण समजत होता. वैदिक पांडित्यासाठी मध्ययुगीन काळापासून प्रख्यात असलेल्या मिथिलेच्या ब्राह्मणामध्ये ही संस्था प्रचलित होती असे दासांच्या खरेदीविक्रीच्या दस्तऐवजावरुन दिसून

येते."[८] तरीही पा. वा. काणे सारखे पंडित याकडे दुर्लक्ष करतात कारण स्पष्ट आहे की त्यांना पुनरुज्जीवनवादी प्रवाहच अधिक गतिमान करायचा असतो. बरे पां. वा. काणे हे पारंपरिक पंडित होते. त्यामुळे ते सत्याचा अपलाप करणारच हे एकवेळ आपण समजूही शकतो मात्र नुकतेच विशुध्द विज्ञानवादी लेखक अच्युत गोडबोले व अतुल कहाते यांच्या 'स्पार्टकिस ते ओबामा वर्णव्देषी गुलामगिरीचा अमानुष प्रवास' हे पुस्तक वाचले. त्यात त्यांनी जगभरातल्या या अमानुष प्रथेचा जीवाला चटका लावणारा वेध घेतला आहे. हे करण्यामागे त्यांची मानवतावादी अशीच भूमिका आहे. ती त्यांच्याच शब्दात अशी "'गुलाम' हा शब्द अलीकडे आपण फक्त पत्ते खेळतांना वापरतो; पण कित्येक शतके या शब्दानं मानवतेची निव्वळ थट्टा केल्याचा जागतिक इतिहास जाणून घेतला, की या शब्दामधली दाहकता आपल्याला समजेल. पुराणकाळापासून ते आजपर्यंतच्या गुलामगिरीच्या भीषण, दारुण, करुण, अमानवी, जुलमी, महाभयंकर, अत्याचारी इतिहासाचीही सुन्न करणारी सनसनाटी कहाणी आहे."[९] स्पार्टाका पासून बराक ओबामापर्यंतचा हा सगळा इतिहास कोणचीही मती गुंग व्हावी असाचा आहे, मात्र आपल्या पायाखाली काय आणि किती जळतय हे पां. वा. काणेपासून आजच्या अच्युत गोडबोले पर्यंतच्या अभ्यासकांना का दिसत नसेल? रामचरितमानस लिहिणारे तुलसीदास 'शूद्र, गवार, पशू और नारी यह सब ताडन के अधिकारी' असे म्हणतात तर "शतपथ ब्राह्मण' या धर्म ग्रंथामध्ये 'स्त्री, शूद्र, कुत्रा, कावळा हे असत्य आहेत. कोणीही त्यांच्याकडे पाहू सुध्दा नये."[१०] स्वत: पां. वा. काणे 'आद्य शंकराचार्याचा शूद्रव्देष्टा अद्वैती ब्राह्मणवाद भारतीय संघराज्याचे जवळजवळ शासकीय तत्त्वज्ञ ाान झालेले आहे' असे मान्य करतात. तरीही भारतात दासांना फार सन्मानाची वागणुक मिळणार होती असे ते म्हणतात याला काय म्हणावे? मात्र याला अपवाद असणाऱ्या एका भारतीय तत्त्ववेत्याचा फार गौरवपूर्ण उल्लेख कॉ. पाटील करतात. तो असा "आपले प्रकांड पांडित्य सेवेला जुंपून, माहितीच्या एकाही उपलब्ध स्रोताची उपेक्षा न करता, प्राचीन भारतातील दास प्रथेच्या मुळाशी गेलेले एकमेव विद्वान म्हणजे कालवश डॉ. देवराज चानना. प्राचीन भारतीय समाजाच्या आकलनाला त्यांनी दिलेली दैदिप्यमान अशी देणगी आहे."[११] देवराज चानना यांनी भारतात कशाप्रकारे दासप्रथा होती हे नि:संदिग्ध अशा शब्दात स्पष्ट केलेले आहे

ते याप्रमाणे, "आपणाला आढळते की, एका बाजूला असे प्रदेश (संघगण) आहेत की, जेथे एका सबंध जनविभागाला दास लेखले जाते, तर दुसऱ्या बाजूला असे प्रदेश (राज्यशासन) की, जेथे हे लक्षण दिसत नाही. संघगणामध्ये...पुरेशा पुराव्याभावीही, दासप्रथा जन्मसिध्द असल्याचे दिसते. या गणमुख्य्यांशी (Oligarchs) दास आहेत, ज्यांनी त्यांच्यासाठी राबलेच पाहिजे. या वस्तुस्थितीचा सर्वात मोठा पुरावा म्हणजे शेती हा त्यांचा मुख्य उद्योग धंदा / व्यापार असून तेवढा विकसित झालेला नाही.) जेथे सर्व काम दास व कर्मकारांकडून केले जाते. आम्हाला ना मूळ (पालि) ग्रंथांनी उल्लेखलेल्या ब्राह्मण ग्रामांचे (उदाहरणार्थ शाल्य जानपदासकी) अस्तित्व नाकारायचे आहे, ना असे सूचवायचे आहे की, हे ब्राह्मण शेतकरी शाक्यांचे दास होते. आम्हाला एवढेच म्हणयचे आहे की, या सामंत कुटुंबांना होणारा अन्नधान्याचा / तांदुळ, जव इ. पुरवठा स्वामींच्या मिळवणाऱ्या दासांच्या श्रमावर अवलंबून होता."[१२] अशाप्रकारे चानना या निष्कर्षाप्रत येतात की या संघगणची दास्यप्रथा गणदास पध्दतीची होती. कॉ. शरद पाटील यांनी विविध अभ्यासकांचे संदर्भ देत तिची जागा घेईपर्यंतचा वेध दासशूद्राची गुलामगिरी या ग्रंथामध्ये घेतलेला आहे. म्हणूनच डॉ. धर्मेन्द्रनाथ शास्त्री सारख्या नावाजलेल्या अभ्यासकाने युगप्रवर्तक क्रांती म्हणून या ग्रंथाचा गौरव केलेला आहे. रामायण महाभारत आणि बौध्द काळात असलेल्या महाभयंकर अशा दास प्रथा पध्द्तीचा कॉ. पाटलांनी अतिशय चिकित्सक पध्दतीने वेध घेतला आहे. या दोन्ही काळातील केवळ दोन उदाहरणे पाहू... पहिल्यांदा महाभारतामधील विदुर जातकामध्ये पुण्णकाने खुद्द विदुरालाच प्रश्न विचारला आहे, तो असा "कुरुंमध्ये (खरा) धर्मनिष्ठ माणूस कोण असेल तर तो विदुर आहे, असे देव जे सांगतात ते खरे आहे काय? लोकांत विदुर हे जे नाव आहे ते काय आहे? तू राजाचा दास आहेस की ज्ञातिजन आहेस?' विदुराने आपल्या उत्तराची प्रस्तावना त्यावेळी प्रचलित असलेल्या दासाचे चार प्रकार सांगून केली- "काही लोक देवस्थान जमिनीवरील दास असतात, काही पैशाने खरीदल्यामुळे दास होतात; काही भीतीच्यापोटी दास होतात.' लोकात दासाचे चार प्रकार प्रचलित आहेत. हे निश्चित आहे की मी जन्मजात दास आहे. राजाची वृध्दी होवो वा न होवो. मी सत्यापासून विचलित होणार नाही. कोठेही गेलो तरी मी राजाचा दासच राहीन म्हणून, ब्राह्मण युवका,

मला राजाने तुला देणे धर्मयुक्तच  ठरेल."[१३] संपूर्ण महाभारतामध्ये विदूर अतिशय विद्वान म्हणून मान्यता पावलेला आहे. हे इरावती कर्वे यांनीही त्यांच्या युगांत या अभिजात ग्रंथामध्ये स्पष्ट केलेले आहे . आणि कॉ. शरद पाटलांनी तर रामायण महाभारतातील वर्णसंघर्ष या सर्वोत्तम ग्रंथामध्येही हे दाखवून दिलेले आहे. "बुध्दाच्या काळात दासाची गावच्या गावे (दास गाम) होती."[१४] किंवा श्रीपाद अमृत डांगे म्हणतात, "माझ्या मते दासप्रथाक राज्ये बौध्दवादाच्या उदय व विकासापर्यंत भरभराटीत होती. बहुधा नंदाचे साम्राज्य (खिस्तपूर्व ४१३) त्या परंपरेतले शेवटचे राज्ये असावे."[१५] म्हणूनच पौराणिक परंपरा सांगत असावी की, नंदाबरोबर अस्सल क्षत्रिय कुलशसनाचा अंत झाला, मात्र तथागत गौतम बुध्द मानव मुक्तीचे महाकाव्य घेऊन आले आणि इथल्या दास्याला त्यांनी अतिशय शांतपणे सुरुंग लावला. बुध्दाने केलेली ही महत्तम क्रांती होती. मात्र येथील मार्क्सवाद्यांना किंवा ब्राह्मणी विचारवंतांना ती दिसणे शक्य नव्हते. 'बुध्द हा तत्त्वज्ञानी होता. त्याने भारतीय तत्त्वज्ञानात क्रांती केली, पण मार्क्सवादी पंडित देवीप्रसाद चटोपध्याय आणि डी. डी. कोसांबिनीही असे मानले नाही. प्रथमच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बुध्द हे समाजक्रांतीकारक होते हे मांडले. पण त्यांनी कोणती समाजक्रांती केली ते मांडले नाही. ते अंशत: डी. आर. चानना या पारंपरिक मार्क्सवाद्याने आपल्या 'प्राचीन भारतीय गुलामी प्रथा' या ग्रंथात १९६० साली मांडले. "भारतीय गुलामगिरी ही ग्रीस अगर रोम सारखी व्यक्तिगत मालकीची गुलामी नव्हती, तर ती वर्ण आणि सामाजिक गुलामगिरी होती. बुध्दाने आपल्या अनुयायांना पंचधम्माचा गुलामगिरी नष्ट करण्याचा कार्यक्रम दिला. भिख्खू आणि भिख्क्षूणी यांच्या मठाचा  संघ ही त्याची क्रांतीकारक पार्टी होती. तीने गुलामगिरी नष्ट करण्याचा कार्यक्रम अंमलात आणला."[१६] वर्ण दास गुलामी व्यवस्थेला नष्ट करणारी क्रांती करणे ही बुध्दाची ऐतिहासिक अशी कामगिरी होती. बुध्दाने आपल्या अनुयायांना नव्या उदयोन्मुख जातिव्यवस्थेविरोधी इशारा देत ती वर्णासारखीच नष्ट करण्याचा आदेश दिला होता. वासेटसुन्त या मन्झिमनिकायात त्याने म्हटले होते की, पशू आणि वनस्पती मध्येच जाती असतात,पण मानवी समाजात नसतात. कॉ. शरद पाटलांनी बुध्दाला क्रांतिकारक प्रबोधनाचा सर्वश्रेष्ठ शास्त्रज्ञ म्हणून गौरविले आहे. कवेळ इतकेच नव्हेतर तशाप्रकारची त्यांनी मांडणीही

केली आहे.

एकमात्र निश्चित की ही जी दासप्रथा होती ती पितृसत्ताक आणि मातृसत्ताक या दोन्ही कुटुंब पध्दतीमध्ये होती, हे कॉ. पाटील सप्रमाण सिध्द करतात मात्र या दोन्हीमध्ये काही एक प्रमाणात गुणात्मक फरक होता असे मानले जाते, तोही त्यांना मान्य नाही. पाटील पुढीलप्रमाणे नोंदवतात, "ब्राह्मणी समाजाची शूद्र दासप्रथा त्याच्या पितृसत्ताकतेमुळे जास्त कडवी व क्रूर असावी, तर अब्राह्मणी समाजाची (सिंधू ते केरळ) दासप्रथा त्यांच्या मातृवंशकतेमुळे कमी कडवी व क्रूर असावी, असा समज होण्याची शक्यता आहे."[१७] मातृसत्ताक कुटुंब पध्दतीमध्ये दासांना फार सन्मानाची वागणूक मिळत होती असे काही समजण्याचे कारण नाही. कॉ. पाटील पुढीलप्रमाणे नोंदवतात, "दोन्ही गणप्रथाक व मुख्यत: जन्मजात होत्या. ऐतरेय ब्राह्मणानुसार शूद्र दासांचा यथाक्रम वध केला जाऊ शके; केरळचे स्वामीही तसेच त्यांच्या दासांच्या जीवनमृत्यूचे नियंते होते."[१८] मुळात दासप्रथा स्वीकारार्ह मानणे ही गोष्ट भयंकर आहे. त्यामुळे दासाला दिल्या जात असलेल्या वागणुकी वरुन डावे-उजवे ठरवणे हा केवळ मुर्खपणा म्हणावा लागेल आणि असा मुर्खपणा कॉ. पाटलांना मान्य नाही. यानंतर या दासांना दिल्या जात असलेल्या क्रूर वागणूकतेचा कॉ.पाटलांनी शोध घेतला आहे. त्याचा थोडक्यात विचार करु.

**दासप्रथेची अमानुषता:-**

जगभरातल्या गुलामांना किती अमानुषपणे वागवले गेलेले आहे याच्या कहाण्या आपणाला माहित असतात. त्यांची जनावरीसारखी मोठ्या प्रमाणात खरेदी विक्री होते. या आणि या सारख्या अनेक गोष्टी आपण चित्रपटातून किंवा साहित्यामधून वाचत आलेले आहोत. मात्र 'भारतीय गुलामगिरी' संदर्भात आपणाला फारशी माहिती नसते. फार झाले चार्तुर्वर्ण्य व्यवस्था, उतरंडीसारखी जातिव्यवस्था आणि अस्पृश्यतेसारखी अमानुष प्रथा हेच आपणाला माहित असते. मात्र भारतीय दासप्रथाही जगभरातल्या गुलामप्रथेसारखीच किंबहूना त्यापेक्षा भयंकर होती.

भारतीय दासप्रथा ही जन्मजात होती. जन्माने श्रेष्ठत्व आणि कनिष्ठत्व ठरत असल्यामुळे खालच्या वर्गातला व्यक्ती कितीही हुशार असला तरी त्याला वरच्या वर्गात जायची

परवानगी नव्हती आणि वरच्या वर्गातील नालायकाला खालच्या वर्गात कोणी ढकलत नव्हते. शूद्र हा अजन्म गुलाम होता. मनु बजावतो- "स्वामीने दास्यातून मुक्त केले तरी शूद्रांची दास्यातून सुटका होत नाही. ते त्याच्या निसर्गत:च आहे; म्हणून कोण त्याला त्यातून सोडवू शकेल?"[१९] कॉ. पाटील पुढे सांगतात "शूद्रांची दासाप्रमाणे खेदीविक्री होत असे याला मनु प्रमाण देतो. शूद्र हा विकत घेतलेला असो वा नसो, त्याच्याकडून दास्य करवून घेतलेच पाहिजे. कारण ब्राह्मणांचे दास्य करण्यासाठीच स्वयंभूने त्याला उत्पन्न केले आहे."[२०] या आणि यासारख्या असंख्य जाचक नियमांनी मनुस्मृती बध्द झालेली आहे.

कोणताही हक्क नसणे हे मुख्य लक्षण आहे. अगदी दिघानिकाय अनुसार 'दास' हा स्वत:चा स्वामी नसतो तो दुसऱ्याच्या अधिन असतो. पाहिजे तिकडे जाऊ शकत नाही. "कायद्याच्या दृष्टीने दास हा मानवप्राणी नसून एक वस्तु आहे. त्याच्या मालकीची प्रत्येक वस्तु, मग ती लहान असो वा मोठी, तो ज्याच्या मालकीची असतो त्याची मालमत्ता असते; कारण हा दास हा ना स्वत:चा मालक असाते ना मालमत्तेचा; त्याच्या मालमत्तेवर मालकी त्याच्या स्वामीची असते. एवढेच काय एक भाष्यकार दासाची गणना गुराढोरासारख्या जंगम मालमत्तेत करतो."[२१] त्यामुळे दासांना विशिष्ट अशी नावे देण्याचीही गरज नव्हती. सर्वसाधारणपणे दासांना दास आणि दासी असेच संबोधले जायचे तर शूद्रदास पध्द्ती मध्ये तुच्छतादर्शक नावे देणे अनिवार्य होते. देवराज चानाना यांनी बौध्द धर्मग्रंथात आलेल्या दासांच्या नावाची यादी दिलेली आहे. अर्थात अशी नावे अगदीच क्वचितवेळेला आढळतात. दासांना लागणारे अन्न, कपडे हे अतिशय खालच्या दर्जाचे असत असे याचे अनेक संदर्भ डॉ. पाटलांनी नोंदवले आहेत.

गणदासप्रथेमध्ये गुलामांची खरेदी-विक्रीही होत होती. त्याचे काही संदर्भ डॉ. पाटलांनी नोंदवले आहेत. 'सन्तु-भस्त जातकानुसार बुध्दपूर्वकालात दास वा दासाची सरासरी किंमत ७०० कार्षापण असावी असे दिसते.' "बुध्द घोष आपल्या दासाची किंमत पन्नास ते साठ नाणी असल्याचे सांगतो. मृच्छकटिक नाटकात (अंक ८) वसंत सेनेला संवाहक आठवण करुन देतो की तो तोच आहे की, ज्याला तिने दहा सुवर्णांना विकत घेतले होते. सुवर्णाचे विनिमयमूल्य ४८ रजतकार्षापणाइतके होते."[२२] आणि यावरुन डॉ. पाटील या निष्कर्षाप्रत येतात की "मध्ययुगीन

भारतात दासांची सरासरी किंमत ४८० कार्षापण असावी."[२३] केरळमध्ये अगदी अलिकडच्या कालखंडापर्यंत मातृसत्ताक कुटुंबपध्दती होती. केरळमध्ये दासांची खरेदी विक्री होत होती का? तर हो. होत होती. कॉ. पाटील पद्मनाभ मेननला उद्धृत करतात ते असे "मालबारमधील भुस्वामी त्यांच्या भूदासांना जमिनीसह वा जमिनीशिवाय केव्हाही विकू शकत होता. बर्टनच्या म्हणण्याप्रमाणे दासांच्या किंमती ३ पौंड ते ८ पौंड या दरम्यान वाढत घटत असत. १० वर्षापेक्षा कमी वयाच्या दासाची सरासरी किंमत ३ पौंड ८ सिलींग होती व दासींची त्यापेक्षा थोडी कमी. पण काही तालुक्यात दासांची पैदास करण्यासाठी दासी जास्त भाव मिळवून देते."[२४] अशा पध्द्तीने गणदासप्रथाक व्यवस्थेमध्ये दासांची खरेदी विक्री व लिलाव इतर कोणत्याही क्रयवस्तुप्रमाणे होत असे. म्हणजे आपल्याकडे जशी एक वार, दोन वार, तीन वार अशी त्रिवार घोषणा करण्याची पध्द्त होती. अगदी त्याचप्रमाणे दासांचा लिलाव व्हायचा. दासांच्या खरेदी-विक्रीची ही सर्व उदाहारणे गणदासप्रथाक गुलामांची आहेत. मग शुद्रप्रथाक गुलामांची खरेदी-विक्री होत नव्हती का? तर कॉ. पाटील म्हणतात महाभारतातील विदुराचे उदाहरण आपल्याला ही समस्या सोडवायला मदत करते. विदुर हा शूद्र वर्णात जन्मलेला आहे. कॉ.पाटील म्हणतात की, शूद्रांची दासाप्रमाणे खरेदी-विक्री होत असे याला मनु प्रमाण देतो. मनुस्मृती सांगते की, "शूद्र हा विकत घेतलेला असो वा नसो, त्याच्याकडून दास्य करण्यासाठीच स्वयंभूने त्याला उत्पन्न केले आहे."[२५] हे आणि यासारखे अनेक उदाहरणे देऊन कॉ. पाटलांनी सप्रमाण सिध्द केले आहे. शूद्रदासप्रथाक समाजामध्येही दासांची खरेदी-विक्री केली जात होती. प्रश्न केवळ खेरदी-विक्रीचा नाही तर दासांना अमानुषपणे वागवण्याचा आहे. आणि जगभरातील गुलामगिरी प्रथेने शरमेने मान खाली घालावी अशाप्रकारची वागणूक इथल्या शूद्र वर्णाला आणि त्यातील शेकडो जातींना ब्राह्मणी व्यवस्थेने दिली. या जातिव्यवस्थेने आणि ब्राह्मणी व्यवस्थेमुळे ८५% बहुजन समाजातील करोडो लोकांचा मोहोर फुललाच नाही. तो पिढ्यान पिढ्या करपत राहिला. कॉ. पाटलांनी या करपलेल्या मोहरांचा आणि करपविणाऱ्यांचा शोध या 'दास-शूद्राची गुलामगिरी' या महान ग्रंथराजामध्ये घेतलेला आहे. महाकवी कुमारन आसन यांची कविता कॉ. पाटलांच्या संपूर्ण शोधाचा फार चपखळपणे वेध घ्यायला मदतगार

ठरेल. कुमार म्हणतात-

किती बेडर छात्या अन् तेज:पुंज मेंदू
नामशेष केला तू,
हे हिंदू धर्मा
या जातिव्यवस्थेखातर
किती पेरुमल अन् शंकराचार्यांचा,
किती थंगन अन् कुंचनांचा
गर्भपात केला तुझ्या उदरात, हे केरळमाते,
जातीच्या या क्रूर सैतानाने!

कॉ. पाटलांनी दास शूद्रांची गुलामगिरी या ग्रंथातून व इतरही लेखनातून जातिव्यवस्थेच्या प्रश्नाला ज्याप्रमाणे केंद्रस्थानी आणले. अगदी त्याचप्रमाणे भारतीय समाजातील आद्य मातृसत्तेला, स्त्री सत्तेला आणि तिच्या शोषणाच्या प्रांरभाबिंदूलाही उजागर करण्याचे काम केले आहे ज्यातून अब्राह्मणी स्त्रीवादाची पहिल्यांदाच उभारणी झालेली आहे. या सगळ्या मांडणीसाठी त्यांनी बहुप्रवाही आन्वेषणपध्दतीचा वापर केला आहे. गणदासप्रथाक व शूद्रदासप्रथाकतेचा शोध घेण्यासाठीही माफुआ आणि सैतांत्रिक मार्क्सवाद अन्वेषणपध्दतीचाच त्यांनी आवलंब केला. त्यातून त्यांनी आपल्या नव्याच तत्त्वज्ञानाची उभारणी केली त्याचा आपण पुढे विचार करणारच आहोत. मात्र त्यापूर्वी त्यांनी जो आद्य स्त्री सत्ताकतेचा शोध घेतला आहे. त्याचा थोडक्यात विचार करुयात...

**शोध : आद्य स्त्रीसत्ता आणि मातृसत्तेचा**

समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्याय ही मूल्य शिरोधार्थ मानून सांसदिय शासन प्रणालीच्या स्थापनेला आज जवळपास ७० वर्षाचा कालावधी उलटून गेला आहे. खरेतर अनेक प्रकारच्या विषमता आजही तग धरुन आहेत मात्र आपल्या विषयाशी संदर्भित असलेल्या स्त्रीची परिस्थिती आणि तिचा दर्जा अजूनही दुय्यमच आहे. मात्र तिची ही परिस्थिती पूर्वीपासूनच आहे का? नसेल तर तिचा अगोदर काय दर्जा होता आणि तिला दुय्यम दर्जा आणि शोचनिय

अवस्था कधी प्राप्त झाली हे समजून घेतल्याशिवाय क्रांतिचा रस्ता तयार होणार नाही. कॉ. धनाजी गुरव म्हणतात त्याप्रमाणे, "इतिहासाची योग्य समज असल्याशिवाय क्रांतिकारक कार्यक्रम तयार करता येणार नाही व फक्त वर्ग संघर्षाच्या मर्यादेत मार्क्सवादी ऐतिहासिक भौतिकवादी अन्वेषणपध्दतीने भारताचा इतिहास समजून घेता येणार नाही. त्यासाठी 'बहुप्रवाही अन्वेषण' पध्दतीच वापरावी लागेल म्हणून कॉ. पाटलांनी मार्क्सवाद फुले-आंबेडकरवाद अन्वेषण पध्दतीचा आग्रह धरला."[२६] आणि या पध्दतीचा वापर करुन त्यांनी केलेली मांडणी अधिक पथदर्शक आहे. कॉ. पाटील म्हणतात, "भारताचा इतिहास सुरु होतो सिंधू खोऱ्यात कृष्णा निऋतीच्या ऋति गणाच्या क्षत्र वर्णाच्या स्त्रियांनी आर्ष गणभाषेत गायलेल्या तांत्रिकी श्रुतीने."[२७] ही निर्ऋती ही आद्यगणमाता होती याचा उलगडाही कॉ. पाटलांनीच पहिल्या प्रथम केला. इतकेच नव्हे; तर ते म्हणतात, "सभा व समितीची द्विगृही लोकशाही निर्ऋतीने प्रथम आणली आणि 'स्वातंत्र्य, समता व मित्रता' या त्रयींची आद्य जननी निर्ऋतीच आहे हे प्रथम मी दाखवले."[२८] मूळात गणसमाजाचा प्रारंभच स्त्रीसत्ताक गणसमाजाने झालेला आहे. स्त्रीसत्ताक गणसमाजामध्ये उत्पादक शासक स्त्रियाच होत्या, तर पुरुष हे अनुत्पादक होते त्यामुळे हा वर्ग राजकीयदृष्ट्या पारतंत्र होता. शेतीचा शोधही स्त्रियांनीच लावला आहे. "ब्रिकॉने नि:संदिग्धपणे सिध्द केले आहे की, जगभर शेतीचा शोध स्त्रियांनी लावला आहे."[२९] कॉ. धनाजी गुरव कॉ. पाटलांचे यासंदर्भातील योगदान नेमक्या शब्दात स्पष्ट करतांना म्हणतात, "स्त्रिया या इतिहासामध्ये जास्त सर्जनशील होत्या. त्यांनीच भाषेचा, शेतीचा शोध लावला. संस्कृतीच्या जनक स्त्रियाच आहेत. आद्य गणमाता निर्ऋती ही श्रेष्ठ गणमाता होती. एकलव्य, शंबूक, सीता, कर्ण, द्रौपदी, विदूर हे शुद्रातिशूद्रांचे नायक नायिका आहेत, ही मांडणी अनेक पुरावे देऊन प्रथम त्यांनीच केली."[३०] अर्थात या सर्व गोष्टी स्त्री ही शासनकर्ती असल्याशिवाय शक्य आहे का? "स्त्री सत्ता/ स्त्री राज्य हा शब्द प्रथम महाभारतात येतो. वैराज हा स्त्री सत्तेचा तांत्रिकी श्रुतीतून आलेला शब्द आहे. वेराज वा स्त्री राज्य गण पूर्णपणे समताधिष्ठित होते, तर राजक गण विषमताधिष्ठित."[३१] या "स्त्री सत्ता केरळ ते नर्मदा खोऱ्यातील महिष्मतांपासून पंजाबच्या मद्रांपर्यंत पसरलेल्या होत्या."[३२] कॉ. पाटलांनी भारतीय इतिहासाचे उत्खनन करुन हा सगळा

क्रांतिकारक आणि मूळ भारतीयांना अभिमान वाटावा असा इतिहास लख्खपणे समोर आणला आहे. स्त्री ने शेतीचा जसा शोध लावला तसा साळीचा शोध लावला त्याचबरोबर ती आद्य व्याकरणकार होती इतकेच नव्हे; तर आपण संस्कृत ही भाषा ब्राह्मणांची आहे असे समजतो तर ते तसे नसून त्यांनी ती भारतीय स्त्री-गणराज्यातून शिकून घेतली हे मांडतात. ते म्हणतात, 'सिंधू वैराज्याची आर्य भाषा संस्कृत होती' हा जो स्त्री सत्ताक समाज होता तो वर्गपूर्व समाज होता. कॉ. पाटलाच्या तत्त्वज्ञान व चळवळीच्या अभ्यासक व अब्राह्मणी स्त्रीवादी कार्यकर्ता या स्त्री सत्ताक समाजाचे विशेष याप्रमाणे नोंदवतात, 'स्त्री सत्ताक समाजाच्या या टप्प्यामध्ये स्त्रियांनी शेतीचा शोध लावला. स्तय नावाच्या अवजाराने शेती नांगरत. स्त्रिया अशाप्रकारे अतिश तपशिलात जात त्यांनी आद्य स्त्री सत्तेचा व मातृसत्तेचा शोध घेतला आहे.

**संदर्भ:-**


१) माळी सचिन, एकाकी आणि लोकाकी प्रज्ञासूर्य कॉम्रेड शरद पाटील, सुगावा प्रकाशन, पुणे, प्र. आ. २०१४, पृ.क्र.३२.

२) तत्रैव, पृ.क्र.०८.

३) पाटील शरद, दास शूद्रांची गुलामगिरी, मावळाई प्रकाशन, पुणे, २००६, पृ.क्र.०५.

४) आंबेडकर बाबासाहेब, शूद्र पूर्वी कोण होते? क्षितिज पब्लिकेशन, नागपूर, तृतीय आवृत्ती, २००१, पृ.क्र.१०.

५) कांचा अइलैय्या, हिंदुत्व-मुक्त भारत, सेज पब्लिकेशन, नवी दिल्ली, २०१७, पृ.क्र.१९३.

६) पाटील शरद, उनि, पृ.क्र.०१.

७) तत्रैव, पृ.क्र.०२.

८) पृ.क्र., उध्दृत, पृ.क्र.०८

९) गोडबोले अच्युत / कहाते अतुल, स्पार्टाकस ते ओबामा, मनोविकास प्रकाशन, पुणे, सातवी आवृत्ती, डिसें.-२०१५, पृ.क्र. मलपृष्ठावरील मजकूर.

१०) पाटील शरद, उनि, पृ.क्र. ०२, उधृत.

११) तत्रैव, पृ.क्र.१७.

१२) तत्रैव, उधृत, पृ.क्र.१७.

१३) तत्रैव, पृ.क्र.३५२.

१४) तत्रैव, उधृत, पृ.क्र.३४७

१५) तत्रैव, उधृत, पृ.क्र.३५०.

१६) उनि, चव्हाण रमेश, पृ.क्र.२१२.

१७) उनि, पाटील शरद, पृ.क्र.३७०.

१८) तत्रैव, पृ.क्र.३७०.

१९) तत्रैव, उधृत, पृ.क्र.४३२.

२०) तत्रैव, उधृत, पृ.क्र.४३२.

२१) तत्रैव, उधृत, पृ.क्र.३८३.

२२) तत्रैव, उधृत, पृ.क्र.४१९,४२०.

२३) तत्रैव, पृ.क्र.४२०.

२४) तत्रैव, उधृत, पृ.क्र.४२१.

२५) तत्रैव, उधृत, पृ.क्र.४३२.

२६) उनि, चव्हाण रमेश, पृ.क्र.८५

२७) पाटील शरद, प्रिमिटीव्ह कम्युनिझम, मातृसत्ता-स्त्रीसत्ता आणि भारतीय समाजवाद, मावळाई प्रकाशन, शिरुर, पृ.क्र.११५.

२८) तत्रैव, पृ.क्र.११५.

२९) उनि, पाटील शरद, दास शूद्राची गुलामगिरी, पृ.क्र.५४

३०) उनि, चव्हाण रमेश, पृ.क्र.१६

३१) उनि, पाटील शरद, प्रिमिटिव्ह कम्युनिझम, पृ.क्र.११८

३२) तत्रैव, पृ.क्र.११८.

## प्रकरण - तिसरे

# जाति व्यवस्था सामंती सेवकत्व : अन्वयार्थ

'जात' हे भारतीय समाजव्यवस्थेतील वास्तव आहे. नव्हे; शोषण-शासनाची प्रमुख संस्था म्हणून वर्तमानातही ती अबाधित आहे व या जात व्यवस्थेचा पाया ब्राह्मणी पुरुषसत्ताक रचनेत आहे. या जातव्यवस्थेचा शोध आणि चिकित्सा करण्याचे काम म.जोतिराव फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी फार मूलभूतपणे केलेले आहे हे सर्वज्ञात आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची **'**कास्ट इन इंडिया**'** आणि 'जातिव्यवस्थेचे उच्चाटन' हे क्रांतिकारी ग्रंथ म्हणून जगन्मान्य झालेली आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नंतरही भारतीय जातिव्यवस्थेची चिकित्सा आणि तिच्या अंतासंदर्भात मांडणी करण्याचा प्रयत्न अनेक मान्यवर अभ्यासक करत आहेत. त्यात सर्वात अग्रक्रमाने नाव घ्यावे लागते ते कॉ. शरद पाटील यांचे. कॉ. भारत पाटणकर यांनी पाटलांच्या या संदर्भातील योगदानाची दखल फार नेमक्या शब्दात घेतली आहे. ते म्हणतात, "महात्मा जोतीबा फुले यांनी स्त्री शूद्रातिशूद्राच्या मुक्तीचा सिध्दांत मांडला. या सिध्दांताचा विकास आजच्या काळासाठी आवश्यक पध्दतीने करणे हे शरद पाटलांसमोरचे महत्तम कार्य होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी **'**भांडवलशाही आणि ब्राह्मणशाही**'** यांचा अंत करण्याचे ध्येय पुढे नेण्यासाठी, सैध्दांतिक विकास करण्याकरीता अथक परिश्रम केले."[१] स्वत: कॉ. पाटलांनीच त्यांच्या या परिश्रमा संदर्भात फार मार्मिकपणे नोंदवून ठेवले आहे ते असे. 'दिवसा ग्रामीण गोरगरीब व अतिशूद्रांसाठी लढायचे आणि रात्री त्यांच्या देशाचा इतिहास जाणण्यासाठी पुस्तकाशी' या अथक परिश्रमातून भारतीय जातिव्यवस्थे संदर्भात ते निर्णायक अशा निष्कर्षापर्यंत आले आणि गेल्या चाळीस वर्षापासून भारतातील जातिव्यवस्था ही शोषण शासनाची पायाभूत व्यवस्था आहे असे प्रतिपादन करत राहिले आणि या प्रतिपादनाच्या समर्थनार्थ त्यांनी मूलगामी असे लेखन केले. पैकी या प्रकरणामध्ये 'जातिव्यवस्थाक सामंती सेवकत्व' या ग्रंथाचा विचार करावयाचा आहे.

भारतीय समाजव्यवस्था आणि तिचा इतिहास अतिश गुंतागुंतीचा असल्यामुळे तो

समजून घेणेही तितकेच कठीण असे काम आहे आणि ज्यांनी ज्यांनी तो समजून घेण्याचा प्रयत्न केला आहे त्यातील अनेकांची अवस्था चक्रधर स्वामींनी सांगितलेल्या 'हत्ती आणि सात आंधळे' या दृष्टांतासारखी झालेली आहे. विशेषत: ब्राह्मणी इतिहासकारांनी आपणच सत्य शोधल्याचा अविर्भाव अधिक प्रमाणात दाखविलेला आहे. त्याला छेद देण्याचे काम कॉ. पाटलांनी फार सयंतपणे केलेले आहे. "प्राचीन सिंधू संस्कृती, वैदिक समाज, आर्य आणि अनार्य आणि इतर टोळ्या यांच्या व्यामिक्ष, हजारो वर्ष चाललेल्या गुंतागुंतीच्या प्रक्रियेला पुरातत्वशास्त्र आणि वेद, उपनिषदे, पुराणे आणि संस्कृत नाटके यांच्या पारंपरिक ब्राह्मणी अर्थनिर्णयनावर ज्यांनी भिस्त ठेवून वर्गीय चश्मातून ज्या डी. आर. चवाना, डी. डी. कोसांबी, काशिप्रसाद जयस्वाल, आर. एस. शर्मा, डी. पी. चटोपध्याय, रोमिला थापर या आणि अशा अनेक विद्वानांनी पहिले त्याच्यापुढे नेणिवेचा ठाव घेऊ पाहणारी अन्वेषण पध्दती आणि तत्वज्ञानही त्यांनी विकसित केले."[२] मुळात कॉ. शरद पाटलांनी कुठल्याही एका रंगाचा चश्मा परिधान करणे केवळ गैरच नव्हे तर अनैतिक मानले व पोथीनिष्ठेला आणि कर्मठपणाला त्यांनी अजिबात थारा दिला नाही नव्हे, अशाप्रकारच्या पक्षातून ते बाहेर पडल्यामुळेच ते स्वत:चा विकास करु शकले व त्यामुळेच त्यांना विधायक अशा नवतत्त्वज्ञानांची मांडणीही करता आली. भारतीय समाजव्यवस्था कमालिची गुंतागुंतीची असल्यामुळे तिची उकल कुठल्याही एका दृष्टीकोनातून करणे केवळ अशक्य आहे हे कॉम. पाटलांच्या लक्षात आल्यामुळे जातीवर्ग स्त्री दास्यांताच्या क्रांतीसाठी प्रबोधनाची क्रांती कार्यक्रम मांडण्याचा यशस्वी प्रयत्न केला. 'क्रांती की तलवार विचारों की साज पर तेज होती है' असे भगतसिंग म्हणाले होते. वर्ण-जात-वर्ग आणि स्त्री दास्यांतक क्रांतीच्या पूर्ततेसाठी आवश्यक सिध्दांत विकसित करणे हे त्यांनी आपले अव्वल ध्येय मानले होते. त्यातही जातिअंत हा त्यांचा प्राधान्यक्रम होता. त्यासाठी जातिव्यवस्थेची पाळंमुळं शोधणे आवश्यक होते. हे काम डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी त्यांच्या 'कास्ट इन इंडिया जेनिसिस ॲन्ड दिअर मॅकेनिझम' या ग्रंथात केलेले आहेत. तरीही तिचा नव्याने शोध घेण्याची गरज पाटलांना वाटली आणि तसा त्यांनी शोध सुरु केला. त्यासाठी त्यांनी दिग्नाग, धर्मकिर्ती, अश्वघोष इत्यादींच्या तत्त्वज्ञानाचा अभ्यास केला. या बौध्द दार्शनिकांच्या अभ्यासातून त्यांना

नव्या सिध्दांताचा शोध लागला. या सर्व गोष्टींचा उहापोह पुढे येणारच आहे. त्यापूर्वी ज्या सामंतवादी क्रांतीने जातीव्यवस्थेला जन्म दिला त सामंतप्रथेचा शोध कॉम. पाटलांनी फार अभ्यासपूर्ण पध्दतीने घेतला आहे.

**सामंतप्रथेचा कालखंड:-**

"सामंतप्रभा ही अशी उत्पादन पध्दत आहे की जीत शासकवर्ग वा जाती कुळांच्या व शेतकऱ्यांच्या आणि भुदासांच्या वा अतिशुद्र मजुरांच्या अदास्य श्रमांनी निर्मिलेला अतिरिक्त माल महसूल कर रुपाने वसूल करतात व स्वत:च्या पदसोपानानुसार वाटून घेतात."[३] कॉम. पाटलांनी अशाप्रकारे सामंतप्रभेला व्याख्याबध्द केलले आहे. भारतीय सामंतप्रथा मग ती जातिव्यवस्थाक का असेना समाजक्रांतीतून आल्याने तर्क पूर्व सामंतप्रथेच्या कालखंडात सर्व क्षेत्रामध्ये जो अभूतपूर्व विकास झाला तो युरोपिय सांमतप्रथेत बघायला मिळत नाही. या सामंतप्रथेचेही दोन विभागात विभाजन केलेले आहे. त्यातील एक वरुन सामंतप्रथा तर दुसरे खालून सामंतप्रथा. सहावे शतकपूर्व व सहावे शतकोत्तर कालखंडाचे नामकरण कोसांबींनी अनुक्रमे 'वरुन सामंत प्रथा' व 'खालून सामंतप्रथा' असे केले असून त्यांची व्याख्या खालीलप्रमाणे केली आहे.

'वरुन सामंतप्रथेचा अर्थ होतो, असे राज्य, की ज्याचा सम्राट वा प्रभुत्वशाली राजा असून स्वहक्कानुसार राज्य करणाऱ्या व आपल्या प्रदेशात अर्थात सम्राटाला खंडणी देणे चालू ठेवले पाहिजे ते करु शकणाऱ्या मांडलिकांपासून खंडणी वसूल करतो. हे मांडलिक राज्यकर्ते गणमुखही असू शकत आणि जमीनदार वर्गाच्या मध्यस्थीवाचून सर्वसामान्यपणे प्रत्यक्ष शासन करु शकत. खालून सामंतप्रथेचा अर्थ होतो यानंतरची व्यवस्था... जीत खेड्यातूनच विकसित झालेला जमिनदार वर्ग स्थानिक रयतेवर क्रमश: सशस्त्र हुकूमत गाजवू लागतो. या वर्गावर लष्करी सेवेची अट होती आणि म्हणूनच दुसऱ्या कोणत्याही थराच्या मध्यस्थीवीना शासक सत्तेशी प्रत्यक्ष संबंध असल्याचा त्याचा दावा होता. वरुन सामंतप्रथेत राजाधिकारी करीत असलेलया प्रत्यक्ष करवसुली ऐवजी आता छोटे मध्यस्थ कर वसुली करतात आणि तिचा एक हिस्सा सामंती उतरंडीत वितरीत करतात."[४] वरुन सामंतप्रथेत जातिव्यवस्था प्रवाही होती तर

खालून सामंतप्रथा ताठर स्वरुपाची बनली तरीही या दोन्ही सामंतप्रथेत शोषण हे होतेच होते. प्रतिमा परदेशी म्हणतात की, याच कालखंडात ब्राह्मणी शास्त्र्यांनी चातुर्वर्ण्याचे जोखड पुन्हा लादले. "नवोदित जाति समाजातील ब्राह्मणी विरोधी अब्राह्मणी या संघर्षात धर्माची गुंतागुंत होती. या संघर्षात जातिव्यवस्था अवरुध्द बनली. ब्राह्मणी धर्माचे व्रत-वैकल्य इ. प्राबल्य वाढू लागले. स्त्रियांवरील बंधने वाढली. व्रतांमधून स्त्रियांवरील पुरुषांची पक्कड जासत घट्ट झाली. कॉ.पाटील स्पष्ट करतात "स्त्रियांसाठी खास व्रतांमधून ब्राह्मणी स्त्री मुक्ती, पण स्त्रियांवर पुरुषांची पक्कड घट्ट करण्यात आली."[५] खालून सामंतप्रथेत जातिव्यवस्था अधिक घट्ट झाली. स्त्रियांचा अधिक छळ होऊ लागला याची अनेक उदाहरणे आपणाला नोंदवता येतील. आधुनिक काळात म. ज्योतिराव फुले, ताराबाई शिंदे यांनीही जातिव्यवस्था ही स्त्रियांच्या शोषणाचे माध्यम बनली हे स्पष्ट केलेले आहेच. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी तर स्त्रिया या जातिव्यवस्थेच्या प्रवेशव्दार आहेत हे स्पष्ट केले. मात्र कॉम. पाटलांनी मार्क्सवाद्यांनाही आणि आंबेडकरवाद्यांनाही कोर्टाच्या कटघऱ्यात उभे केलेले आहे. ते या संदर्भात म्हणतात, "मार्क्सवाद्यांनी जातींना वरच्या इमल्यात टाकल्यामुळे अभौतिक, मानसिक जात समाजक्रांतीने नष्ट करायचा प्रश्न त्यांच्यापुढे अजून तरी उभा राहिलेला नाही त्यामुळे त्यांनी जातीचा उगम व विकास शोधला नाही. आंबेडकरवाद्यांनी जात जरी भौतिक मानली, तरी तिच्या संशोधनासाठी मार्क्सची अन्वेषणपध्दत नकारात्मकरित्या पर्याय उभा न करता, नाकारल्याने जातीची व्यवस्था 'जी जात नाही ती जात' अशी ते अभौतिक करीत राहिले. जातीचे गतिनियम शोधून काढण्याशिवाय अंत कसा होणार?"[६] अशी टीका ते मार्क्सवाद्यांवर व आंबेडकरवाद्यांवरही करतात. मात्र ते कृतीशीलतेच्या पातळीवर काही नवा पर्याय उभा करतात का? या संदर्भात सुप्रसिध्द अभ्यासक राहूल कोसंबी काय म्हणतात ते पाहू. 'वर्ग नव्हे जात इथले भौतिक वास्तव आहे म्हणायचे पण जातीव्यवस्थेच्या आर्थिक संबंधातून होणाऱ्या शोषणाला, जाती अत्याचारांना सैध्दांतीक चौकटीतून मांडायचे नाही आणि निर्णायक वेळ आली व जाती निर्मूलनाचा / क्रांतीचा कृती कार्यक्रम कोणी मागितलाच तर मात्र निव्वळ पारंपरीक मार्क्सवादी पक्षा सारखाचा कायद्याच्या चौकटीत सुधारणा मागणारा, धनदांडग्या ओबीसी शेतकरी जाती

आणि दलित हा खेड्यातला सर्वात उग्र वर्ग विग्रह असताना मिरासदार शेतकऱ्याचा जात वर्ग कल्पून जमिन वाटपासाठी तसेच दलित आणि अशेतकी गरीब ओबीसी जाती यांच्यात एकी वाढण्यासाठी ते अब्राह्मणी प्रबोधनाचा सल्ला देतात."[७] मग कॉम्रेड पाटील यांनी जातीचे गतीनियम शोधले असा जो दावा करतात तो कोणता. जाती अंताचा कृती कार्यक्रम त्यांच्या एकूण लेखनात कुठेच दिसत नाही. जो डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जातीव्यवस्थेचे उच्चाटन या ग्रंथात दिलेला असूनही कॉम्रेड पाटलांना तो मान्य नाही. याचा अर्थ कॉम्रेड पाटील यांनी एकूणच जातिव्यवस्थेचा घेतलेला शोध महत्त्वाचा नाही असे नव्हे.

**मार्क्सवादी इतिहासतज्ज्ञांची समिक्षा:-**

कॉ. शरद पाटील यांनी डी. डी. कोसंबी, डॉ. इरफान हबीब, डॉ. रोमिला थापर, गेल ऑमवेट, रा. श. शर्मा, दा. ध. कोसंबी, काशीप्रसाद जैसवाल, इ. इतिहास तज्ज्ञांनी केलेल्या इतिहास विश्लेषणाची समीक्षा करुन त्यांनी आपले काही आरोप नोंदविले आहेत. हे आरोप नोंदवतांना त्या त्या अभ्यासकांचे मोठेपणही नोंदवलेले आहे. कॉ. पाटील मार्क्सवादी इतिहास तज्ज्ञाची समीक्षा करतांना म्हणतात, 'मार्क्सवादी इतिहास तज्ज्ञ मातृसत्तेला वर्गपूर्व समाज मानतात तर कॉ. पाटील म्हणतात, "भारतावर ब्रिटीश साम्राज्यवादी भांडवलदार वर्गाची सत्ता आल्यावर झालेल्या भांडवली विकासापोटी जातीव्यवस्था वर्गग्रस्त झाली याचाच अर्थ कॉ. पाटलांना ब्रिटिशांच्या आगमनापर्यंत भारतात केवळ जाती होत्या आणि त्यांच्या आगमनानंतर भारतात वर्ग निर्माण झाले असे म्हणावयाचे आहे. मात्र या संदर्भात डॉ. आनंद तेलतुंबडे यांनी मात्र वेगळी भूमिका मांडली आहे. ते म्हणतात, "विश्लेषणासाठी परिस्थिती आहे तशी घेवून रणनिती आणि डावपेच आखणे हा जर आपला उद्देश असेल तर हे आपल्या लक्षात येईल की, कॉ. शरद पाटील म्हणतात तो वाद निरर्थक आहे. तथापी हे समजून न घेता, जर मार्क्सवादी अट्टहासाने मार्क्सच्या नावाने एका दिशात्मक विकासाच्या सिध्दांताला चिकटून जातीच्या वास्तवाकडे दुर्लक्ष करीत राहिले तर ते फक्त जातीविरोधी शक्तींना आपल्यापासून परावृत्त करीत जातील."[८] म्हणजे डावपेच म्हणून अशी भूमिका घ्यायला डॉ.तेलतुंबडे यांची हरकत नाहीये मात्र असे वाद चळवळीच्या दृष्टीने पोषक न ठरता निरर्थक ठरतात असे डॉ. तेलतुंबडे

यांना वाटते तर कॉ. पाटलांच्या याच भूमिकेवर आक्षेप नोंदवतांना तरुण अभ्यासक राहूल कोसंबी म्हणतात, "ब्रिटिश पूर्व भारतात वर्ग निर्माण झाले, अशी टोकाची भूमिका कॉ. पाटलांनी घेतली, फक्त कोणी म्हणून किंवा मानून काहीच होत नसते, तर ते मांडणऱ्याला सिध्दही करावे लागते. दुर्दैवाने कॉ. शरद पाटलांनी फक्त छातीठोकपणे जाहीरकरण्यापलीकडे त्याची कोणतीही जबाबदारी घेतली नाही."[९] कोसंबीच्या इतिहास लेखनाच्या त्रुटीवरही कॉ. पाटलांनी आक्षेप घेतले आहेत. ते आक्षेप नोंदवण्यापूर्वी कॉ. पाटलांनी कोसंबीचे वादातीत महत्त्वही नोंदवून ठेवले आहे. ते अगोदर पाहणे संयुक्तिक ठरेल व त्यानंतर त्यांच्यावरील आक्षेपाचा विचार करु या. कोसंबीचे महत्त्व प्रतिपादन करताना कॉ. पाटील म्हणतात, "कोसंबी भारताचे महत्तम मार्क्सवादी इतिहास तज्ज्ञ सार्थपणे मानले जातात. त्यांनी भारतीय इतिहास क्षेत्रात पदार्पण करेपर्यंत भारतीय इतिहासाला मार्क्सवादी अन्वेषण पध्दतीच्या चौकटीत कोंबायची पध्द्त रुढ होती. कोसंबींनी भारतीय इतिहासाच्या साधनाचा शक्यतो 'फर्स्ट हँड' अभ्यास करुन त्याला डोळसपणे मार्क्सवादी अन्वेषण पध्द्त लावली."[१०] असे असेल तर मग कॉ. पाटलांचे कोसंबीवर आक्षेप कोणते? "एक म्हणजे कोसंबीने धर्म श्रध्दांच्या उदय विकासाचे विश्लेषण उत्पादन साधने व उत्पादन संबंधांच्या आधारे केले. धर्म श्रध्दाच्या उदय विकासामागचे सामाजिक संघर्ष त्यांनी उकलून दाखवले नाहीत. दुसरी बाब म्हणजे भारतीय समाज जातीय समाज असल्याने भारतातील सामाजिक संघर्षाचे विश्लेषण वर्गीय विश्लेषण पध्दतीच्या आधारे होवू शकत नाही. कोसंबींनी जातिलाच वर्ग मानल्याने धर्म श्रध्दाच्या चलनवलनाचे सामाजिक गतीशास्त्र त्यांना कळू शकले नाही."[११] कॉ. पाटलांच्या या आक्षेपात तथ्ये दिसते कारण कोसंबी यांच्यावर मार्क्सचा कमालीचा प्रभाव असल्यामुळे त्यांची अन्वेषण पध्दत ऐतिहासिक भौतिकवादीच राहीली. ते कर्मठ मार्क्सवादी नसल्यामुळेच भारतातील वर्ण आणि जातीची अग्रक्रमाने नोंद घेतात मात्र दुसऱ्या बाजूला या जातीचे वर्गाशी समिकरण करतात इतकेच नव्हे तर ते चातुर्वर्ण्यालाही वर्गव्यवस्था मानतात हे स्पष्ट होते. म्हणूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मार्क्सचा पाया आणि इमला या सिध्दांतावर नेमकेपणाने बोट ठेवले होते हे या निमित्ताने लक्षात घेणे महत्त्वाचे आहे. कारण जाति संस्थेचे शोषण शासन अबाधित

ठेवण्यात धर्म व संस्कृतिने फार महत्त्वपूर्ण भूमिका बजावली होती हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी पुरते ओळखले होते. शोषण शासनाचे भौतिक संदर्भ नष्ट करायचे असतील तर त्यावर उभारलेल्या धर्म, संस्कृती, राजकारणाचा इमला मोडून काढावा लागेल असे मत त्यांनी व्यक्त केले होते. राहूल कोसंबींना मात्र कॉ. पाटलांचा डी. डी. कोसंबीवरील हा ही आक्षेप उडवून लावला आहे. ते म्हणतात, "डी. डी. कोसंबी आणि इतर मार्क्सवादी इतिहास तज्ज्ञांवरही कॉ. पाटलांचे आक्षेप ठराविक असेच आहेत. पहिला पेटंट आक्षेप हाच असणार की, जवळजवळ सर्वच मार्क्सवादी इतिहास तज्ज्ञांनी यांत्रीक एक प्रवाही दृष्टीकोनातून इथल्या जातीचे अस्तित्व नाकारुन वर्गाला आरोपीत केले."[१२]

बहुतांश भारतीय मार्क्सवाद्यांनी भारतीय जात वास्तवाला कधी ध्यानातच घेतले नाही याकडे राहूल कोसंबी हे कॉ. पाटील यांच्यावर टीका करण्याच्या हट्टापायी दुर्लक्ष करत आहेत अस जाणवते. थोर मार्क्सवादी विचारवंत शरदचंद्र मुक्तीबोधांची भूमिका कॉ. पाटलांचे समर्थन करणारीच वाटते. ते या संदर्भात म्हणतात, "भारताचे चातुर्वर्ण्य विशिष्ट स्वरुप मार्क्सवाद्याने खऱ्या अर्थाने लक्षात घेतले असावे असे वाटत नाही. तसे असते तर भारतीय परिस्थितीला अनुकूल असा मार्क्सवादाचा सृजनशील असा वेगळा विकास झाला असता."[१३] शरदचंद्र मुक्तिबोधासारखे मातब्बर अभ्यासक मार्क्सवादाकडे पोथीनिष्ठ दृष्टीकोनातून पाहात नसल्यामुळेच ते उपरोक्त मत नोंदवू शकलेत आणि म्हणून कॉ. पाटलांची भूमिका कशी योग्य आहे हे या निमितताने लक्षात येते. अशाच प्रकारे जयस्वाल व मुजुमदार यांच्या भूमिकेचेही कॉ. पाटील खंडन करतात. उदाहरणादाखल हा संदर्भ पाहता येईल. "भारतात लोकशाही प्रथम ब्रिटिश राज्याकर्त्याने आणली नाही तर भारतीय गणराज्य लोकशाही पध्दतीने चालत असे जयस्वाल व मुजुमदार यांनी साम्राज्यशाही विरोधी वैचारीक संघर्षात पुस्तके लिहून सिध्द करण्याचा प्रयत्न केला. जयस्वाल यांनी तर त्यांचा 'हिंदू पॉलीटी' हा ग्रंथ देव, मृत्यु, क्रौर्य व वर्ण यांच्या पासून स्वातंत्र्याच्या तत्त्वज्ञानाची घोषणा करणाऱ्या गणप्रथा, वृष्णीकर, वैशाल व शाक्य यांच्या स्मृतिस अर्पण केली."[१४] कॉ. पाटलांना मात्र जयस्वालांची ही भूमिका टोकाची वाटते आणि म्हणून वस्तुनिष्ठ सत्य शोधून जयस्वाल व मुजुमदारांची ही भूमिका दुरुस्त

करण्याची गरज प्रतिपादतात आणि इतरांवर भरवसा न ठेवता स्वत:च सत्य मांडतात ते असे, "संघ गणांच्या जनपदीनांचे स्वातंत्र्य त्यांच्या स्त्रिया व दास यांच्या पारतंत्र्यावर उभे होते. गणसमाजात व्यक्तिस्वातंत्र्याचा जन्मच झालेला नव्हता, तर भांडवलदारी लोकशाही व्यक्ति-स्वातंत्र्यावर अधिष्ठीत आहे. हा या दोन लोकशाहींमधला फरक दृष्टीआड करुन चालणार नाही. गणसमाजाची लोकशाही ही उपजत जैवीक स्वरुपाची होती तर भांडवलशाही लोकशाही ही कृत्रीम स्वरुपाची आहे हा फरक अजून लक्षात घेतला नाही. स्त्रियांना संघात प्रवेश द्यायच्या महाप्रजापती गौतमीच्या विनंतीला बुध्दाने नकार देवूनही शाक्यांच्या प्रत्येक कुळा मधली एक स्त्री याप्रमाणे शाक्य स्त्रिया केस कापून व काशाय वस्त्र परिधान करुन महाप्रजापती गौतमीच्या नेतृत्वाखाली नेपाळच्या तराई पासून बिहार मधील वैशाली पर्यंत पायी चालत आल्या यावरुन संघगण व्यवस्थेतील क्षत्रीय स्त्रियांचे जीवन किती दारुण झालेले होते याची कल्पना येते. बुध्दाने महाप्रजापती गौतमीला संघ प्रवेशासाठी ज्या आठ गुरु धम्माची अट घातली होती त्यावरुनही त्यांची अपमानकारकता लक्षात येते."[१५] अशा पध्दतीने कॉ. पाटील गणव्यवस्था काळात लोकशाही होती हे नाकारतात मात्र तत्कालीन परिस्थितीच्या मर्यादा लक्षात घेता भारतीय इतिहासातील स्त्री मुक्तीच्या क्षेत्रातील ही पहिली क्रांती होती हे नाकारता येत नाही अर्थात कॉ. पाटीलही ते नाकारत नाही. त्यांचा विरोध आहे तो जयस्वालांच्या गणव्यवस्था कालीन लोकशाही असण्याच्या भूमिकेला. मात्र तत्कालीन इतर शासनप्रणाली पेक्षा गणव्यवस्था शासन प्रणाली वर्तमान लोकशाहीच्या (जरी ती नैसर्गिक असली तरी) वर्तमान लोकशाहीच्या फार जवळ जाणारी होती. याकडेही दुर्लक्ष करता येत नाही आणि राहिला मुद्दा भिक्खू संघात स्त्रियांना प्रवेश देण्याचा आणि केवळ तथागताच्या तत्कालीन क्षणीक भूमिकेमुळे बुध्दांना स्त्री व्देष्टा ठरवणे हे त्यांच्यावर अन्याय करणारे ठरेल. राहूल कोसंबीला तर कॉ. पाटलांचा हा आरोप ठोकळेबाज पध्दतीचाच वाटतोय. जयस्वाल व मुजुमदारांप्रमाणेच गेल ऑम्वेट, रा. श. शर्मा, इर्फान हबीब इ. च्या भूमिकांच ही खंडन करुन पर्यायी अशी नवी मांडणी करतात. अर्थात कॉ. पाटील जे मांडतात तेच प्रमाण असेही समजण्याचे कारण नाही. दुसरा मुद्दा म्हणजे डी. डी. कोसंबी, रामशरण शर्मा, इर्फान हबीब, रोमिला थापर या सारख्या विद्वान

अभ्यासकांवर कोणीही ब्राह्मणी वा सनातनी मार्क्सवादी असा आरोप करु शकणार नाही याचा अर्थ त्यांनी काढलेले निष्कर्ष सिध्द झाले किंवा पर्यायाने कॉ. पाटलांची मांडणी असिध्द झाली असाही होत नाही. शरद पाटलासह या सर्व विद्वान अभ्यासकांचे संशोधन आपल्याला इतिहासाची कार्यकारण मींमासा समजण्यास मदत होते आणि संशोधनामध्ये अखेरचे असे काहीएक नसते किंवा खरा संशोधक अशा पध्दतीची मी म्हणतो तेच ब्रह्मवाक्य ही भूमिका कधीही घेत नसतो. कॉ. पाटलांचे अनेक सिध्दांत वादग्रस्त ठरले तरी प्रा. संजय कुमार कांबळे म्हणतात त्याप्रमाणे जातीय विषमतेचा व शोषणाचा प्रश्न हाताळल्याशिवाय भारतात क्रांतीचे राजकारण करता येणार नाही हा मुद्दा कॉ. पाटलांनी लावून धरला आणि त्यांचे हे योगदान वादातीत असेच आहे. यापुढे आपल्याला विचार करावयाचा आहे तो सांमत प्रथेतील दार्शनिक संघर्षाचा.

तत्त्वज्ञान आणि समाजजीवन यामध्ये जवळचा संबंध असतो. आपल्या देशात प्राचीन काळापासून तत्त्वज्ञानाचा विचार करणारे अनेक दार्शनिक झाले. हे विश्व कशाचे बनले आहे. या विश्वाचे समग्र स्वरुप काय आहे, याचा शोध घेण्याचा प्रयत्न केलेला आहे. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी म्हण्तात त्याप्रमाणे "विश्वाचे समग्र, साकल्याने प्रतीत होणारे स्वरुप काय आहे, तसेच मानव काय आहे, आणि मानवाचे विश्वातील स्थान कोणते, हे निश्चित करणे आणि त्या आधारावर मानवाला योग्य असा जीवनमार्ग कोणता याचा शोध घेणे हे तत्त्वज्ञानाचे कार्य आहे."[१६] असाच काहीसा दृष्टिकोन एस. जी. सरदेसाई यांनीही मांडलेला आहे. या निमित्ताने तो ही पाहणे संयुक्तिक ठरेल तर पाहूया "विश्वाची प्राथमिक अवस्था चैतन्यरूप की जडरुप? निर्गुण की सगुण? चैतन्यातून जडाचा उगम की जडातून चैतन्याचा? सत्य आणि आभास यांचा निकष काय? खऱ्या ज्ञानाचे साधन कोणते? भौतिक परिस्थिती ही विचारांची आणि सामाजिक परिवर्तनाची जननी की विचार ही माणसाची मूलभूत प्रेरक शक्ती? हे प्रश्न हा तत्त्वज्ञानाचा मूलभूत विषय आहे."[१७] या उपर हे जग कसे निर्माण झाले हे आजपर्यंतच्या तत्त्ववेत्यांनी सांगितले मात्र आहे ते जग स्वत:च्या पायावर कसे उभा राहील व स्वत:च्याच पायावर कसे चालेल हे सांगण्याचे काम माझे तत्त्वज्ञान करेल. असे कार्ल मार्क्स म्हणाला

होता. हा ही एक महत्त्वपूर्ण दृष्टीकोन समजून घेणे आवश्यक आहे. तरीही तत्त्वज्ञानाच्या जागतिक इतिहासामध्ये दोन मुख्य तट स्पष्टपणे दिसतात. ते असे एक चैतन्यवादी आणि दुसरे जडवादी मात्र भारतीय परिप्रेक्ष्याप्रमाणे "भारतीय तत्त्वज्ञान म्हणजे वेदान्त आणि वेदान्त म्हणजे भारतीय तत्त्वज्ञान असे समीकरण वेदान्ताच्या बहुतेक पुरस्कर्त्यातर्फे करण्यात येते. वस्तुस्थितीकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करुन अशाप्रकारची भूमिका घेतली जाती. मग वस्तुस्थिती काय आहे. आपल्या इतिहासात वेद विरोधी, चैतन्यवादा विरोधी अनेक तत्त्ववेत्ते आणि पंथ होऊन गेले. इतकेच नव्हे तर फार प्रभावी असे तत्त्ववेत्ते आणि पंथ होऊन गेले, फार आदरणीय आणि बुध्दिमान तत्त्ववेत्ते होऊन गेले. हे आजचे वेदान्ताचे अभिमानी मानण्यास तयार नसले तरी ज्यांनी स्वत: ते तत्त्वज्ञान घडविले त्या ऐतिहासिक पुरुषांनी ते नाकारले नाही."[१८] अर्थात सूर्याला कोणी कितीही झाकून ठेवून त्याचे अस्तित्व नाकारण्याचा प्रयत्न केला तरी ते केवळ अशक्य असते. अगदी असेच आपणला जडवादी  तत्त्वज्ञानासंदर्भात म्हणावे लागेल. केवळ भारतवर्षालाच नव्हे; तर संपूर्ण जगाला लख्ख उजळून टाकणारे तत्त्वज्ञान म्हणून हे तत्त्वज्ञान आज जगन्मान्य झालेले आहे. एकूणच भारतीय तत्त्वज्ञानाचा गंभीरपणे अर्थ लावण्याचे आणि त्यावर भाष्य करण्याचे काम एकोणविसाव्या शतकात पाश्चात्य प्राच्यविद्या पंडितांनी केलेले आहे. त्यात न्युसेन गार्ब अथवा मॅक्सम्युल्लर असेल किंवा भारतीयांमध्ये बाळ गंगाधर टिळक, विनोबा भावे किंवा राधाकृष्णन असतील मात्र या सर्व तत्त्ववेत्यांनी पारंपरिक दृष्टीकोनातूनच आपली भाष्य मांडली. मात्र "विसाव्या शतकाच्या ऐन मध्यान्ही भारतीय तत्त्वज्ञानावर जी भाष्य झाली त्यांच्यात मार्क्सवादी पंडितांचे अतिशय मौल्यवान योगदान आहे. त्यांनी भारतीय तत्त्वज्ञानाची जी मांडणी केली ती सर्वार्थाने नवी होती. कोणतेही तत्त्वज्ञान हे परमेश्वराच्या मुखातून अवतरत नसते, तर ते त्या त्या कालखंडातील कोणत्या तरी समाजशक्तीच्या आवश्यकतेतून निर्माण होते आणि ते त्या त्या समाजशक्तीचे प्रतिनिधी असते, हा विचार पायाभूत मानून भारतीय दर्शनशास्त्राची पुनर्मांडणी करणचे अतिशय महत्त्वाचे काम राहूल सांकृत्यायन, देवीप्रसाद चटोपध्याय यांनी केले आहे. राहूलजींचा 'दर्शन-दिग्दर्शन' हा १९४७ साली प्रसिध्द झालेला ग्रंथ तसेच देवी प्रसादांचे लोकायत (१९५८), इंडियन फिलॉसॉफी

(१९६४), इंडियन ॲथेइसम (१९६९), व्हाट इज डेड ॲन्ड व्हाट इज लिविंग इन इंडियन फिलॉसॉफी' (१९७६) हे ग्रंथ या दृष्टीने अभूतपूर्वच मानले पाहिजेत. १९८६ साली प्रसिध्द झालेला श्रीनिवास सरदेसाई यांचा 'प्रोग्रेस ॲन्ड कॉन्झार्विटिझम इन ऐशन्ट इंडिया' या ग्रंथाचेही योगदान या दृष्टीने मौलिक आहे."[१९] उपरोक्त विचारवंतांचे योगदान वादातीत असेच आहे. भारतीय परिप्रेक्ष्यामध्ये भारतीय तत्त्वज्ञानाचे मार्क्सवादी अन्वेषण सत्याच्या जवळ जाण्यास अडचणीचे ठरण्याची शक्यता अधिक आहे. कारण मार्क्सवादी दृष्टीकोन हा वर्गीय दृष्टीकोन आहे आणि भारतीय वास्तव हे वर्गीय आणि जातीय आहे. स्वत: डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी "अनेकदा युरोपाच्या इतिहासातून निघालेले निष्कर्ष भारतीय इतिहासाला आणि वास्तवाला जसेच्या तसे लावू नयेत असे सांगितले होते."[२०] डॉ. बाबासाहेब यांना अभिप्रेत असलेला दृष्टीकोनातून भारतीय इतिहासाचे व तत्त्वज्ञानाचे अन्वेषण करण्याची अग्रक्रमाची जबाबदारी आंबेडकरवाद्याची होती मात्र बहुतांशजण आत्मकथा, कथा, कविता लिहिण्यातच मश्गुल राहिले. तसे करण्यातही काही गैर नाही मात्र हे करता करता आपली वैचारिक क्षमता वाढविणे ही त्यांची नैतिक जबाबदारी होती मात्र अर्ध्या हळकुंडाने पिवळे होण्यातच व आपल्या उथळपणचे प्रदर्शन करण्यातच धन्यता मानली. अगदी आंबेडकरवादी वैचारिक विश्व फार समृध्द आहे असे म्हणवत नाही. डॉ. रावसाहेब कसबे, सुधाकर गायकवाड, डॉ. आनंद तेलतुंबडे इ. काही अपवादात्मक नावे या संदर्भात सांगता येतील. तरीही आनंदाची किंवा दिलासादायक गोष्ट म्हणजे भारतीय इतिहासाची आणि तत्त्वज्ञानाची बहुप्रवाही अन्वेषण पध्दतीने सशक्त अशी मांडणी करण्याचे काम कॉ. शरद पाटील यांनी फार ताकदीने केलेले आहे. डॉ. रावसाहेब कसबे यांनी या संदर्भात कॉ. पाटलांविषयी गौरवोद्‌गार काढतांना म्हटले आहे, "कॉ. शरद पाटील यांनी नवी मांडणी केलेली आहे. त्यांनी आपल्या अन्वेषण पध्दतीला 'मार्क्सवादी-फुले-आंबेडकरवादी अन्वेषण पध्दती' म्हटले आहे. राहूलजी आणि देवीप्रसाद चटोपध्याय यांच्याकडे भारतीय प्राचीन विद्येचे पांडित्य आणि मार्क्सवादी दर्शनाचे सम्यक आकलन यांचा जसा समासम संयोग दिसतो तसाच शरद पाटलांच्या मध्ये प्राच्चविद्येचे ज्ञान आणि आधुनिक वास्तवाचे आकलन यांचा दुर्मीळ संयोग झालेला आहे. कॉ. शरद पाटील हे

भारतीय इतिहासाचे एक नवे विश्लेषण देत आहेत. त्याची पुर्नमांडणी करीत आहेत. त्यासाठी एक नवी अन्वेषणपध्दती आणि नवे प्रमाणशास्त्र रुढ करण्याचा ते आपल्या सर्व सामर्थ्यानिशी प्रयत्न करीत आहे."[२१] डॉ. रावसाहेब कसबे यांनी ३० वर्षापूर्वी कॉ. पाटलांविषयी वरील गौरवोद्‌गार काढले होते. या तीस वर्षाच्या काळामध्ये जाती वर्ग स्त्री दास्यान्ताच्या क्रांतीसाठी त्यांनी जे वैचारिक योगदान दिले ते अधिकच महत्त्वपूर्ण असे आहे. "त्याचे चार प्रकारात वर्गीकरण करता येईल ते असे: १) बहुप्रवाही ऐतिहासिक भौतिकवाद - अन्वेषण पध्दती २)समाजवादी सौत्रान्तिक मार्क्सवाद-नवे सौंदर्यशास्त्र ३) सौत्रान्तिक मार्क्सवाद- नवे तत्त्वज्ञान ४) जाणीव-नेणीवाचेही तर्कशास्त्र (नवे डायनोलिक लॉजिक)"[२२] जडवादी तत्त्वज्ञानाला कॉम. पाटलांनी दिलेले हे अतिशय मोलाचे योगदान आहे. जातिव्यवस्था सांमती सेवकत्व या ग्रंथामध्ये भारतीय तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रामध्ये झालेल्या दार्शनिक संघर्षाचा उभा आलेख काढून मानवतावादी तत्त्वज्ञानाने सर्व सामान्य माणसाचा किती बारकाईने विचार करत होते हेही स्पष्ट केले आहे. हा संघर्ष कोणकोणत्या तत्त्वज्ञानामध्ये आणि कशासाठी झाला हे फार नेमकेपणाने कॉ. पाटलांनी स्पष्ट केले आहे.

**ब्राह्मणी आणि अब्राह्मणी तत्त्वज्ञान : उभा छेद:-**

तत्त्वज्ञानाच्या जागतिक इतिहासामध्ये चैतन्यवाद व जडवाद किंवा अध्यात्मवाद विरुध्द भौतिकवाद असे दोन तट असले तरी भारतीय परिप्रेक्षामध्ये हे सत्य नव्हे हे सर्वसामान्य भारतीयांपासून दिग्गज विचारवंतापर्यंत सर्वांनाच मान्य आहे. तसे उघडपणे बोलले लिहिलेही जाते. मात्र त्याची सैध्दांतिक मांडणी करण्याचे काम कॉ. पाटलांनी केले आणि ती मांडणी म्हणजे ब्राह्मणी आणि अब्राह्मणी तत्त्वज्ञान होय.

"म.फुल्यांचा पुरस्कार केल्यानंतर कॉ. पाटलांनी ब्राह्मणी अब्राह्मणी हा सिध्दांत मांडला. वैदिक श्रुतीने तांत्रिकी श्रुतीला अब्राह्मणी म्हणून झिडकारले. भारती विचार दर्शनातील पारंपरिक संघर्ष हा पश्चिमी परंपरेप्रमाणे अध्यात्मवाद विरुध्द भौतिकवाद असा नसून तो ब्राह्मणी वाद विरुध्द अब्राह्मणीवाद असे असल्याचे पुरेसे स्पष्ट झालेले आहे असे मत डॉ. यशवंत सुमंत यांनीही मांडलेले आहे. भारतातील एकूण तत्त्वविचार या दोन पारंपरिक

छावण्यामधील अंतरक्रियेमुळे उदयास आलेले दिसते."[२३] कॉ. पाटलांनी त्यांची सैध्दांतिक मांडणी करुन त्यांची वर्गवारी खालीलप्रमाणे सांगितली.

| | ब्राह्मणी | अब्राह्मणी | |
|---|---|---|---|
| १. | वेदान्त / उत्तर-मिमांसा | १. तंत्र | |
| २. | पूर्व-मिमांसा | २. बौध्द- | १) शून्यवाद |
| ३. | न्याय | | २) विज्ञानवाद |
| ४. | वैशेषिक | | ३) वैभाषिक |
| ५. | ब्राह्मणीकृत सांख्य | | ४) सौत्रान्तिक |
| ६. | योग | ३. वृध्द इ सांख्य | |
| | | ४. लोकायत | |
| | | ५. जैन"[२४] | |

अर्थात कॉ. पाटलांनी मांडलेला हा सिध्दांत सर्वमान्य आहे असे नाही आणि खरा विचारवंत अशी अपेक्षाही करत नसतो. डॉ. राधाकृष्णन, देवीप्रसाद चटोपध्याय यांनीही ते मान्यच केलेले आहे. 'ब्राह्मणी व अब्राह्मणी या ध्रुव वस्तु नसून अनोन्यसापेक्ष प्रक्रिया आहेत. या परस्परविरोधी प्रक्रियांच्या एकजुटीने भारतीय गत व वर्तमान जीवनाचे साकल्य बनलेले आहे. "परस्परविरोधी प्रक्रियांच्या वा पक्षाच्या एकजुटीला अनित्यवादाच्या परिभाषेत विरोधाची एकजुट म्हणतात."[२५] आपल्या देशामध्ये जडवाद आणि चैतन्यवाद यांच्यामध्ये जोरदार मुकाबला झालेला आहे. ज्याला आपण दार्शनिक संघर्ष म्हणतो. "खरे तर जडवाद ही संकल्पना डॉ. पाटलांना मान्य नाही. जडवादी ही Materialisim साठी संज्ञा चुकीची आहे. ज्या वस्तु जड नाहीत उदा. विचार इ. या भौतिक आहेत म्हणून भौतिकवाद हीच संज्ञा समर्पक आहे."[२६]

या दार्शनिक संघर्षामध्ये प्रत्यक्ष भौतिक अनुभव आणि तर्कशुध्दता ही जडवाद्याची / भौतिकवाद्याची शक्ती होती. शब्दप्रामाण्यवाद, गुढवाद आणि धनिक व सत्ताधारी वर्गाचा आधार हे चैतन्यवाद्याचे पाठबळ होते. याच्या जोरावरच "स्मृतिकारांनी येथून तेथून सर्व जडवाद्यावर धर्म भ्रष्ट, नीतिभ्रष्ट, वेदनिंदक आणि चातुर्वर्ण्यविरोधक म्हणून हल्ला केला."[२७] मात्र कॉ.

पाटील म्हणतात त्याप्रमाणे ही अब्राह्मणी तत्त्वज्ञाने केवळ वैचारिक क्षेत्रातच नव्हे तर सामान्य लोकांतही बरीच पसरलेली असणार. एरवी त्यांना सतत टक्कर देण्यासाठी चैतन्यवाद्यांना एवढा घाम गाळावा लागला नसता. सर्व अब्राह्मणी तत्त्वज्ञाने दरिद्री व दास यांची ब्राह्मणी तत्त्वज्ञानांकडून फसवणूक होऊ नये यासाठी कमालीचे प्रयत्नशील असल्यामुळे व त्यांची नाळ सर्वसामान्य माणसाच्या थेट हृदयात जुळली असल्यामुळेच त्यांना मोठ्याप्रमाणात लोकांचे समर्थन मिळत होते हेही लक्षात घ्यावे लागते. अन्यथा तत्त्वज्ञाने ही केवळ मुठभरांची मिरासदारी राहत आलेली आहे हाही इतिहास आपणाला लक्षात घ्यावा लागतो. लोकायत हे असेच या जमिनीशी आणि सामान्य माणसांशी घट्ट नाते असलेले तत्त्वज्ञान होते. अतिशय तर्कशुध्द व इहवादी असे हे तत्त्वज्ञान होते. ज्याला चार्वाकदर्शन याही नावाने संबोधले जाते. "चार्वाक हा लोकसमुदाया समोर आपल्या तत्त्वज्ञानाच्या निरुपणाची सुरुवात वेद व कर्मकांडावर हल्ला करुन करतो. नंतर तो वेदाच्या मर्मभेदासाठी बोधिसत्वाच्या अनित्यवादाचे समर्थन करतो. बुध्दाला बोधिसत्वाकडे परत नेऊन बौध्द तंत्राची सुरुवात होते हे लक्षात घेता तो महायानी बोधिसत्वाला उद्देशून बोलतो आहे हे स्पष्ट होते.

"केन आणि बोधिसत्वेन जातं सत्वेन हेतुना।

यद वेद - मर्मभेदस्य जगदे जगद अस्थिस्य।"

तर अडतिसाव्या श्लोकात तो अग्निहोत्र, वेद, सन्यास व भस्त्राचेनाबरोबर मीमांसा तत्त्वज्ञानावरही हल्ला करतो. कोणाच्याही मातापिताकुलामध्ये शुध्दता आढळत नसल्यामुळे कोणीचीही जात शुध्द नाही म्हणजे जातीची उच्चनीचता वृथा आहे असे तो एकोणविसाव्या श्लोकात सांगतो.

"शुध्दं वंशव्दयीशुध्दौ पित्रोः पित्रोर यद् एकशः।

तद अनन्तकुल - अदोषाद अदोष जातिर अस्ति का।।"

स्त्री बद्दलचा त्याचा उदारमतवाद ठायी ठायी दिसतो."[२८] अशा या लोकाभिमुख तत्त्वज्ञानाला चैतन्यवादी बदनाम न करते तरच नवल, मात्र लोकायताने याची पर्वा न करता या अध्यात्मवाद्याचा भंडाफोड करणे चालूच ठेवले. कॉ. पाटील म्हणतात, 'वेद व कर्मकांड यांचे

खंडण केलयानंतर चार्वाक स्मृती-पुराणांकडे वळतो. देशवासियांचे दमन करण्यासाठी धर्म व अधर्माचे कपटाने प्रतिपादन करणाऱ्या आणि असभ्य कर्मकांड व इंद्रियनिग्रहाचा उपदेश करणाऱ्या मनुला पंडितांनी विनाकारण शिरोधार्य केले आहे. धीवर- कन्येशी पराशराने केलेल्या व्यभिचारातून जन्मलेल्या व भावजयीशी व्यभिचार केलेल्या व्यासाच्या पुराण वचनावर श्रध्दा ठेवणारे तुम्ही तांत्रिक (पुराणातील वैदिक तंत्राचे उपासक) मत्स्यावतारी विष्णुचे शिष्य, मत्स्यासारखे तुच्छ असल्याने तुमच्याशी कोण संभाषण करील?' असा मर्मभेदक प्रश्न विचारतो व पुढे "न्याय वैशिषिक तत्त्वज्ञानाचे खंडण करण्याकरिता तो गौतमाच्या मुक्तिसंकल्पनेवर हल्ला करतो. 'तद् अत्यन्त-विमोक्षोपवर्ग अशा :' या वचनानुसार मुक्तीत तत्वांचे ज्ञान झाल्याने प्राण्याला सुखदु:खादींचा अनुभव होत नाही. सचेतन प्राण्याचा अचेतन पाषाणवत मुक्तीचे तत्त्वज्ञान सांगणारा गो-तम नावाप्रमाणेच बैल आहे."[२९] अशा शेलक्या शब्दात अतिशय भेदकपणे न्याय- वैशेषिकांना आणि गौतमाला उघडे करण्याचे काम चार्वाकाने आयुष्यभर केले त्यामुळे सर्व स्मृतीकार / चैतन्यवादी संतापणे साहजिक होते. त्यांनीही चार्वाकावर नींदाव्यंजक शब्दात प्रहार केले व चार्वाकदर्शन म्हणजे सुखवाद्यांचे व भोगवाद्यांचे दर्शन अशी त्यांची निर्भत्सना करण्याचा प्रयत्न केला. मात्र "सुखवादी आणि भोगवादी होणे फक्त वरिष्ठवर्गालाच परवडण्याजोगे असते. ज्यांच्या प्राथमिक गरजाही अजून सुरक्षित झालेल्या नाहीत त्यांची आद्य गरज भोगवादी होण्याची आणि स्वैराचाराची नसते. सर्वसामान्य जनतेची आद्य गरज सर्वांच्या प्राथमिक गरजा निश्चितपणे पूर्ण होतील अशी व्यवस्था उभारण्याची असते. प्राचीनांचाही भौतिकवाद या व्यवस्थेच्या प्रयत्नात उभा आहे."[३०] आणि केवळ म्हणूनच प्रचंड बहुजन समाजावार लोकायतमताचा जबरदस्त प्रभाव होता हे निर्विवाद आहे."[३१] ब्राह्मणी अब्राह्मणी तत्त्वज्ञानातील संघर्षाचे पडसाद तत्कालीन कला साहित्यात पडलेले स्पष्टपणे जाणवते. कॉ. पाटलांनी या संदर्भातील अनेक संदर्भ देऊन ते स्पष्ट करुन दाखवलेले आहे. याठिकाणी आपण केवळ एक संदर्भ पाहू...

"ब्राह्मणी व अब्राह्मणी तत्त्वज्ञानांचा संघर्ष श्रीकृष्ण मिश्रच्या (अकरावे शतक) 'प्रबोध चंद्रोदय या नाटकात नि:संदिग्धपणे दिसतो. दोन तत्त्वज्ञान सैन्याच्या युध्दासाठी सांख्य, न्याय,

कणाद व महाभाषादी शास्त्रांनी युक्त तीन वेदाचे तीन डोळे असलेली मीमांसा एक झाली हे श्रध्देने सांगितल्यावर शांतीने आश्चर्यचकित होऊन विचारले की, स्वभावाने प्रतिद्वंद्वी असलेल्या आगमांचा व तर्काचा समवाय कसा झाला? श्रध्दा उत्तरते की, परस्परविरोधी असले तरी समानवंशी असलेल्यावर जेव्हा परक्याचे आक्रमण होते तेव्हा त्यांचा मेळ होतो. वेदजन्य तत्त्वज्ञानामध्ये अवांतर विरोध असले, तरी ती वेदसंरक्षण व नास्तिक मत खंडण यासाठी एक होतात. अब्राह्मणी सैन्य बौध्द, दिगंबर (जैन) चार्वाक व कापालिक यांचे बनलले होते. त्यांचा नेता महामोह म्हणतो की, सर्वांचे मुखादी आवयव समान असता उच्चनीच वर्णक्रम कशासाठी?"[३२] देवीप्रसादाच्या या विवेचनावर कॉ. पाटील आपले भाष्य पुढीलप्रमाणे नोंदवतात, "या सर्व विवेचनावरुन भारतीय तत्वज्ञानामधील संघर्ष हा वर्ग संघर्ष नसून वर्ण जातिसंघर्ष होता हे स्पष्ट होते."[३३] आणि म्हणूनच कॉ. पाटलांनी भारतीय तत्त्वज्ञानाची वर्गवारी करतांना ब्राह्मणी व अब्राह्मणी दर्शन असा उभा छेद मारला आहे.

यानंतर ज्या निरिश्वरवादी अब्राह्मणी दर्शनाचा भारतात सर्वात व्यापक प्रभाव पडला त्या बौध्द दर्शनाचा संक्षिप्त विचार करु. कारण बौध्द तत्त्वज्ञानाच्या इथल्या ब्राह्मणी तत्त्वज्ञानाशी केवळ संघर्षच नव्हे; तर महासंघर्ष झालेला आहे. स्वत: कॉ. शरद पाटलांनाही बौध्द तत्त्वज्ञानाचे कमालीचे आकर्षण आहे. या संदर्भात त्यांनीच एके ठिकाणी नोंदवून ठेवलेले आहे ते असे, "आंबेडकरांनी मांडलेला बुध्दधम्माच्या मांडणीविषयी माझे मतभेद आहेत. ते असतीलच परंतु एका वेगळ्या अर्थाने मी अधिक प्रमाणात बौध्दवादाकडे मार्गक्रमण करत आहे आणि हे अनिवार्य आहे."[३४] ही अनिवार्यता तात्त्विक स्वरुपाची आहे असे कॉ. पाटलांच्या तत्त्वज्ञानाचे अभ्यासक सचिन गरुड यांना वाटते. ते पुढे जाऊन असे म्हणतात, "बौध्द तत्त्वज्ञानाच्या कालातीत विचाराचे पुनरुज्जीवन आणि नवसर्जन जातीवर्ग स्त्री मुक्तीच्या महाप्रबोधनात पर्यायी संस्कृतीकरणात घडवले पाहिजे."[३५] आणि यासाठीच कॉ. पाटील यांना तत्त्वज्ञान मूळापासून समजून घेण्यासाठी पाली, संस्कृती शिकणे अनिवार्य वाटले. ज्यामुळे ते ओरिजनल बुध्द समजून घेऊ शकले.

गौतम बुध्दाची ज्वलंत प्रेरणा ही तत्त्वज्ञानविषयक नव्हती तर गोरगरीब माणसांच्या

दु:खनिवारणाची होती. तो केवळ विचारप्रवर्तकच नव्हता तर कुशल असा संघटकही होता. त्यामुळे तो अतिशय शिस्तबध्द अशा संघाची स्थापना करु शकलेला आहे. गौतम बुध्दाला समजून घेताना आणखी एक फार मोठी गफलत होते ती म्हणजे त्याला ज्ञान प्राप्त झाल्यापासून त्याच्या शेवटच्या क्षणापर्यंत तो केवळ दु:खमुक्तीचा मार्ग सांगत किंवा धम्माचा प्रचार, प्रसारच करत राहिला. कॉ. पाटील बुध्दाच्या एका फार महत्त्वपूर्ण पैलूकडे आपले लक्ष वेधतात ते असे 'वयाच्या साठीत त्याला मेण्डकापासून दास मुक्तीचे ज्ञान झाल्यापासून त्याने व संघाने दासविमोचनाचा 'पंचधम्म' बहुजनमान्य केला. पण वयाच्या छत्तीसाव्या वर्षी त्याला प्रतीत्यसमुत्पादाचे ज्ञान झाल्यापासून साठीपर्यंतचा काळ केवळ दु:खमुक्तीच्या अध्यात्मिक आदेशात गेला नाही, तर प्रस्थापित वर्ण व नवोदित जात या व्यवस्थांच्या खंडणात गेला. वीस वर्षात त्याने निर्मिलेले समाजक्रांतीचे तत्त्वज्ञान, प्रबोधन व संघटन (संघ) यांच्या जोरावर त्याने पंचधम्माआधारे वर्णीय गणदास प्रथा नष्ट करायची समाजक्रांती केली."[३६] पुढे डॉ. बाबासाहेब आंबेडकरही केवळ मोर्चे / आंदोलन / भाषणे अथवा सासंदिय राजकारणच करत राहिले नाहीत तर ब्राह्मणीव्यवस्थेशी संघर्ष करता करताच वेगवेगळ्या संस्था संघटनांची स्थापना करत समाजक्रांतीच्या तत्त्वज्ञानाची मांडणीही केली आणि या सर्वांच्या बळावर ते प्रजासत्ताक भारताची निर्मिती करण्यात यशस्वी झाले. वर्तमानकाळात परिवर्तनाच्या चळवळीत काम करणाऱ्या सर्वांनीच हे लक्षात घेणे आवश्यक आहे. बुध्दाच्या तत्त्वज्ञानाचा विचार करण्यापूर्वी त्याने जो ब्राह्मणी दर्शनाशी महासंघर्ष केला तो कशाच्या जोरावर याचा थोडक्यात विचार करुयात...

**तर्क : बुध्दाच्या महासंघर्षाचे प्रमुख शस्त्र:-**

कुठलाही बौध्द ग्रंथ वाचायला घेतला तर त्यात एक बाब समान दिसते आणि ती म्हणजे संघामध्ये काय उपासकामध्येही वाद / प्रश्नोत्तरे होतांना दिसतात. अगदी तथागत अनेक प्रश्नांची सोडवणूक प्रश्नोत्तराने करतांना दिसतात. कॉ. पाटील यांनी फार नेमकेपणाने या गोष्टीचा वेध घेतलेला आहे. तो असा 'वर्णव्यवस्थाक गणदासप्रथे विरुध्द बुध्दाने निर्णायक संघर्ष उभारल्यानंतरच्या काळात तक्कट (तर्क) शब्दाचा प्रथम अढळ होतो. हे अधिक स्पष्ट

करण्यासाठी कॉ. पाटील पुढील उदाहरण देतात. 'महासेद्दी अनाथपिंडक मेल्यानंतर देवपुत्र होऊन रात्री बुध्दाच्या दर्शनाला आला आणि त्याने म्हटलेल्या गाथेत सारीपुत्ताची प्रशंसा केली. दुसऱ्या दिवशी बुध्दाने भिक्षुंना रात्रीचा प्रसंग सांगतांना अनाथपिंडिकाचे नाव गाळले. आनंद म्हणाला, "तो देवपुत्र जरुर अनाथपिडिक असला पाहिजे, कारण अनाथपिंडिक सारीपुत्तावर अत्यंत प्रसन्न होता."

बुध्द उद्‌गारला, "धन्य, धन्य आनंद! जेवढे काही तर्कान मिळवायला पाहिजे तेवढे तू मिळवले आहेस..."[३७] पुढे १९व्या शतकामध्ये म.जोतिराव फुले यांनी तर्काचा अतिशय प्रभावीपणे वापर केला आहे. हेही या निमित्ताने लक्षात यावे. बुध्दाचा धम्म नुकताच सोडून गेलेल्या सुनक्खताने तर्काचा नकारात्मक अर्थ बुध्दावर लादलेला आहे. मात्र कॉ. पाटील म्हणतात 'त्या अर्थाने बुध्दाने तर्काचा वापर कधीच केला नाही. वादात त्याने प्रतिपक्षियांचे जे अकाट्य पराभव केले तेही नकारात्मक नव्हते, तर वर्णात्मक समाज क्रांतीकडे नेणाऱ्या आपल्या तत्त्वज्ञानाचे सिध्दांत प्रतिपक्षियांना पटवण्याकरता होते. हे विधायक वादकौशल्य त्याने आपल्यापुरते ठेवले नाही तर त्यात त्याने आपल्या भिक्षुभिक्षुणींना, उपासक-उपासिकांना पारंगत केले."[३८] परिणामी बुध्दाच्या निर्वाणानंतरही त्यांच्या महाशिष्यांनी इथल्या जातिय व्यवस्थेविरुध्द शूद्रातिशूद्राच्या वैचारिक व व्यावहारिक संघर्षाला मार्गदर्शन करायचे काम चालू ठेवले. अगदी आजही शुध्द विज्ञानवादी आणि तर्कनिष्ठ तत्त्वज्ञान म्हणून संपूर्ण जग केवळ बुध्दाकडेच पाहते म्हणजे बुध्दाने तर्क या शस्त्राचा अतिशय प्रभावी असा वापर केला. कॉ. पाटलांनाही वर्तमानकालीन परिवर्तनवादी चळवळीसाठी या तर्कशास्त्राचे स्वरुप सिध्द करणे अत्यावश्यक वाटते. या संदर्भात प्रदीप गोखले तर म्हणतात, "व्दंद्वात्मक तर्कशास्त्राचे स्वरुप सिध्द करणे हा पाटलांचा कित्येक वर्षापासूनचा ध्यास होता. हा एका संशोधकाचा ध्यास होता."[३९] आणि पाटलांनी आपला हा ध्यास प्रिमिटीव्ह कम्युनिझम, मातृसत्ता, स्त्रीसत्ता आणि भारतीय समाजवाद या ग्रंथाबरोबरच इतरही महत्त्वपूर्ण ग्रंथलेखनाच्या माध्यमातून पूर्ण केला.

मानवी प्रश्नाच्या सोडवणूकीसाठी बुध्दाने विश्लेषणात्मक युक्तिवादाचा मार्ग आवलंबला. तत्कालीन चिंतनशील समाधीचे पध्द्‌तीशास्त्र वापरुन त्याने मानवी अस्तित्त्वाबाबत अत्यंत

मूलगामी सिध्दांत दिले. बौध्द धर्माचे संपूर्ण सार या सिध्दांतामध्ये सामावलेले आहे. आपल्याला हे सिध्दांत बौध्द तत्त्वज्ञानात अतिव्याप्त स्वरुपात सापडतात."[४०] आपल्याला याठिकाणी बुध्दाने कोणते तत्त्वज्ञान मांडले आणि त्याचे स्वरुप काय होते याचा विचार करावयाचा नाही. बुध्दाचे तत्त्वज्ञान प्रतीत्य समुत्पादी होते, अनात्मवादी होते, निरीश्वरवादी होते, अनित्यवादी होते, अब्राह्मणी होते हे वर वर का होईना आपणास माहित आहे आणि या तत्त्वज्ञानाचे अन्वीक्षन करणे हा आपला विषय नाही. मात्र बुध्दाने तत्कालीन कालखंडात केलेला दार्शनिक संघर्ष कसा होता याचा संक्षीप्त विचार करावयाचा आहे.

**बुध्दाचा दुहेरी दार्शनिक संघर्षः-**

कॉ. शरद पाटलांनी सर्वच अब्राह्मणी तत्त्वज्ञानाचा ब्राह्मणी तत्त्वज्ञानाबरोबर कशा पध्दतीने दार्शनिक संघर्ष झाला याचा आलेख काढून गौतम बुध्दांना तर हा संघर्ष दुहेरी करावा लागला त्यामुळे हा संघर्ष अधिकच गुंतागुंतीचा होता असे म्हटलेले आहे. मुळात "बुध्दाच्या काळात त्याला सोडून सहा तत्त्वज्ञानी होते. त्यांना तीर्थकार म्हटलेले आहे. एक महावीर, दुसरा मक्खली गोसाल, तिसरा पुरण कस्सप, चौथा संजय बेलट्ठिपुन्त, पाचवा अजित केसकम्बली आणि सहावा पलुध कच्चान. त्यांच्यामध्ये महावीराचा अपवाद सोडला, तर बाकीचे सर्व उच्छेदवादी, नकारात्मक अर्थी आहेत. पाप नाही, पुण्य नाही, दान-यज्ञ झुठ आहेत, परलोक नाही अशाप्रकारची मांडणी करतांना ते दिसतात. ते जसे उच्छेदवादी आहेत, तसे ते महावीरासह निरीश्वर वादीही आहेत."[४१] म्हणजेच ते अश्रध्द अशाप्रकारची मांडणी करतात. म्हणजे पुरण कस्सप तर सांगतो की, एखाद्या माणसाने तलवार हाती घेऊन माणसाची कत्तल जरी केली तरी त्याला पाप लागणार नाही किंवा महावीर सांगतो 'शरीराला आजन्म क्लेश दिल्याने आत्मक्लेशातून, शेवटी प्रायेपवेशनाने, आत्महत्येतून, मोक्ष मिळतो, कैवल्य मिळतो' हे निराशावादी तत्त्वज्ञान आहे. मक्खालि गोसाल, नियंतिवादाचा उपदेश करतो तो सांगतो, "मानवी जवीनाचे अगोदरचे सर्वकाही नियतीने ठरवून टाकलेले असते, कुठल्याही प्रकारे ते बदलू शकत नाही, पुरुषार्थाने जीवन बदलू शकत नाही हाही निराशावाद आहे. अजित केसकम्बली हा त्यावेळचा भौतिकवादी आहे. त्याने सुध्दा उच्छेदवादी पर्याय मांडला."[४२] ही

तत्त्वज्ञाने वर्ण व्यवस्था विरोधी निरीश्वरवादी असल्यामुळे अब्राह्मणी वर्गाला जवळची वाटणे सहाजिक आहे मात्र अशा नैराश्यात्मक भूमिकेमुळे समाजमन बदलतही नसते आणि त्याच्यात प्रसन्नताही निर्माण होत नसते. बुध्दाला तर संपूर्ण मानवजाती बद्दल आणि त्यांच्या दु:खाबद्दल अतिव सहानुभूतीच नव्हे तर करुणाही वाटत होती. त्याने अथक प्रयसाने दु:खाचे कारण आणि उपायही शोधला होता. त्याला दु:खमुक्त, भयमुक्त, वर्णमुक्त, अंधश्रध्दा मुक्त, विषमतामुक्त आणि विज्ञानवादी व समतावादी समाज निर्माण करावयाचा होता. एका बाजूला हे उच्छेदवादी तत्त्वज्ञान तर दुसऱ्या बाजूला वर्णव्यवस्थेचे समर्थन करणारे वेदान्ती तत्त्वज्ञाने आहे, परब्रह्माचे तत्त्वज्ञान आहे. पृथ्वीविषयी आणि पृथ्वीवरील माणसाच्या दु:खाविषयी हे तत्त्वज्ञान ब्र शब्द काढत नाही. उलट हा अब्राह्मणी माणूस अधिकाधिक अंधश्रध्द आणि परावलंबी कसा बनेल याची तो काळजी घेतोय, या तत्त्वज्ञानाचा पुरस्कार करण्यात ब्राह्मण वर्णाचा पुढाकार आहे हे तत्त्वज्ञान येथील वर्णव्यवस्था कायम राहण्यासाठी प्रयत्नशील आहे. समाजक्रांतीचा प्रवर्तक असलेल्या गौतम बुध्दाचा या तत्त्वज्ञानाशी तर अटळ असा संघर्ष आहे. म्हणून कॉम. पाटील म्हणतात, "एका बाजूला वर्णव्यवस्थेचे जे समर्थक आहेत त्यांच्या ईश्वरवादाला विरोध आणि दुसऱ्या बाजुला जे निरीश्वरवादी आहेत परंतु उच्छेदवादी, निराशावादी आहेत त्यांना विरोध, अशा प्रकारचे बुध्दाच्या तत्त्वज्ञानाचे दुहेरी कार्य आहे."[४३] बुध्द सांगतो ही दोन्ही टोके टाळले पाहिजेत. हे दोन टोक कोणते. तथागताच्याच शब्दात पाहू "कामोपभोगांमध्ये आसक्त होणे आणि स्वत:ला क्लेश देणे, ही दोन्ही टोके टाळणारा मध्यम मार्ग स्वीकारावा."[४४] आणि हा जो मार्ग आहे तो सुरुवातीला, मध्यात आणि शेवटीही कल्याणकारक आहे. त्यासाठी बुध्दाला या दोन्ही तत्त्वज्ञानाशी संघर्ष करण्यात काही गैर वाटलेले नाही. मात्र हा संघर्ष किंवा वाद करताना तथागत बुध्दाने आपला उमदेपणा अणुभरही सोडलेला नाही. "कॉम. पाटलांना वर्तमान परिप्रेक्ष्यात तर ते अधिकच महत्त्वपूर्ण वाटते म्हणून ते म्हणतात, "समाज क्रांतीत बुध्दाचे मुख्य विरोधक वैदिक ब्राह्मण असूनही त्याने त्यांच्याशी विषमतादींवर केलेले लोकशाहीपूर्ण बौध्दीक वाद, अब्राह्मणी तटातल्या महावीरासारख्या तीर्थंकराशी व त्यांच्या शिष्यांशी त्याची उमदी वागणूक मतभेदात शत्रुत्व पाहणाऱ्या डाव्या पक्षांना अनुकरणीय आहे. रवींद्रनाथ टागोर म्हणाले

होते की, मुक्ती ज्ञानातून मिळते आणि ज्ञान वाग्युध्दांमधून वाढते. म्हणून वाग्युध्दे लोकशाहीचा भाग आहेत."[४५] लोकशाहीवर प्रेम करणाऱ्या सर्वांनीच ही गोष्ट लक्षात ठेवण्यासारखी आहे.

तथागत गौतम बुध्दानंतर सुध्दा जातिव्यवस्था विरोधाची प्रवृत्ती टिकून राहिली त्याचे कारण बुध्दानंतरही नागार्जुन, वसुबंधू, दिग्नाग, धर्मकीर्ती असे अनेक बौध्दचिंतक होऊन गेले. ते तत्त्वज्ञानाच्या साह्याने जातिव्यस्थेशी लढले. त्यातील दिग्नागवर तर कॉ. पाटलांचे नितांत प्रेम. ते किती सुंदर शब्दात व्यक्त करतात ते त्यांच्याच शब्दात पाहू.

"आणि मग येतो सौत्रान्तिक विज्ञानवादाने विधायक नकार देणारा दिग्नाग भारताच्या तत्त्वज्ञानाचा सूर्य."[४६] तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रात दिग्नागचा प्रचंड धाक होता. याचे उदाहरण कालिदासाच्या 'मेघदूत' मध्ये आपणाला पाहायला मिळते. त्यातील यक्ष मेघाला सांगतो, "मेघा! तुला दिग्नागच्या (आंध्र) राज्यावरुन जावे लागेल!" बागभट्टाच्या 'हर्षचरित' मध्ये म्हटले आहे की, "वाद सभेत दिग्नागच्या प्रतिस्पर्ध्यांना दुसरे काही दिसत नाही, दिसतं ते असे की वाद करताना यम दंडाप्रमाणे हलणारा दिग्नागचा डावा हात. एवढा धाक होता त्याचा दिग्नाग हा भारतीय लॉजिकचा प्रवर्तक नसला, तरी तो ॲरिस्टॉटलच्या लॉजिकपुढे भारतीय लॉजिकला नेतो."[४७] दिग्नाग चे महानत्व सिध्द करण्यासाठी कॉ. पाटील चेर्बोत्स्की व सत्करी मुकर्जी यांचा हवाला देतात तो असा, "सरु चेर्बोत्स्की म्हणतात की, दिग्नागने आपले विज्ञानवादित्व 'प्रज्ञापरमिता-विकार्थ' व 'आलम्बन-परीक्षा' या कृती लिहून स्पष्ट केले आहे, तर तर्कशास्त्राची महान वास्तु उभारुन आपले टीकात्म बाह्यार्थ वादित्व सिध्द केले आहे."[४८] सत्कर मुकर्जी म्हणतात की, "दिग्नागने तर्कशास्त्र व प्रमाणशास्त्र यात सौंत्रान्तिक भूमिका घेऊन त्यातील अतीन्द्रियाव्दारे + (Critical Ecalism) योगाचार विज्ञानवादाशी संधिजोड केली आहे."[४९] अब्राह्मणी तत्त्वज्ञानाच्या मांदियाळी मधला दिग्नाग खरोखरच कसा सूर्य होता हे निर्विवादपणे नोंदवताना कॉ. पाटील म्हणतात, "न्यायवैशेषिक विरोधी दिग्नागाचा सौत्रान्तिक विज्ञानवाद यांच्यामध्ये जी लढाई झाली ती लॉजिकने झाली, आणि अशी लढाई जगाच्या कोणत्याही तत्त्वज्ञानामध्ये झालेली नाही."[५०] धर्मकिर्ती हा सुध्दा भारताचा सर्वात मोठा तत्त्वज्ञानी होता असे लोर्बोत्सकीने म्हटलेले आहे.

अशाप्रकारे लोकायतपासून अगदी फुले आंबेडकरांपर्यंतच्या अब्राह्मणी दार्शनिक संघर्षाचे दिग्दर्शन कॉ. पाटलांनी ज्या विद्वतपूर्णपध्दतीने केलेले आहे ते केवळ थक्क करुन सोडणारे आहे. इतकेच नव्हे तर त्यांनी जे जातीवर्ग आणि स्त्री दास्यन्ताच्या क्रांतीसाठी योगदान दिलेले आहे. मार्क्स- फुले- आंबेडकरवाद, बहुप्रवाही ऐतिहासिक बहुप्रवाहीवाद, समाजवादी सौत्रान्तिक वाद, सैत्रान्तिक मार्क्सवाद आणि जाणीव-नेणिवान्वेषी तर्कशास्त्र या सिध्दांताची मांडणी केलेली आहे. त्यांच्या या योगदानाने त्यांना या अब्राह्मणी महान दार्शनिक परंपरेत सन्मानाने विराजमान केलेले आहे.

**संदर्भ-**


१) चव्हाण रमेश (संपा.) क्रांतिकारी सत्यशोधक कॉम्रेड शरद पाटील, हर्मिस प्रकाशन, पुणे, प्र. आ. १२ एप्रिल २०१७, पृ.क्र.३०.

२) कोसम्बी राहूल, उभं आडवं, शब्द पब्लिकेशन, बोरविली, तिसरी आवृत्ती-२०१७, पृ.क्र.२१४.

३) पाटील शरद, जातिव्यवस्थाक सामंती सेवकत्व, मावळाई प्रकाशन, शिरुरु पुणे, व्दितीय आवृत्ती, १७ सप्टें.२०१७, पृ.क्र.२८.

४) तत्रैव, उधृत, पृ.क्र.२४, २५.

५) उनि, चव्हाण रमेश, पृ.क्र.१५७.

६) उनि, पाटील शरद, पृ.क्र.३४

७) उनि, कोसंबी राहूल, पृ.क्र.२१८.

८) तेलतुंबडे आनंद, साम्राज्यवाद विरोध आणि जाती विनाश, सुगावा प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती, नोव्हें.२००७, पृ.क्र.३८.

९) उनि, कोसंबी राहूल, प्र.क्र.२१८.

१०) उनि, पाटील शरद, पृ.क्र.२६.

११) तत्रैव, पृ.क्र.२६.

१२) उनि, कोसंबी राहूल, पृ.क्र.२१९.

१३) माळी सचीन, जातिअंत सांस्कृतिक क्रांतीचे आत्मभान, लोकवाङ्मय, मुंबई, चौथी आवृत्ती-२१८, पृ.क्र.४२.

१४) उनि, पाटील शरद, पृ.क्र.७४.

१५) तत्रैव, पृ.क्र.७५.

१६) कसबे रावसाहेब, आंबेडकरवाद तत्त्व आणि व्यवहार, सुगावा प्रकाशन, पुणे, द्वितीयावृत्ती-२००४, पृ.क्र.२८ वरुन उध्दृत.

१७) एस.जी. सरदेसाई, भारतीय तत्त्वज्ञान वैचारिक आणि सामाजिक संघर्ष, लोकवाङ्मयगृह, मुंबई, सातवी आवृत्ती-२०१४, पृ.क्र.०६.

१८) तत्रैव, पृ.क्र.१५.

१९) उनि, कसबे रावसाहेब, पृ.क्र.२५.

२०) तत्रैव, उधृत, पृ.क्र.२५.

२१) तत्रैव, पृ.क्र.२६.

२२) उनि, चव्हाण रमेश, पृ.क्र.२३४.

२३) तत्रैव, पृ.क्र.१९८.

२४) उनि, पाटील शरद, पृ.क्र.१९७.

२५) उनि, चव्हाण रमेश, पृ.क्र.११८.

२६) उनि, पाटील शरद, पृ.क्र.१२६.

२७) उनि, सरदेसाई एस.जी., पृ.क्र.४९.

२८) उनि, पाटील शरद, पृ.क्र. १२८, १२९.

२९) तत्रैव, पृ.क्र.१३०, १३१.

३०) गाडगीळ स. रा., लोकायत, लोकवाङ्मय गृह, मुंबई, चौथी आवृत्ती, जाने.२००८, पृ.क्र.२३.

३१) तत्रैव, पृ.क्र.१३.

३२) उनि, पाटील शरद, पृ.क्र.१३१, १३२ वरुन उधृत.

३३) तत्रैव, पृ.क्र.१३२.

३४) उनि, चव्हाण, पृ.क्र.२३७.

३५) तत्रैव, पृ.क्र.२३७.

३६) उनि, पाटील शरद, पृ.क्र.१४२.

३७) तत्रैव, पृ.क्र.१४३.

३८) तत्रैव, पृ.क्र.१४४.

३९) उनि, चव्हाण रमेश, पृ.क्र.२२५.

४०) तेलतुंबडे आनंद, बुध्दविचार : मार्क्सवादी दृष्टिक्षेप, लोकवाङ्मय गृह, मुंबई, चौथी आवृत्ती, डिसें.२०११, पृ.क्र.०७.

४१) पाटील शरद, भारतीय तत्त्वज्ञान व नास्तिक मत, लोकसाहित्य प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती २०१३, पृ.क्र.१९.

४२) तत्रैव, पृ.क्र. २०.

४३) तत्रैव, पृ.क्र. २०.

४४) साळुंखे आ. ह., सर्वोत्तम भुमिपुत्र : गौतम बुध्द, लोकायत प्रकाशन, सातारा, बारावे पुनर्मुद्रण, एप्रिल २०१९, पृ.क्र.०२.

४५) पाटील शरद, जात्यान्तक भांडवलदारी लोकशाही क्रांती व तिची समाजवादी पूर्ती, सुगावा प्रकाशन, पुणे, आवृत्ती पहिली, २००३, पृ.क्र.६०.

४६) उनि, पाटील शरद, भारतीय तत्त्वज्ञान व नास्तिक मत, पृ.क्र.२४.

४७) तत्रैव, पृ.क्र.२४.

४८) उनि, पाटील शरद, जातिव्यवस्था सामंत सेवकत्व, उधृत, पृ.क्र.१५९.

४९) तत्रैव, पृ.क्र.१५९, उधृत.

५०) उनि, भारतीय तत्त्वज्ञान व नास्तिक मत, पृ.क्र.२६.

## प्रकरण - चौथे

# रामायण महाभारतातील वर्ण संघर्षाचा अन्वयार्थ

रामायण आणि महाभारत ही भारतीयांसाठी नेहमीच पूज्य व आदरणीय ग्रंथ राहत आलेले आहेत. जनसामान्य माणसावरील या ग्रंथाचा प्रभाव केवळ अवर्णनीय असाच आहे. आजही तो प्रभाव कायम आहे. इतकेच नव्हे; तर भारतीय वाङ्मय आणि इतर कलावरही या ग्रंथाचा प्रभाव पडलेला स्पष्टपणे जाणवतो. हा प्रभाव विशद करतांना नरहर कुरुंदकर म्हणतात. "सर्व देशी भाषा आपल्या आरंभापासूनच महाभारताच्या आधारेच समृध्द होत आल्या तशाच सगळ्या भारतीय वाङ्माच्याच समृध्दीचा एक आधार म्हणून महाभारताकडे पाहिले पाहिजे."[१] आणि म्हणूनच या ग्रंथाचा चिकित्सक शोध अनेकानेक अभ्यासकांनी घेतलेला आहे. यामध्ये बाळ गंगाधर टिळकांपासून दुर्गाबाई भागवत, वि. का. राजवाडे, नरहर कुरुंदकर ते आजच्या रविंद्र शोभणे यांच्यापर्यंत तसेच म. जोतिराव फुले यांच्यापासून डॉ. बाबासाहेब आंबेडकर, भदन्त डॉ. आनंद कौशल्यायन, डॉ. यशवंत मनोहर, डॉ. आ. ह. साळुंखे, प्रा. अरुण कांबळे ते कॉ. शरद पाटील यांच्यापर्यंत आणखीही बरेच नावे सांगता येतील. या दोन्ही ग्रंथांना खरेतर अनेक पैलू आहेत. म्हणून विचारी वाचकांसमोर या ग्रंथाचे वाचन करत असताना हे ग्रंथ वाचावे तरी कसे? असाच प्रश्न निर्माण होणे अगदी नैसर्गिक असेच आहे. हा पेच कमी अधिक प्रमाणात सोडविण्याचा प्रयत्न कुरुंदकरांनी केलेला आहे. कुरुंदकर त्यांच्या चिरपरिचित शैलीमध्ये म्हणतात, "मी ते इतिहास शोधण्यासाठीही वाचतो, संस्कृतीची रुपे व विविधता शोधण्यासाठीही वाचतो; मला फक्त धर्मश्रध्देने अजून महाभारत वाचणे जमले नाही. पण कोट्यावधी भारतीय हा ग्रंथ श्रध्देने वाचतात, तेव्हा या भूमिकेवरुन होणारा अभ्यास मी वर्ज्य मानू इच्छित नाही."[२] कुरुंदकर म्हणतात त्यात वरवर पाहता तथ्य वाटेलही मात्र चिकित्सक संशोधकाची जबाबदारी समाजाला डोळस पायावर उभे करण्याची असते. समाज तर्कशुध्द बनवण्याची असते नाही की त्याच्या धर्म श्रध्देला अधिष्ठान देण्याची. सर्वच प्रश्नांकडे भावनेने पाहणे धोकादायक ठरण्याचीच शक्यता अधिक असते. नरहर कुरुंदकर सारख्यांच्या उपरोक्त भूमिकांमुळेच "रामायण म्हणजे प्रभू राम विरुध्द राक्षस - शूद्र रावण आणि महाभारत म्हणजे कृष्ण प्रणीत पांडव विरुध्द राक्षसावतार कौरव यांच्यातील संघर्ष मानून ब्राह्मणी प्रबोधन

हजारो वर्षापासून चालू आहे."[३] आणि अशाप्रकारच्या प्रबोधनामुळे समाज झापडबंद होतो. पर्यायाने सत्य स्वीकारणे त्याला कमालीचे कठीण जाते. याचा अनुभव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा 'Riddles of Hinduism' हा संशोधन ग्रंथ प्रकाशित झाल्यानंतर संपूर्ण भारताने घेतलेला आहे. तर्कशुध्द विचाराचे अधिष्ठान असल्याशिवाय कुठलाही समाज आणि पर्यायाने राष्ट्रही पुढे जात नसते. लोकायत, बुध्द, कबीर, फुले, आंबेडकर ही अशाप्रकारचे तर्कशुध्द विचाराचे अधिष्ठान देणारी डोळस बेटं म्हणून पहावी लागतात. या विचारांचे अधिष्ठान स्वीकारण्या बरोबरच मार्क्सवादी अन्वेषण पध्दतही महत्त्वाची मानून नव्या विधायक अब्राह्मणी अन्वेषणपध्दतीने कॉम. शरद पाटील यांनी रामायण महाभारत या ग्रंथाचा अन्वयार्थ लावलेला आहे. म्हणून ते पारंपरिक प्रबोधनापेक्षा पूर्णपणे वेगळे आहे. त्यांचे वेगळेपण नोंदवतांना ते म्हणतात, "अब्राह्मणी प्रबोधन रामायणातील अंतरिक संघर्ष राम विरुध्द सिता आणि महाभारतातील अंतरिक संघर्ष तांडव विरुध्द द्रौपदी हे वास्तविक सूत्र धरुन मी करतो आहे."[४] डॉ. सरकार आणि डॉ. सांकलिया यांना महाभारत व रामायणाचे महान संशोधक म्हणून मानले जाते. डॉ. सरकार यांना महाभारत पूर्णपणे काल्पनिक वाटते तर डॉ. सांकलिया "संशोधित आवृत्तीतला बराच भाग सुध्दा काल्पनिक आहे; पण त्यातला गाभा मात्र इतिहास आहे, जो पुराण वस्तु संशोधनाव्दारेच उलगडला जाऊ शकतो."[५] मात्र कॉ. शरद पाटील या दोन्ही संशोधकांच्या उपरोक्त भूमिकेला बिनतोड युक्तीवादाने निकाली काढतात. ते म्हणतात, "पण काय पुराण वस्तु संशोधनाचे उत्खनन कालपुरुषाच्या तावडीतून या इतिहासाची सर्व किमान अत्यावश्यक साधने मिळवू शकते? आणि मिळवलेले अवशेष काय बोलू शकतात? आसाममधील खांसीची स्त्री सत्ताक समाजव्यवस्था व केरळच्या मल्याळींची मातृवंशाक समाजव्यवस्था या खरं पाहता प्राचीनतम समाज पध्दतींपैकी आहेत; पण त्या आधुनिक काळापर्यंत अबाधित राहिल्या. त्यांना पुराणवस्तु संशोधनाच्या अवजारांच्या व कार्बन-१४च्या आधारावरील कालनिर्णय कसा लागू पडेल?"[६] कॉ. पाटलांची भूमिका अधिक समर्थनीय वाटते. पाटलांच्याच भूमिक जवळ जाणारी भूमिका महान पुराणवस्तुसंशोधक प्रा. दामोधर कोसंबी यांनी मांडली आहे. आपल्या पुराणवस्तु संशोधन संदर्भात फार आग्रही भूमिका न घेता अतिशय संयत शब्दात ते आपल्या 'पुराणकथा आणि वास्तवता' या सुप्रसिध्द ग्रंथात आपली भूमिका विशद करतात "आपल्या शोधनिबंधाचा उद्देश्य योग्यायोग्यता ठरविणे नाही. होईल तितका आपल्या इ

ाानाचा उपयोग करुन परिस्थितीचे विश्लेषण करणे इतकाच उद्देश्य आहे."[७] खरा संशोधक अशाच निव्वळ भूमिकेतून आपले संशोधन मांडत असतो. त्यामुळे संशोधन आणि समाजही पुढे जात असतो.

**महाभारतातील युध्द हे गण युध्दच:-**

महाभारतातील युध्द खरे म्हणजे 'कौटुंबिक संघर्ष होता. जो फक्त कुटुंबांच्या सदस्यांमध्ये घडून आला व ज्यात इतर राज्यकर्ते सहभागी झाले असे डॉ. सांकलियांचे प्रतिपादन आहे. याच्या पुष्ट्यर्थ ते म्हणतात, "तो काळ महाकाव्यातील ग्रीकाप्रमाणे लोह युगाचा असल्याने तेव्हा केवळ द्वंद्व युध्देच होऊ शकत, आणि अशाप्रकारे दोन सैन्यांमध्ये अनिर्बंध युध्द व्हायचा काळ आलेला नसल्याने महाभारतीय युध्द हे छोटे युध्द होते. महाभारत हा ग्रंथ बुध्दोत्तर कालखंडातील आहे. त्याचबरोबर हा ग्रंथ सतत प्रक्षेप होत जाणारा ग्रंथ आहे. डॉ. डी. बी. लाल यांच्या मते 'परेड ग्रे वेअर संस्कृतीचे अस्तित्त्व इ.स. ११०० ते इ. स. ७२० असे आहे. या कालखंडात भारतीय युध्द झाले असेल.' डॉ. सरकार म्हणतात, "महाभारत ही कल्पीत कथा आहे आणि आजच्या महाभारतानुसार कौरव पांडवांची लढाई १८ दिवस झाली. ती कुरुक्षेत्राच्या रण मैदानावर झाली. दोन्ही बाजूंनी १८ अक्षौहिणी सैन्य होते."[८] महाभारत हा श्रध्देचा विषय असल्यामुळे त्याला अधिक रंजक करण्याचा प्रयत्न झाला हे तर निश्चित आहे. कॉ. शरद पाटील यांनी या सर्व मतमतांतरांचा वेध घेऊन महाभारतातील युध्द हे गणयुध्द होते असा निष्कर्ष काढला आहे. "महाभारतातील युध्दातील सैन्यांचे अक्षौहिणीचे आकडे अतिरंजित आहेत खरे; पण त्याला भाऊबंदकीचा झगडा लेखणे हे वैज्ञानिक इतिहास संशोधन व आकलन खास ठरु शकत नाही."[९] असे स्पष्ट करुन कुटुंब ही संस्था बुध्दाच्या जीवनकालात प्रथमच उदयाला आलेली होती तीही मगध, कोसल, वतस, अवंती व अगणी या सामंतप्रथाक राजसत्तांमध्ये बाकीचा भारत आदिवासी जमातींनी, राजक गणांनी व अराजक संघगणांनी व्यापलेली होती. या गण समाजांचा प्राथमिक घटक अजून एकुलच होता, कुटुंब नव्हता. याच्या स्पष्टीकरणासाठी त्यांनी बुध्दाच्या अंतिम दर्शनासाठी मल्लगणीय आले. तेव्हाच प्रसंग उधृत केला आहे. बुध्दकालीन गणसभेचे तपशिलवार विवेचन करुन एक गण सरासरी १००० योध्दे

रणांगणावर उभे करु शकत असे हे साधार स्पष्ट केलेले आहे व त्यानंतर महाभारतीय युध्दात भाग घेणाऱ्या गणांच्या यादीतील प्रक्षिप्त गण वगळून युध्दात भाग घेणाऱ्या गणांची यादीच कॉ. पाटील देतात. ती याप्रमाणे- "१) कुरु २) गांधार ३) बाहलीक ४) सिंधू ५) मद्र ६) अवंती ७) पुरु ८) कोसल ९) प्राग्जोतिष १०) अंग व ११) अत्सबुध हे कौरवांकडून लढले. १) पांडव २) पांचाल ३) मस्य ४) हिडिंब ५) मगध ६) चेदि ७) काशी हे पांडवांकडून अशाप्रकारे दोन्ही बाजूंनी किमान एकूण अठरा तरी गण लढले, म्हणून कुरु क्षेत्रावर लढलेल्या एकूण योध्यांची संख्या किमान १८,००० तरी असावी, उत्तर भारताची त्यावेळची लोकसंख्या विचारात घेता त्या युगातले ते सर्वात मोठे युध्द होते यात शंका नाही."[१०] यावरुन स्पष्ट होते की महाभारतातील युध्द हे कौटुंबिक नव्हते लुटुपुटुची लढाईही नव्हती तर ते गणांमध्ये झालेला मोठा रणसंग्राम होता.

**रामायण महाभारताचे क्रांतिकारी विश्लेषण:-**

रामायण आणि महाभारताचा अनेक विद्वान पंडितांनी अन्वयार्थ लावलेला आहे. देव विरुध्द दानवाची लढाई म्हणजे रामायण आणि कौरव विरुध्द पांडवांची लढाई म्हणजे महाभारत असेच या अन्वयाचे सूत्र राहत आलेले आहे. मात्र कॉ. शरद पाटील यांनी रामायण महाभारताचा लावलेला अन्वयार्थ केवळ क्रांतिकारी असा आहे. रामायण म्हणजे काय हे निर्णायकपणे नोंदवतांना कॉ. शरद पाटील म्हणतात, "रामायणाचे सूत्र आहे मावळती स्त्री सत्ता (गायनॉक्रसी) व उगवती पुरुषसत्ता यांचा निर्णायक संघर्ष. मलद-पुरुषांच्या जनपदाची राणी ताटका हिचा रामाने केलेला वध व जनस्थानची राणी शूर्पणखा हिचे लक्ष्मणाने केलेले विद्रुपीकरण हे या निर्णायक संघर्षाचे दिग्दर्शन करतात. तर महाभारत म्हणजे दासप्रथाक राजर्षिसत्ता व दासप्रथाक मातृवंशाक राजर्षिसत्ता यांच्यातला संघर्ष होता."[११] वस्तुस्थिती अशी असतांना मूळ भारतीयांवर गुलामी लादण्यासाठी इतिहासाचे मोठ्या प्रमाणात विकृतीकरण करण्यात आले. क्रांतिकारी लढवय्या योध्यांना जाणीवपूर्वक कुरुप आणि क्रूर करुन सादर करण्यात आले. याला संशोधक अभ्यासक जसे जबाबदार आहेत त्याचप्रमाणे साहित्यिक कलावंतही आणि या सगळ्यांमध्ये दूरदर्शनवरील रामायण आणि महाभारत या टी.व्ही.

मालिकांनी फार मोठी भर टाकली. या सर्व विकृतीकरणामुळे महाभारतातील अनेकानेक व्यक्तींचा मुळ चेहराच हरवून गेला अशीच गोष्ट मूळ भारतीय महापुरुषांच्या संदर्भातही झालेली आहे. कॉ. शरद पाटील यांनी आपल्या सर्व लेखनातून पर्यायी अशा संस्कृतीची मांडणी करुन क्रांतीकारी महापुरुषांवर चढवलली वेगवेगळी पुटे काढून त्यांना आहे त्या रुपात सादर करण्याचे क्रांतिकारी काम केलेले आहे. रामायण महाभारतातील वर्ण संघर्ष या ग्रंथातही हा वेगळा शोध घेतलेला आहे.

. रामायणामध्ये रामाला आदर्श पुरुष गौरविले गेले आहे. परिणामी भारतीय जनसामान्य माणसांवरचे गारुड आजही कमी झालेले नाही. म.गांधीजींनीही रामराज्याची महती गाऊन रामराज्याचे स्वप्न पाहिले. आजचे राज्यकर्तेही अधून-मधून रामराज्य निर्माण करण्याचे अभिवचन देत असतात. राम मनोहर लोहियांसारख्या समाजवाद्यालाही रामाचे आकर्षण वाटत राहते. कॉ. शरद पाटील यांच्यासारख्या प्राच्चविद्यापंडिताला रामाचा शोध घेणे त्यामुळेच आवश्यक वाटते. म्हणून ते लोहियांना थेट प्रश्न करतात, "रामाची संस्कृती कोणती? आर्य, ब्राह्मणी रामाचे तत्त्वज्ञान कोणते? आदर्शवाद वा अध्यात्मवाद. पुन्हा ब्राह्मणी लोहिया स्त्री दास्य व जातिप्रथा यांच्या अंताचे प्रबोधन ब्राह्मणी संस्कृती व तत्त्वज्ञान करु पाहात होते."[१२] कॉ. पाटलांनी इथल्या ब्राह्मणी इतिहासकारांनी रामाला जे आदर्शवादाचे मुखवटे चढवले आहेत ते सोलून काढून आहे त्या स्थितीत दाखवण्याचा यशस्वी प्रयत्न केला आहे. मलद-पुरुषाच्या स्त्री राज्याची राणी ताटका, दंडक गणराज्याची राणी शूर्पणखा स्वत:ची पत्नी सीता अशा आद्य समताधिष्ठित स्त्री राज्याचा उच्छेद रामाने केला हे कॉ. पाटील तर्कशुध्द पध्दतीने सिध्द करतात. पाटील नोंदवतात ते असे, "विश्वमित्र, राम व लक्ष्मण या अतिथींचे स्वागत करायला ताटका येऊ लागली. विश्वमित्राने रामाला सांगितले की, ती आपल्याला खायला येत आहे, मार तिला! स्त्री हत्या हा अधर्म आहे हे रामाच्या डोक्यात घोळत असल्याचे पाहून विश्वमित्राने त्याला चातुर्वर्ण्यरक्षणार्थ स्त्रीवध करणे हा नवा धर्म कसा आहे याचा उपदेश केला. ताटका वधापासून रामाने स्त्री राज्य उच्छेद केला. म्हणून त्याचे नाव पुरुषोत्तम पडले."[१३] रामाला कोणीतरी काहीतरी सांगते आणि राम सारासार विवेक गहाण टाकून दुष्कर्म करणचे अनेक

घटना रामायणामध्ये आलेल्या आहेत. कोणाच्या तरी सांगण्यामुळेच यज्ञपरिषदेत शुध्दतेची परीक्षा द्यायला भाग पाडतात. रामायण सांगते की धरणी दुभंगली, नागांनी खांद्यावर धरलेल्या दिव्य सिंहासनावर बसलेली धरणीदेवी वर आली आणि सीतेला शेजारी बसवून रसाताळात नागलोकात निघून गेली. अशा शब्दात गौरवीकरण केलेय. कॉ. शरद पाटील मात्र नेमक्या शब्दामध्ये भयंकर सत्य सांगतात ते असे "महाकवी महा असत्य बोलला. भूमिकन्या सीतेने पुरुषोत्तम रामाच्या अंतिम विटंबनेला वैतागून आत्महत्या केली."[१४] भारताच्या इतिहासाने अशाप्रकारच्या अनेक आत्महत्या आणि इत्यादी अशाच गोंडस शब्दात पचवलेल्या आहेत. भारतीय उच्चभ्रू स्त्री मुक्ती चळवळ ज्याप्रमाणे द्रौपदीच्या विद्रोहाविषयी बेटावर राहिली त्याप्रमाणे सीतेच्या दमनाबद्दल नि:शंक हेही यानिमित्ताने लक्षात घेणे आवश्यक आहे.

'एकलव्या'च्या आंगठ्याच्या दानाची चर्चा आजही मोठ्या प्रमाणात होतांना जाणवते. सर्वात मोठा गांधळ एकलव्याला द्रोणाचार्यांनी शस्त्रास्त्रविद्या शिकवायला नाकारण्याच्या कारणावरुन आहे. एकलव्याच्या शस्त्रास्त्र विद्येचे शिक्षण द्यायचे द्रोणाचार्यांनी का नाकारले? तो शूद्र होता म्हणून? महाभारत काय सांगते-

'ततो निषाद - राजस्य हिरण्य धनुष सुत:।

एकलव्य महाराज द्रोणम अभ्यजगामह

न स तं प्रतिजग्राह नैशिदिर् इति चिन्तयन्।

शिष्य धुनिष धर्मज्ञ.......।।१.१.३१.३१-३२।।'

महाभारत 'एकलव्य' हा शूद्र पुत्र होता असे म्हणतच नाही. तर एकलव्य हा निषाद राजा हिरण्यधनु याचा पुत्र होता. मात्र मोठ्या प्रमाणात अपप्रचार केल्यामुळे एकलव्य हा शूद्रच आहे अशी सर्वांची धारणा झालेली आहे. येथे शूद्र व निषाद यांच्यातला फरक लक्षात घेणे आवश्यक आहे. "शूद्र वर्ण हा चातुर्वर्ण्यव्यवस्थेवर आधारलेला राजक गणराज्यामधला उपनयन संस्कार वंचित असल्यामुळे कनिष्ठतम असा गणदासांचा (कम्युनल स्लेव्हज) वर्ण होता. याउलट एकलव्य हा निषादांच्या राजाचा मुलगा आहे. धर्मशास्त्रात निषाद ही ब्राह्मण पिता व शूद्र माता यांच्या संस्कारातून झालेली एक जात होती."[१६] कॉ. शरद पाटील म्हणतात "आमचे

बहुतेक प्राच्यविद्यावेत्ते व इतिहास तज्ज्ञ हे वर्ग, वर्ण व जात यांची नेहमी गल्लत करीत असतात. नरहर कुरुंदकरांसारखे समाजवादी गोटातले मार्क्सवादी पंडित वर्णाला काल्पनिक मानतात व जातीला वास्तविक. तर दीपंकर गुप्तासारखे पारंपरिक मार्क्सवादी वर्ण व जात या दोघांना काल्पनिक मानतात आणि केवळ वर्गालाच वास्तविक वस्तुत: या तिन्ही संस्था वास्तविक आहेत."[१७] पारंपरिक मार्क्सवाद्यांनी भारतीय जातिव्यवस्थेला समजून घेण्याचा प्रयत्नच केला नाही. मार्क्सच्या 'पाया आणि इमला' हा सिध्दांत समजून घेण्यात चुक केल्यामुळे ही गल्लत झालेली आहे किंवा येथील ब्राह्मणी परंपरेला वास्तव समजूनच घ्यावयाचे नाही असे म्हणायला जागा आहे. मात्र मार्क्सवाद भारतीय परिप्रेक्ष्यात समजून न घेतल्यामुळे मार्क्सवादही येथे प्रभावी ठरू शकला नाही. एकलव्य हा एक सार्वभौम अनार्य गणाचा सभासद होता आणि कोणताही गण स्वत:च्या विशिष्ट उपनयन संस्काराववाचून असू शकत नव्हता हे स्पष्ट होते. तरीही एकलव्याला द्रोणाचार्य का नाकारतात. याचा शोध कॉ.शरद पाटील पुढीलप्रमाणे घेतात, "तरीही द्रोणाचार्यांनी त्याला शिष्य म्हणून स्वीकारायचे का नाकारायचे? याचे उत्तर द्रोणपर्वात घटोत्कच हा कर्णाकडून मारला गेल्यानंतर कृष्ण अर्जुनाला जे सांगतो त्यात मिळते. तो त्या अर्जुनाला सांगतो की, हैडिम्ब घटोत्कच व नैषादि एकलव्य हे 'ब्राह्मणव्देषी व यज्ञव्देषी होते. (७.१८१.२, १७.२१,२७)"[१८]

**पुरुषप्रधान व समाजाचा प्रतिनिधी असलेला कर्ण विद्रोही नव्हता:-**

कर्ण आणि अर्जुनाचे सर्वसामान्य भारतीय माणसाला जितके आकर्षण आहे तितकेच किंबहूना त्यापेक्षा अधिक आकर्षण साहित्यिकांना राहत आलेले आहे. गो. नि. दांडेकरांची कर्णायन, शिवाजी सावंतांची मृत्युंजय, रंजीत देसाई यांची 'राधेय' शिरवाडकरांचे 'कौंतेय' किंवा इरावती कर्वे यांचे युगान्त या काही कलाकृती उदाहरणादाखल नोंदविता येतील. या सर्व कादंबरी आणि नाटकाचा नायक कर्ण आहे. उपरोक्त पंडित, लेखक कर्ण भक्ती आणि अर्जून भक्ती या दोन संप्रदायात विभाजित आहेत. अर्जुन भक्तीमागे कृष्णाची पारमार्थिक भक्तीही उभी आहे पण भक्ती ही भावनादृष्टी आहे, ज्ञान दृष्टी नाही. भक्तीने भगवंताची कल्पना साकारता येते म्हणतात. पण, त्याबरोबर खुद्द वास्तवताही 'कल्पना' बनते."[१९] असा अभिप्राय भक्त

लेखका संदर्भात कॉ.पाटलांनी नोंदवलेला आहे. महाभारतातील महासंघर्षाचे सूत्र मुळात पुरुषप्रधान समाज व स्त्री प्रधान समाज यांच्यातील असल्याचे युधिष्ठिरनेही सांगितले आहे. उपरोक्त सर्व लेखनामध्ये हे मुख्य सूत्रच ध्यानात घेतले गेल्याचे दिसत नाही काही प्रमाणात शिरवाडकरांच्या 'कौंतेय' या नाटकाचा अपवाद करावा लागेल. कर्ण हा सर्वश्रेष्ठ असा योध्दा होता या संदर्भात कोणाचेही दुमत नाही. कॉ.पाटील तर 'कर्ण मानवी प्रयत्नाचे महाभारतकालीन कैलास शिखर होता.' असे म्हणतात. अंतिम कर्णार्जुन युध्दात कृष्ण जर अर्जुनाचा सारथी नसता, तर कर्णाकडून अर्जुन खचित मारला गेला असता, असे खुद्द महाभारत सांगते. असा लोकोत्तर असलेल्या कर्णाचा स्त्री कडे पाहण्याचा दृष्टीकोण निकोप तर नव्हताच मात्र टोकार पुरुषीवृत्तीचा होता. 'दासी बनलेल्या द्रौपदीला तो उपरोधाने तर बोलतोच त्याचबरोबर तिची बाजू घेणाऱ्या विकर्णाची कानउघडणी करतांना कर्ण नवा धर्म सांगतो. तो असा- "कुरुनंदन! स्त्रिया एक पतिक असाव्यात असा देवाचा दंडक आहे. पण ही द्रौपदी बहुपतिक असल्यामुळे बंधकी आहे. हे निश्चित!."[२०] कॉ. शरद पाटील यांनी स्पष्ट केले आहे की, त्यावेळी हीनतम दासीला वा वेश्येला बंधकी म्हणत. म्हणून ती सर्वात घृणास्पद शिवीही होती. द्रौपदीला त्याने बंधकी म्हटले, तर कुंती आपली माता असल्याचे समजल्यानंतरही तिची विवशता न जाणता, त्याने तिला पापिणी म्हटले. त्याच्या लोकोत्तर उदारतेला अनुसरुन त्याने तिला अर्जुन सोडून बाकी तिच्या सर्व पुत्रांना युध्दात न मारण्याचा वर दिला पण, जन्मजात क्षत्रियत्वापासून त्याला वंचित ठेवण्याबद्दल त्याने तिला क्षमा केली नाही. तो कुंतीला म्हणतो, "बये, नियोगाची जी हकीगत सांगितलीस, त्यामुळे माझ्या धर्माचे दार मला मोकळे होईल, अशी तुझी कल्पना असली, तर चुक आहे. तुझ्या हकिकतीमुळे मला क्षत्रियत्व मिळाले, पण माझ्यावर कोणतेही क्षत्रिय संस्कार झालेले नसल्यामुळे हे क्षत्रियत्व कुचकामाचे आहे. जन्माच्यावेळी संस्कार व्हायचे, तेव्हा निर्दयपणे तू मला टाकून दिलेस. आज मात्र अप्पलपोटेपणाने माझ्याकडे आलीस. जा, तू सांगतेस ते कदापि होणे शक्य नाही. मात्र मी फक्त अर्जुनाला मारीन, इतर पांडवांना सोडून देईन."[२१] सतत स्वत:च्या शोधात असलेल्या कर्णाची ही भूमिका योग्य वाटावी अशीच आहे. सुत पुत्र म्हणून त्याला अनेक डंख सहन करावे

लागले आहेत. कौरव पांडवांच्या निकराच्या युध्दापर्यंत कुंतीने कर्णाचे मातृत्व लपवून ठेवलेले आहे. याला स्वत: कुंती जबाबदार नाही तर स्वत:चे मातृत्व लपवून ठेवायला लावणारी परिस्थिती जबाबदार आहे. कर्णाच्या जन्माची वस्तुस्थिती काय आहे. "कुंतीच्या वैदिक शिक्षणाची सांगता करणारा समावर्तन संस्कार झाल्यानंतर दुर्वास ऋषीपासून तिला कर्णाचा गर्भ राहिला. म्हणून कर्णाचे जनकत्व सूर्याकडे दिले गेले पण ही क्रानीन वा ब्राह्मणापासून गर्भधारणा यादवांच्या पितृसत्ताक गणराज्याच्या नीतिनियमांविरुध्द होती. म्हणून ज्ञातिभयाने कुंतीने नवजात कर्णाला अश्व नदीत सोडून दिले."[२२] कानीन आणि क्षेत्रज पुत्रांच्या शापीत स्नेहामध्ये तडफडतच कुंतीला संपूर्ण आयुष्य काढावे लागलेले आहे. खरेतर 'कुंती' हे महाभारतातील कमालीचे शापित आणि तितकेच तेजस्वी आणि ओजस्वी पात्र आहे. "मुळात कुंती ही शुरसेन यादवाची, एका पुरुषप्रधान राजर्षिशासित दासप्रथाक गणराज्याच्या कुलुमुख्याची, कन्या जन्वान पृथा. तिच्या जन्मापूर्वी आणभाक झाल्याने शूरसेनाने तिला त्याचा आतेभाऊ राजर्षि कुंतिभेजन याला दत्तक दिली. दत्तक नाव कुंती. ती जरी आता एका स्त्री प्रधान गणराजाची ब्रह्मवादिनी झालेली असली, तरी ती आपल्या जन्मदात्या पित्याने आपल्याला एखाद्या क्रय वस्तुप्रमाणे कुंतिभोजाला देऊन टाकले असे वारंवार सांगे."[२३] ब्रह्मवादिनी म्हणून तिच्यावर उपनयन संस्कार करण्यासाठी या कुंतिभोजाने तिला दुर्वासस ऋषीच्या हवाली केले. या दुर्वासस ऋषीपासून तिला कर्णाचा गर्भ राहिला. ज्ञातिभयामुळे आपल्या पोटच्या गोळ्याला अश्व नदीत सोडावे लागले. हे मातृत्व अनेक वर्ष तिला आत वागवावे लागले. पुढे व्याधीग्रस्त पंडूशी तिला विवाह करावा लागला. त्याच्याजवळ पुत्रप्राप्तीची क्षमता नसल्यामुळे तिला नियोगातून क्षेत्रज अपत्य प्राप्ती करावी लागली व स्वत:च्या पुत्रांमध्येच घनघोर युध्दही पहावे लागले. तरीही तिची ओजस्विता कमी झालेली नाही तिच्या या तेजस्वीतेची नोंद घेतांना कॉ. शरद पाटील म्हणतात, "पांडवांचा पक्ष स्त्री प्राधान्याने जाणवतो. कुंती व द्रौपदी! केवढी अनन्यसाधारण व तेजस्वी पात्रे आहेत."[२४] कुंती जशी इकडे विव्हळत राहिली तसा तिकडे कर्णही विव्हळतच राहिला. अर्जुनाला सोडून सर्वांना मी माफ करतो. हे कुंतिला दिलेले वचनही इरावतीसारख्या विदुषीला औदार्य न वाटता तुच्छता वाटते. कॉ.पाटलाना मात्र ही तुच्छता

वाटत नाही. याचा ते वेगळेपणाने विचार करतात. ते म्हणतात, "सुत पुत्राचे श्रेष्ठत्व जगाने जाणले नाही म्हणून तो आत्मप्रशंसक बनला; पण कृष्ण मात्र कर्णाचे श्रेष्ठत्व जाणुन होता. म्हणून, कर्ण सेनापती झाल्यानंतर अपरान्ह झाल्याशिवाय, म्हणजे, कर्ण दिवसभर लढून थकल्याशिवाय, तो अर्जुनाचा रथ कर्णासमोर आणित नसे."[२५] मात्र बहुतांश अभ्यासकांना अर्जुनच श्रेष्ठ योध्दा वाटत आलेला आहे. यातुन इरावतीबाईही सुटलेल्या नाहीत. अर्जुनाचे श्रेष्ठत्व प्रतिपादन करताना त्या म्हणतात,अर्जुन त्वेषाने उठला, त्याने बाण जोडला व तो गर्जुन म्हणाला, "जर खरा क्षत्रिय असेन, तर हा बाण कर्णाचे प्राण घेईल. अर्जुन अचूक नेम धरणारा म्हणून प्रसिध्द होता. ह्याहीवेळी त्याचा नेम चुकला नाही."[२६] सर्वच गोष्टीत निष्णात व कमालीचा चतुर असलेला श्रीकृष्ण हा अर्जुनाचे सारथ्य करत होता. अर्जुनाचा सारथी दुसरा कोणी असता तर त्या युध्दाचा निर्णायक निकाल कदाचित वेगळा असता. म्हणूनच कॉ. पाटील म्हणतात, "कर्णाचा पराभव अर्जुनाने नाही, नव्या अराजक दासप्रथाक संघगणव्यवस्थेचा सर्वात चतुर प्रतिनिधीने, कृष्णाने केला. स्त्रीप्रधान राजर्षिशासित दासप्रथाक गणसमाजाचा प्रतिनिधी अर्जुन खरोखरच निमित्तमात्र झाला."[२७] कर्ण महान योध्दा असतांनाही केवळ जन्मामुळे त्याला अनेकदा मानखंडाना सहन करावी लागली. त्याच्या कर्तृत्वाला साजेसा सन्मानही त्याच्या वाटेला आला नाही. जन्मावरुन दर्जा ठरवणाऱ्या व्यवस्थेच्या विरोधामध्ये कर्णाने एल्गार पुकारला का? इरावती कर्वे म्हणतात, "'सूत' या वर्गाला मान्यता मिळाली किंवा क्षत्रियत्व पौरुषावर ठरावे अशा तऱ्हेची तात्त्विक भूमिका कर्णाने घेतली नव्हती. 'दैवायत हुत्मे जन्म मदायंत तु पौरुषम्' ह्या भूमिकेवरुन कर्ण भांडत नव्हता. आधुनिक वर्गकलहांचे बीज ह्या झगड्यात नव्हते. कर्ण स्वत:च्या, एकट्याच्या स्थानासाठी झगडत होता."[२८] तरीही भारतातील परिवर्तनवादी चळवळींना कर्ण जवळचा वाटतो. इतकेच नव्हे; तर सत्यशोधक ब्राह्मणेन्तर चळवळीने कर्णाला विद्रोही मानले आणि 'वेणीसंहार' नाटकातील त्याचे खालील काव्याव्याघ्ना आपली युध्दघोषण बनवली.

"सूतो वा सूतपुत्रो वा यो भवाम्य अहम।
दैवायत कुले जन्म मदायतं तु पौरुषम्।।"

"मी सूत असेन, नाहीतर आणखी कोणी सोम्यागोम्या असेल. कुलीन जन्म दैवावर अवलंबून असतो; पण पौरुष मात्र माझ्या (मनगटा)वर"[२९] या पार्श्वभूमीवर कॉ.शरद पाटील प्रश्न विचारतात, कर्ण वर्ण (जाति) स्त्री दास्याविरोधी विद्रोही होता काय? आणि स्वत:च त्याचे उत्तर देतात. 'होता व नव्हता' व त्याचे स्पष्टीकरण याप्रमाणे सांगतात. "व्दिज वर्णामधील असमानतेविरुध्द त्याचा विद्रोह होता. व्दिज वर्ण जन्मावर अवलंबून असू नये, कर्तृत्वावर अवलंबून असावा यासाठी त्याचा विद्रोह होता. वर्णोन्नतीसाठी त्याचा विद्रोह होता. पण जी समानता तो एक वैश्यवर्णीय म्हणून क्षत्रिय वर्णाकडून मागत होता, ती तो अस्वतंत्र नारी व दास शूद्र वर्ण यांना द्यायला तयार नव्हता. म्हणून तो विद्रोही नव्हता."[३०]

**जय नावाच्या इतिहासाची धिरोदत्त नायिका : द्रौपदी:-**

द्रौपदी ही पाच पांडवांची पत्नी म्हणूनच सर्वोत्मुखी झालेली आहे. भर सभेत तिची झालेली विटंबना आणि श्रीकृष्णाने तिला पुरविलेले वस्त्र, वस्त्र या पलिकडे सर्वसामान्यांना द्रौपदी संदर्भात फारशी माहिती नाही. विद्वानांनीही पारंपरिक पध्दतीनेच द्रौपदीकडे पाहिलेले आहे. इरावती कर्वे, नरहकर कुरुंदकर, अरुणा ढेरे इत्यादींनी काही प्रमाणात वेगळा विचार केलेला जाणवतो. मात्र या सर्वांना छेद देत कॉ. शरद पाटील यांनी द्रौपदीचा पूर्णपणे नवा आणि क्रांतिकारी असा अन्वयार्थ लावलेला आहे. द्रौपदी ही या देशाच्या स्त्री सत्ताक इतिहासाचा एक अवशेष होती. अशी भूमिका कॉ. पाटील घेतात. तिचे महत्तम वैशिष्ट्ये विशद करतांना ते म्हणतात, "स्त्री प्राधान्यानाचा पूर्णपणे अंत होऊन पुरुषसत्तेची निरंकुशता प्रस्थापित होणे, हे या युगांताचे द्रौपदीच्या संदर्भातले वैशिष्ट्य होते."[३१] हा वस्तुस्थिती निर्देशक अन्वयार्थ दुर्गाबाईंना पटला ना कुरुंदकरांना. म्हणून वास्तवाकडे दुर्लक्ष करायचे का? लोहिया द्रोपदीला सर्वश्रेष्ठ भारतीय स्त्री मानतात व तिची अनन्यता तिच्या सावळ्या सौंदर्यात, प्रेमाच्या उन्मुक्ततेत, बुध्दीमत्तेत बिनतोड प्रश्न विचारणाऱ्या हजर जबाबीपणात होती असे प्रतिपादन करतात. इरावती कर्वे सुध्दा तिची अनन्यता अशाच सर्व गोष्टीत शोधतात, त्या म्हणतात, "सीता भूमिकन्या, कारण तिचे भूमीवर, तिचे हृदय संसारात, माहेरात, सासरी, राजवाड्यात असे होते. तिचा बाणेदारपणा, तिचा स्वार्थ त्याग, तिची पतिपरायणता, सर्वच वर्तन ती ज्या

देशात, ज्या काळात व ज्या कुळात जनमली, वावरली त्यांना योग्य असे होते. ती असमान्य होती."[३२] इरावर्ती कर्वे सारख्या थोर विदुषींना द्रौपदीचे असामान्यत्व तिच्या पति पारायणतेत आणि संसार सन्मुखतेत दिसावे हे फारच आश्चर्यकारक आहे. याहीपेक्षा भयंकर गोष्ट म्हणजे दुर्योधनाच्या फजितीवर तिचे हसणे आणि कीचकवधाची बातमी दिमाखाने रक्षकांना सांगणे इरावतीबाईंना असंस्कृत वाटलेले आहे. हे सर्व सांगायचे यासाठी की विव्दान असो की विदुषी सर्वांनी द्रौपदीचे मूल्यमापन साचेबध्द पठडी मध्ये राहूनच केले आहे. मात्र द्रौपदी या सर्वांच्या पलिकडे केव्हाच गेली होती. कारण आपण स्त्री सत्तेचे वारसदार आहोत याची तिला पुरेपूर जाणीव होती. कॉम. पाटील हे वारस्त्व शोधून द्रौपदीला त्याच्याशी जोडताहेत आणि वर्तमान मूळ भारतीयांना द्रौपदी ही आपली जननायिका आहे, ती आपल्या जनलढ्याची प्रेरणा होऊ शकते हे सांगताहेत. महान स्त्रीसत्ता वारसत्वाचा शोध कॉ.पाटील घेतात तो याप्रमाणे- "द्रौपदी जन्मत: काळी तिचे नाव कृष्णा ठेवले गेले, असे महाभारत सागते.(१.१६६.५४)

कृष्णा इत्येव अब्रुवन कृष्णा कृष्णाभूत सा हि वर्णत:।। १.१६६.५४. कृष्णा या नावातच त्या युगाचा इतिहास दडलेला आहे. बुध्दोत्तर सांमतप्रथा काळाची धर्मशास्त्रे बजावतात की, धर्म कर्माच्या वेळी कृष्णवर्णा रामाजवळ जाऊ नये कारण रामा धर्मकर्मासाठी नसते, रमणासाठी असते. काळ्या रंगावर अशाप्रकारे दास्यभावी उपभोगांचा धार्मिक शिक्कामोर्तब झाले. काळ्या रंगाची ही दास्य निदर्शकता ह्याच युगान्ताची परिनिष्पत्ती होती. भारतीय इतिहासाचा महाप्रवाह काळी यमुना व गोरी गंगा यांच्या सम्मीलीत प्रवाहांप्रमाणे, पण परस्परांशी झगडत, वहात आलेला आहे; पण भारतीय आद्य निॠती सिंधूच्या स्त्री सत्ताक गणसमाजाची आद्यतम गणमाता व मृत्युनंतर गणदेवता. नरकदेवी म्हणून पितृसत्ताक आर्यांनी पाताळात ढकललेल्या या अनार्य मातृदेवता या भूमीत नैॠत्येला हाकलल्याशिवाय आर्यांचा कोणताही यज्ञ सुरु होत नसे. पण निर्ॠति वाक् वा दुर्गा वा काली ही पांडवांची कुलदेवता होती. अज्ञातवासासाठी विराट नगरात प्रवेश करण्याआधी युधिष्ठिराने दुर्गेचे स्तवन करताना तिला वासुदेवाची भगिनी व कृष्णा असे संबोधले. वासुदेवाची भगिनी म्हणजे जी कृष्णा आणी देवकिला झाली व कंसाने उपटून मारली ती. तिला हरिवंश कृष्णा, नंद गोपसुता, क्षत्रिया इ. म्हणतो. हरिवंश तिचे पुढीलप्रमाणे वर्णन

करतो- "मुक्तकेशी, मृत्यु (देवता), सुरामासांचा बळी प्रिय असलेली शेतकऱ्यांची व भूतमात्रांची भूमता.

४.३० अश्व अथर्ववेदीय राष्ट्रीय देवी सुक्तात दुर्गा स्वत:चे वर्णन करते-

"मी राष्ट्रीय आहे, गनधनांचे निधान. मी ज्ञातृ आहे. यज्ञवेत्यात आद्य. ज्याच्यावर मी प्रेम करते त्याला बनवते शक्तिशाली, कवी, ब्राह्मण. मी ज्ञातीसाठी गणभोजने संघटित करते..."

राष्ट्रीदेवी हा स्त्री राज्याचा राणीचा किताब होता. राष्ट्री म्हणजे गणभूमीची गणनियुक्त स्वामीनी आणि देवी म्हणजे या राष्ट्र गणभूमीचे गणाच्या ज्ञाती व कुलांमध्ये अक्षकशांच्या व चौपटाच्या साहाय्याने नियतकालिक गणोत्सवात समान वाटप करावी.

या आद्य कृष्णेची कृष्णा द्रौपदी ही वारसदार वंशज होती."[३३] धर्म द्युतात हरला त्यानंतर एकेक करत सर्व भाऊ पणाला लावतो व शेवटी द्रौपदी पणाला लावतो. दुर्योधन एका दासाकडून तिला सभेत बोलावणे पाटवतो त्यावेळी द्रौपदी त्याच्याबरोबर निरोप पाठवते. "जा सभेत विचारुन ये माझा पण लावायच्या आधी धर्मराज स्वत: पण लावून दास झाले होते का नाही ते." दुर्योधनाने सांगितले, "सभेत ये, तुझ्या प्रश्नाचे उत्तर मिळेल."[३४] सभेत आली नाही. त्यामुळे तिचे केस धरुन तिला ओढत दु:शासन सभेत घेऊन आला. त्यावेळी तिची बाजू केवळ दास शूद्र विदुराने घेतली. तो म्हणला, "कृष्णा दासीत्वाला प्राप्त होऊ शकत नाही. कारण स्वत:चे स्वातंत्र्य गमावलेल्या राजाने तिला पणाला लावली, असे माझे मत आहे."[३५] ... आणि हा विदूर काही सामान्य व्यक्ती नाही. विदुराचे असामान्यत्व इरावती कर्वे यांनी स्वतंत्रपणे उलगडून दाखविलेले आहे. ते असे- "विदूर या शब्दाचा अर्थ 'ज्ञानी' असा आहे; आणि संबंध महाभारतात विदुराचा ज्ञानीपणा दिसतो, तो पारमार्थिक आहे."[३६] द्रौपदीच्या दासीत्वासंदर्भात विदुर जो प्रतिवाद करतो आहे, त्याला तात्विक असे अधिष्ठान आहे हे लक्षात घेणे आवश्यक आहे. विदुराचा हा प्रतिवाद उधृत करुन कॉ.शरद पाटील म्हणतात- "मातृवंशक दासप्रथेत पती आधी गुलाम झाल्यानंतर पत्नीला तिच्या संमतीशिवाय पणाला लावू शकत नसे." द्रौपदीने कुरुंच्या गणवृध्दांना धर्माचा प्रश्न विचारला. विधुर जातक कुरु सभेला धम्म सभा म्हणते. सभा

आणि समिती (परिषद) या संस्था स्त्रियांनी निर्मिल्या आणि त्यात मंत्रणा करुन त्या धर्म सांगू शकत असे, असे अथर्ववेदीय विराट सुक्ताच्या ८.१०.५.१० या ऋचा सांगतात. आता ती विराटची ही वंशजा दासी केवळ पुरुषांच्या बनलेल्या सभेला धर्माचा प्रश्न विचारीत होती."[३७] ... आणि तिचा हा प्रश्न न्याय असा होता नव्हे; ती ज्या स्त्री सत्ताकतेचा महान वारसा चालवत होती त्याला पुढे घेऊन जाणारा होता. मात्र इरावती कर्वे यांच्या सारख्या विदुषीलाही मानी स्वाभिमानी आणि ब्रह्मवादिनी द्रौपदीचे प्रश्न मर्यादेचा अधिक्षेप करणारी वाटली. त्या म्हणतात, "त्या प्रश्नात पांडित्य नव्हतेच, पण पांडित्यापेक्षाही श्रेष्ठ असा शहापणपणा, प्रज्ञा नव्हती. जे चालले होते की, सासऱ्यांनी व दिरांनी भरलेल्या सभेमध्ये वधू म्हणून द्रौपदीने हंबरडा फोडला असता, तर गोष्टी या थराला कदाचित जात्या ना!"[३८] स्वत्वाबद्दल कमालीची जागरुक असलेल्या द्रौपदीला इरावतीबाई न्यायासाठी रडायला सांगताहेत याला काय म्हणणार? "द्रौपदी उभी होती तोपर्यंत पांडव उभे होते. द्रौपदी खाली पडली, तेव्हा धर्माखेरीज इतरही पडले. द्रौपदी जीवंत असेपर्यंत पांडवात कधीही फुट पडली नाही. वनावासातही थोरा-मोठ्या राजाची लेक, सून व बायको ही तिन्ही नाती तिला सुटली नाहीत."[३९] अशा शब्दात इरावतीबाईंनी तिची महत्ता प्रतिपादली आहे. द्रौपदी ब्रह्मवादिनी होती. कुरुसभेत नेमकेपणाने तिने प्रश्न विचारुन सर्वांनाच निरुत्तर केलेले आहे. वनपर्वात तर ती ईश्वरावरच निरीश्वरवादी आक्षेप घेतांना दिसते. हे सर्व आक्षेप तत्त्वज्ञानाच्या पातळीवर जाणारे आहेत. म्हणून कॉ. शरद पाटील म्हणतात, "वन पर्वात द्रौपदी बार्हस्पत्य मताचा पुरस्कार करतांना दिसते. जडातून चैतन्य ज्याप्रमाणे अनेक कारणांच्या संयोगातून जन्माला येते, त्याप्रमाणे अनेक भावांच्या समन्वयाने कर्म सिध्दी होते, असे युधिष्ठिराला कर्म सिध्दीसाठी प्रोत्साहित करताना ती सांगते. राजपाटापासून वनवासापर्यंत, महिषीपासून दासीपर्यंत असे जीवनातले आंत्यतिक बदल कशाने होतात? तत्कालीन युगमतानुसार मानवी जीवन दैवाधीन असून प्रजा कळसुत्री बाहुल्याप्रमाणे दैवप्रेरित असल्याचे मानले जात होते. पण द्रौपदी या ईश्वराला निरीश्वरवादी अक्षेप घेते- "स्वत:च्या लहरीनुसार वागणारा हा प्रभू संयोग व नियोग करुन बालक जसे खेळण्याशी खेळते, तसा हा भगवान भूतमात्राशी खेळतो, राजन। विधाता भूतमात्राशी माता-पित्याप्रमाणे वागत नाही, तव

प्राकृत जनाप्रमाणे, जणू रागाने प्रवृत्त होऊन वागतो. पार्था! तुझी आपत्ती व सुयोधनाची समृध्दी पाहून अशी विषमता करणाऱ्या विधात्याला मी दोष देते." पुढे ती म्हणते, "कर्म जर कर्त्याचे अनुगमन करत असेल आणि कर्ता करविता जर ईश्वरच असेल, तर कर्माच्या पायांची खरी जबाबदारी ईश्वरावरच पडते. असे प्रतिपादून पुढे म्हणते, "कर्ता करविता ईश्वर नसेल, तर जग बलवानाचेच आहे आणि दुर्बलाची कीवच केली पाहिजे." यावर टिप्पणी करताना कॉ. पाटील म्हणतात, "भिमासारखा महाबलीसुध्दा नहुष अजगराने विळखे घालून हतबल केला गेल्यानंतर "दैवच सर्वश्रेष्ठ आहे, पुरुषार्थ निरर्थक" असे हताशपणे म्हणतो. पण द्रौपदी मात्र तत्त्वज्ञानात व जीवनात पुरुषार्थ या पुरस्कार करीत पुर:सर पुरुषसत्तेत जगली."[४०] म्हणून कॉ. पाटलांना प्रज्ञावंत द्रौपदीचे वस्त्रहरण हा पुरुषसत्ताक कौरवांचा स्त्री प्रधान पाडवांवर उगविलेला सूड वाटतो. खरेतर या कौरव पांडवांच्या युध्दात पांडवांचा विजय झालेला होता. मात्र त्या विजयाच्या रात्रीच अश्वत्थाम्याने पांडवांचे झोपलेले युध्दशिबीर कापून काढले. पंचाल कथामात्र उरले. कृष्णा द्रौपदीचे पाचही पूत्र विजयाच्या रात्री मारले जाऊन तिचा वंश बुडाला आणि स्त्री प्राधान्याचा पूर्णपणे अंत होऊन पुरुषसत्तेची निरंकुशता प्रस्थापित झाली.

**विदुर : शूद्र-दासांचा विख्यात प्रतिनिधी:-**

महाभारतामध्ये व्यक्ती म्हणून विदुराचे विशेष असे स्थान आहे. महाभारतामध्ये परस्परांशी झुंजणारे गणराज्य तीन भागात विभागलेले आहेत. स्त्री प्रधान राजर्षीशासित (पांडव, मद्र इ.) पितृसत्ताक राजर्षीशासित (कौरव, मगध इ.) व अराजक (यादव) या सर्वच्या सर्व गणराज्यांच्या अन्नधान्याचे निर्माते दास-शूद्र होते आणि या अर्थोत्पादक शूद्र-दासांचा सर्वात विख्यात प्रतिनिधी होता विदूर, महाभारताचे अधिष्ठान समजून घ्यायचे असेल तर विदुराला समजून घेतले पाहिजे."[४१]

संपूर्ण महाभारताचे अधिष्ठान समजून घ्यायचे असेल तर विदुराला समजून घेणे किती आवश्यक आहे ही पाटलांची भूमिका समजून घेणे आवश्यक आहे. खरेतर महाभारतामध्ये गुप्त वा लपवून असे काहीही ठेवलेले नाही मात्र विदुर हा युधिष्ठिराचा पिता होता हे मात्र स्पष्टपणे कोठेही नोंदवलेले नाही आणि महाभारताच्या अभ्यासकांनीही हा शोध घेण्याचा प्रयत्न केलेला

नाही. "विदुर हा युधिष्ठिराचा 'बीजिन' = नियोगजन संततीत 'क्षेत्रिन' पित्यासाठी 'क्षेत्र' स्त्रीज बीज टाकणारा होता. हे शोधून काढायचे धाडस केवळ इरावती कर्वेनींच केले."[४२] अशा शब्दात कॉ.पाटील इरावती कर्वे यांचा गौरव करतात. स्वत:शरद पाटील यांनीही विदुर हेच युधिष्ठिरचे पिता असल्याचे महाभारतातले अनेक तपशिल नोंदवलेले आहेत. मात्र त्यांनी एक प्रश्नही उपस्थित केलाय तो हा की 'शूद्र विदूर व क्षत्रिय कुंती यांच्या समागमातून क्षत्रीय युधिष्ठिर जन्माला येवू शकतो. मग ब्राह्मण व्यास व विचित्रविर्याची दासी यांच्या समागमातून शूद्र विदूर का जन्माला यावा?"[४३] आणि याचेही उत्तर शोधण्याचा त्यांनी प्रयत्न केला आहे. तो असा "याचा स्पष्ट अर्थ हा आहे की, "राजर्षी सत्ताक गणसमाजात क्षत्रियाची उत्पत्ती पुरुषाच्या वर्णावर अवलंबून नसून स्त्रीच्या वर्णावर अवलंबून होती. स्त्री क्षत्रिय असली तर तिला कोणत्याही वर्णापासून झालेली संतती क्षत्रिय निपजायची आणि हा नियम स्त्री सत्ताकतेचा होता."[४४] कॉ. पाटील आणखी सत्य नोंदवतात. 'कुरु गणाची राजधानी असलेल्या हस्तिनापुरचे नाव 'नागसाह्यही' होते. या व इतर पुराव्यावरुन ती अगोदर एका आर्येत्तर नागगणाची राजधानी असावी असे दिसते. दास केलेल्या अशा आर्येत्तर गणाच्या एक स्त्रीच्या पोटी विदुर जन्माला आला.

**...तरीही विदुराने विद्रोह केला:-**

कर्ण आणि विदुर खरे तर हे दोघेही सुतपुत्र. मात्र दोघांचेही व्यक्तिमत्व संपूर्ण महाभारतात संपूर्ण तेजाने तळपलेले आहे. श्रेष्ठत्व हे जन्मावर ठरत नसते हे या दोघांनी आपल्या कर्तृत्वातून दाखवून दिले. प्रसंगी विद्रोही भूमिकाही घेतली. मात्र तत्कालीन राजव्यवस्थेने त्यांचे कर्तृत्व असूनही केवळ जन्मामुळे त्यांच्यावर अन्याय केला. कर्णाला दुर्योधनाने मित्र म्हणून जरी स्वीकारले असले तरी त्याला बरोबरीचा दर्जा कधीही दिला नाही. त्यामुळे कर्ण वर्णोन्नतीसाठी विद्रोह करत राहिला मात्र अशाप्रकारची वर्णव्यवस्थाच नसावी असे कर्णालाही वाटले नाही. विदुराला मात्र वर्णोन्नतीसाठी झगडावे असे वाटलेले नाही. मात्र स्त्री सत्ताक पांडवांचे राज्य टिकून राहण्यासाठी विदुराने जिवाच्या आकांताने प्रयत्न केला. लाक्षागृहातून कुंती आणि पांडवांना वाचवण्याचा प्रसंग असेल अथवा इतरही. धर्म द्युतात

हरल्यानंतर दुर्योधन द्रौपदीला आणयचा आदेश देतो तेव्हा त्याची स्त्री प्राधान्य पुरस्काराची तेजस्वी भूमिका प्रकट झालेली आहे. 'पितामह भीष्माप्रमाणे त्याने धर्म बलिष्ठांचा, असल्याचे सांगितले नाही की ज्यानुसार पती आधी दास झाला तरी पत्नीचा स्वामीच राहतो. त्याने कुरुक्षेत्राला बजावले-

"न हि दासित्वम आपन्ना कृष्णा भवितुम् अर्दति।

अनिशेन हि राज्ञा एषा पणे न्यस्ता इति मे मति:।।"[४५]

महाभारतामध्ये विदुराच्या अशा दिप्तीचे प्रसंग अनेक आहेत. पांडव कुंतीपुत्र होते म्हणून तो पक्षपाती होता का? तर अजिबात नाही तो प्रामुख्याने स्त्रीप्राधान्याचा पुरस्कर्ता होता. "तसेच तो गणसत्ते विरोधी निरंकुश राजर्षि सत्तेचा प्रखर विरोधी होता. दास शूद्र स्त्रियांबद्दलच्या अथांग करुणा व मैत्रीने त्याचे हृदय भरलेले होते."[४६] म्हणून तर त्याने अन्याय करणारा कोणीही असो त्याच्याविरुध्द बुलंद आवाज उठवलेला आहे. धृतराष्ट्राचे विदुरावर प्रेम होते हे खरेच आहे. मात्र त्या प्रेमातही एकप्रकारचा हुकुमीपणा होता असे इरावती कर्वे यांनीच म्हटले आहे. धृतराष्ट्राने विदुराला आपला धाकटा भाऊ मानले होते असेही इरावतीबाई सांगतात मात्र एक खंतही व्यक्त करतात ती अशी 'क्षत्रियांना अतिशय जवळचे, क्षत्रियांच्या रक्ताचे, क्षत्रियांना निर्भिडपणे आदेश करु शकणारे असे हे लोक क्षत्रियांची बरोबरी मात्र करु शकत नव्हते. ते व त्यांची संतती सिंहासनावर बसू शकत नव्हती. धृतराष्ट्र आंधळा होता, म्हणून त्याला राज्य मिळाले नाही. पांडू काही निर्व्यंग नव्हता, पण त्याला राज्य मिळाले. पण सर्व दृष्टीने योग्य असूनही विदुर मात्र कोरडाच राहीला."[४७] विदुराच्या हृदयामध्ये त्याची बोच जरुर असेल मात्र ती त्याने कधीही उजागर केलेली नाही आणि खचूनही गेला नाही. मात्र जेव्हा केव्हा भूमिका घेण्याची वेळ आलेली आहे तेव्हा स्पष्ट आणि खंबीर भूमिका घेतलेली आहे. नव्हे विदुर हा सांख्य तत्त्वज्ञानाचा कट्टर पुरस्कर्ता होता आणि 'सांख्य तत्त्वज्ञान हे स्त्री सत्ताक समाजाचे सामाजिक पदार्थ होऊन बसलेले होते."[४८] अशा या विदुराने आपल्या आयुष्याचा शेवटही विद्रोही भूमिका घेऊनच केला. ज्या चार्वाकाचे तत्त्वज्ञान विदुर शिरोधार्य मानत होता. तो चार्वाक नास्तिक होता. 'हाच लोक आहे, परलोक नाही.' असे म्हणतात. विदुराने त्याच्या दास

शूद्र वर्णासाठी आता, यम धर्माचा अवतार म्हणून तो परलोक कल्पिला होता तो इहलोकीच्या दासप्रथेचेच अस्तिक प्रक्षेपण होते. हाच लोक आहे, म्हणजे दासशूद्रत्व याच लोकात आहे. मग याच लोकात दासशूद्रत्वाचा अन्त करायला काय हरकत आहे? वानप्रस्थाक जीवनातही स्वामी धृतराष्ट्राधिन ठेवणारे पाश म्हणजे अन्न, पाणी व वस्त्र त्यांचा त्याग म्हणजे अध्यात्मीक जीवन मुक्ती, तीन वर्षाच्या वानप्रस्थाक जीवनाच्या अखेरीस त्याने हा विद्रोह केला."[४९] आणि कॉ. शरद पाटील यांनी विदुर नावाचा बुलंद विद्रोही स्वर शोधून वर्तमान परिवर्तनवादी चळवळीला नवा सहचर मिळवून दिलेला आहे. कॉ. पाटलांचे हे ऐतिहासिक कार्य म्हणून नोंद करावी लागेल.

**संदर्भ:-**


१) कुरुंदकर नरहर, व्यासांचे शिल्प, देशमुख आणि कं., तिसरी आवृत्ती, ९ ऑगस्ट २०१८, पृ.क्र.२०.

२) तत्रैव, पृ.क्र. मलपृष्ठावरील मजकुर

३) पाटील शरद, रामायण-महाभारतातील वर्ण संघर्ष, मावळाई प्रकाशन, पुणे, तिसरी आवृत्ती, जून २०१४, पृ.क्र.०७.

४) तत्रैव, पृ.क्र.०७

५) पृ.क्र., उधृत, पृ.क्र.०१

६) तत्रैव, पृ.क्र. ०१.

७) कोसंबी दामोदर (अनु तुळपुळे वसंत) पुराणकथा आणि वास्तवा, लोकवाङ्मय गृह, सहावी आवृत्ती, २०१५, पृ.क्र. मलपृष्ठावरील मजकुर.

८) उनि, कुरुंदकर, पृ.क्र.१७.

९) उनि, पाटील शरद, पृ.क्र.०२.

१०) तत्रैव, पृ.क्र.०३

११) तत्रैव, पृ.क्र.०७.

१२) तत्रैव, पृ.क्र.१९.

१३) तत्रैव, पृ.क्र.२३.

१४) तत्रैव, पृ.क्र.३०.

१५) तत्रैव, पृ.क्र.१३, उधृत.

१६) तत्रैव, पृ.क्र.१४.

१७) तत्रैव, पृ.क्र.१४.

१८) तत्रैव, पृ.क्र.१६.

१९) तत्रैव, पृ.क्र.४४.

२०) तत्रैव, पृ.क्र.४८, उधृत.

२१) कर्वे इरावती, युगान्त, देशमुख आणि कं. पुणे, आठवी आवृत्ती, १९९२, पृ.क्र.१७७.

२२) उनि, पाटील शरद, पृ.क्र.५०

२३) तत्रैव, पृ.क्र.४९

२४) तत्रैव, पृ.क्र.४७.

२५) तत्रैव, पृ.क्र.५१

२६) उनि, कर्वे इरावती, पृ.क्र.१८७.

२७) उनि, पाटील शरद, पृ.क्र.५१.

२८) उनि, कर्वे इरावती, पृ.क्र.१६६

२९) उनि, पाटील शरद, पृ.क्र.५२.

३०) तत्रैव, पृ.क्र.५२.

३१) तत्रैव, पृ.क्र.६४.

३२) उनि, कर्वे इरावती, पृ.क्र.११८.

३३) उनि, पाटील शरद, पृ.क्र.६६.

३४) उनि, कर्वे इरावती, पृ.क्र.१२०, उध्दृत.

३५) उनि, पाटील शरद, उधृत, पृ.क्र.८३.

३६) उनि, कर्वे इरावती, पृ.क्र.९२.

३७) उनि, पाटील शरद, पृ.क्र.८३.

३८) उनि, कर्वे इरावती

३९) तत्रैव, पृ.क्र.

४०) उनि, पाटील शरद, पृ.क्र.८८.

४१) तत्रैव, पृ.क्र.९२

४२) तत्रैव, पृ.क्र.९२.

४३) तत्रैव, पृ.क्र.९४.

४४) तत्रैव, पृ.क्र.९४.

४५) तत्रैव, पृ.क्र.१००, उधृत.

४६) तत्रैव, पृ.क्र.१०२

४७) उनि, कर्वे इरावती, पृ.क्र.९१

४८) उनि, पाटील शरद, पृ.क्र.१०४

४९) तत्रैव, पृ.क्र.१०८.

## प्रकरण - पाचवे

# समारोप

कॉ.शरद पाटील हे भारतातील महत्तम असे प्राच्यविद्या पंडित होते. शोषितांच्या उत्थानासाठी रणमैदानातील संघर्षाबरोबर मूळभारतीयांच्या सांस्कृतिक इतिहासाची तात्विक मांडणी करणे असा दुहेरी प्रकारचा निकराचा संघर्ष त्यांनी शेवटच्या क्षणापर्यंत केला. 'जात-वर्ग-स्त्रीदास्य आणि भारतातील साम्यवादी क्रांती याबाबत मागच्या अर्धशतकावर त्यांनी आपल्या मांडणीतून जी मशागत केली आहे ती केवळ अनन्यसाधारण अशीच आहे. जोडीनेच केलेली संघटनात्मक बांधणी त्यांना वेगळ्या उंचीवर घेऊन गेली. प्राचीन इतिहास, प्राच्यविद्या, संस्कृत-पाली भाषा आणि व्याकरण, मानववंशशास्त्र, सौंदर्यशास्त्र यातील अभूतपूर्व ज्ञान-उत्खननातून त्यांनी भारताची सनातन समस्या, शोषण शासनाच्या जात-वर्गव्यवस्थेच्या मुळापर्यंत जाऊन भिडण्याचा आणि २१व्या शतकातील भारतातील साम्यवादी क्रांतीचे मूलभूत समीकरणे आपल्या पुस्तकातून मांडण्याचा प्रयत्न केला आहे. 'भारतीय इतिहास लेखनासंदर्भात असे म्हटले जाते की, गड्याचा इतिहास मालकाने लिहिला आहे आणि साहजिकच तो त्याच्या सोयीप्रमाणेच असणार. भारतीय जातव्यवस्थेची/ तिच्या अमानुषतेची चर्चा बऱ्यापैकी झालेली आहे. मात्र जगभरात जशी अनेक ठीकाणी गुलामी होती तशीच भारतातही सुखनैव नांदत होती याची फारशी कोणाला माहिती नाही. जगभरातल्या गुलामी संदर्भात उच्छवास टाकणारांची आपल्याकडे संख्या कमी नाही. यात जसे सर्वसाधारण अभ्यासक आहेत तसेच महामहो पा. वा. काणे यांच्यासारखे नावाजलेले अभ्यासकही आहेत. कॉ. शरद पाटील यांनी भारतीय गुलाम प्रथेचा शोध घेऊन गुलामाना किती अमानुष वागणूक दिली जात असे याचीही मांडणी केली आहे. भारताच्या सर्व भागात ही प्रथा विखुरलेली तर होतीच मात्र गुलामांची खरेदी विक्रीही मोठ्या प्रमाणात होत होती याचे अनेक दाखले त्यांनी दिले आहेत. कॉ.पाटील यांना या प्रथेचा शोध घेत असताना एक फार महत्त्वपूर्ण धागा भेटला तो डॉ. देवराज चानना यांच्या संशोधनाचा. अधिक तपशीलात जात त्यांनी या प्रथेचा शोध घेताना चानना यांचे मनपूर्वक ऋण मान्य करत

भारतीय दासप्रथेचा उगम तिच्या विकासापासून सामंतप्रथेने तिची जागा घेईपर्यंतचा वेध दासक्षूद्राची गुलामगिरी या ग्रंथाच्या दोन खंडामध्ये घेतला आहे.

कॉ.पाटलांनी दासक्षुद्राची गुलामगिरी या ग्रंथातून गुलामगिरी या प्रथेची अमानुषता जशी केंद्रस्थानी आणली आगदी त्याचप्रमाणे भारतीय समाजातील आद्य मातृसत्तेला, स्त्रीसत्तेला आणि तिच्या शोषनाच्या प्रारंभबिंदुलाही उजागर करण्याचे काम केले आहे ज्यातून अब्राह्मणी स्त्रीवादाची पहिल्यांदाच उभारणी झालेली आहे. या सगळ्या मांडणीसाठी त्यांनी बहुप्रवाही अन्वेषणपद्धतीचा वापर केला आहे. गणदासप्रथाक व शुद्रदासप्रथाकतेचा शोध घेण्यासठी माफुआ आणि सौत्रांतिक मार्क्सवाद अन्वेषणपद्धतीचा त्यांनी अवलंब केला त्यातून त्यांनी आपल्या नव्याच तत्त्वज्ञानाची उभारणी केली.

भारतीय विचारपरंपरेतील ब्राह्मणी व अब्राह्मणी या पारंपरिक संघर्षाचे भान ठेवून शरद पाटील यांनी येथील जातीव्यवस्थेचा शोध घेतला आहे. 'प्राचीन काळापासूनच्या इतिहासाचे परिशीलन करत येथील जातीव्यवस्था ही उत्पादन संबंधाच्या विकसनातील एक महत्त्वाचा टप्पा होता.आद्य भारतीय समाज हा स्त्रीसत्तावादी होता या स्त्रीसत्तेच्या पोटी आद्य द्वैवर्ण्यव्यवस्था मातृ व्यवस्थेवर उभी असलेली त्रेवर्णव्यवस्था पितृवंशकतेच्यापोटी चातुर्वर्ण्यव्यवस्था व या वर्ण-व्यवस्थेतूनच पुढे जातीव्यवस्था अशा क्रमाने भारतातील वर्णजाति व्यवस्थेचा विकास झाला.' असे कॉ. पाटील सांगतात. भारतीय जातिव्यवस्थेचा विचार बुद्धापासून डॉ. बाबासाहेबा पर्यंत अनेक महापुरुषांनी केला आहे. त्याचे ऋणही पाटील मान्य करतात त्याचबरोबर ते मार्क्सवाद्यांना व डॉ.बाबासाहेब आंबेडकरानाही प्रश्नांकित करतात. मार्क्सवाद्यानी जातीला वरच्या इम्ल्यात टाकल्यामुळे अभौतिक मानसिक जात सामाजाक्रांतीने नष्ट करायचा प्रश्न त्यांच्यापुढे अजून तरी उभा राहिलेला नाही.त्यामुळे त्यांनी जातीचा उगम व विकास शोधला नाहीं.तर आंबेडकरवाद्यांनी जात जरी भौतिक मानली,तरी तिच्या संशोधनासाठी मार्क्सची अन्वेषणपद्धत नकारात्मकरित्या पर्याय उभा न करता, नाकारण्याने जातीची व्यवस्था 'जी जात नाही ती जात' अशी ते अभौतिक करत राहिले.'जातीचे गतीनियम शोधून काढल्याशिवाय तिचा अंत कसा होणार? अशी टीका ते मार्क्सवाद्यावर व आंबेडकरवाद्यावर करतात. मात्र टीका करत

असताना नवा पर्यायही द्यावा लागत असतो. कृतिशीलतेच्या पातळीवरील ते पर्याय देताना दिसत नाहीत.उलट `जातीव्यवस्थेचे उच्चाटन' या ग्रंथात डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी कृतिशीलतेच्या पातळीवर असा पर्याय दिलेला आहे. धर्माने जातीव्यवस्थेचे खोलवर संस्थीकरण केलेले असल्यामुळे या धर्माविरोधात प्रबोधन केल्याशिवाय जातिअंतासाठी लोकमानस तयार होणार नाही. भारतात जात-वर्ग समाज असल्याने शोषण-शासनाची संस्थादुहेरी आहे. जात्यान्तक भांडवलदारी लोकशाही क्रांती करताना आधी निमसामंती सरंजामी जातीवावस्था नाहीसी करावी लागेल; पण भांडवलदारी वर्गव्यवस्था राहील. ती समाजवादी क्रांतीत नष्ट करावी लागेल. पण प्रक्रिया अशी सरळ नाही. जातीव्यवस्था उलटू नये, म्हणून दलित चळवळीची, मंडल आयोगाची मागणी जमिनीच्या राष्ट्रीयीकरणाची आहे. जमिनीचे राष्ट्रीयकरण हा समाजवादी क्रांतीचा भाग आहे. पण भारतात तो भांडवलदारी लोकशाही क्रांतीतच येतो. म्हणजे भारतीय क्रांती प्रक्रियेत समाजवादी क्रांतीची ठोस हमी दिल्याशिवाय भांडवलदारी लोकशाही क्रांती पुरी होऊ शकत नाही आणि क्रांतीच्या पूर्तीसाठी डाव्यांनी आणि आंबेडकरवाद्यांनी एकत्र येण्याची आवशयकता ते प्रतिपादन करतात. आंबेडकर वाद्यांनी क्रांतीच्या रथाला हाथ दिल्याशिवाय ते गतिमान होणार नाही असे डॉ.आनंद तेलतुंबडे यानाही वाटते. स्वतंत्र मजूर पार्टी स्थापन करण्यापाठीमागे बाबासाहेबांचीही यापेक्षा वेगळी भूमिका नव्हती. एकूणच सर्वहारा वर्गाने सर्वपातळ्यावर एकत्रित आले तर जात्यांत सहज शक्य आहे. मात्र जिथे सर्वहारा तत्त्वज्ञानाच्या समन्वयालाही तीव्र विरोध होतो तिथे प्रत्यक्ष सर्वहारा लोकांची एकजूट करणे किती आव्हानात्मक असेल हे लक्षात यावे. त्यासठी पुन्हा एकदा बाबासाहेबां सारख्या महान तत्त्वज्ञ नेतृत्वाची तातडीची गरज आहे.

भारतामध्ये साधारणतःसत्तरच्या दशकानंतर स्त्रीवादाचा विचारप्रवाह जोरकसपणे पुढे आला. मात्र याच्याही केंद्रस्थानी ब्राह्मणी स्त्रीच राहात आली. पर्यायी अशा स्त्रीवादाची मांडणीचे श्रेय मार्क्सवाद-फुले-आंबेडकरवाद या नवीन तत्त्वज्ञानाला जाते. ज्याची मांडणी कॉ.शरद पाटील यांनी केलेली आहे. या अब्राहाम्णी स्त्रीवादाने स्त्रीमुक्ती चळवळीस अधिक शास्त्रीय पाया उपलब्ध करुन दिला. ब्राह्मणी-अ ब्राह्मणी या संकल्पनांचा यात समाजशास्त्रीय वापर केला गेला. ब्राह्मणी या संकल्पनेचा अर्थ स्थूलमानाने जातवर्गस्त्रीदास्याचे समर्थन करणारा प्रवाह, तर अब्राह्मणी

म्हणजे जातवर्ग स्त्रीदास्यान्तक प्रवाह होय. भारतासारख्या देशात शोषण शासनाची प्रमुख संस्था म्हणून जातीव्यवस्था आहे. रामायण-महाभारत काळात उदयाला आलेली पुरुष सत्ता, बुद्धोत्तर काळात उदयाला आलेली जातीव्यवस्था आणि ब्रिटीश काळात उदयाला निर्माण झालेली वर्गव्यवस्था यांच्या एकत्रित गुंफण व गुंतागुंत यातून शोषण होते. अशी महत्त्वपूर्ण मांडणी अब्राह्मणी स्त्रीवादाच्या माध्यमातून पाटलांनी केली. रामायण-महाभारताचाही नवाच अन्वयार्थ त्यांनी लावलेला आहे आणि तो केवळ अदभूत असाच आहे. इतिहासाला डोक्यावर नव्हे तर पायावर उभे करू त्यांनी अन्वेषण केले त्यातून निरुती, दुर्गा, द्रोपदी, सीता, मंदोदरी, अहल्या शूर्पणखा, हिडींबा, उषा सारख्या कर्तुत्ववान नायिका उजेडात आणण्याचे ऐतिहासिक काम केले ज्याना ब्राह्मणी इतिहासकारांनी बदनाम केले होते. मुळात भारताचा इतिहास स्त्रीसत्तेपासूनच सुरु होतो. या सगळ्या स्त्री शौर्याच्या इतिहासाचे पुर्नलेखन तर त्यांनी केलेच त्याचबरोबर स्त्रियाच या देशात क्रांती आणू शकतील असे ठाम प्रतिपादनही केले. पर्यायी सांस्कृतिक लढ्यासाठी त्यांचे हे योगदान फार महत्तवपूर्ण आहे. याचबरोबर कॉ.शरद पाटलांचे आणखी एक म्हत्वाचे योगदान म्हणजे त्यांनी निर्माण केलेले अब्राह्मणी साहित्याचे स्वतंत्र सौन्दर्यशास्त्र. भारतीय परिप्रेक्षात विचार करू अल्पसंख्याकाचे बहुसंख्याकावर सर्व प्रकारचे वर्चस्व राहात आलेला आहे. अगदी खानपाणापासून लेण्यानेसण्यापर्यंत.'सौंदर्य कल्पना उलट्या बाजूने अल्पसंख्याकाकडून विशाल समाजावर लादल्या जातात. 'कॉ. पाटलांनी मांडलेल्या अब्राहाम्णी साहित्याच्या सौंदर्यशास्त्रामुळे अभिजन साहित्याशास्त्रातील बनावटगिरी, कंपूशाहीपासून ते शोषणपूरक साहित्यमूल्य उघड करता येऊ शकली आहेत. 'असे जे मिलिंद दुसाने यांनी नोंदवलेले आहे ते खरेच आहे.शोषितांची लढाई लढत असताना केवळ एक पातळीवर लढून चालत नसते तर तिला अनेक पदर असतात या सगळ्या गोष्टीचे भान कॉ. पाटील यांना असल्यामुळे ते सतत दक्ष राहिलेले दिसतात.

कॉ.शरद पाटील यांच्या विचार लेखनाचा विचार करता त्यांनी त्यांनी एकूण विचार विश्वाला चार प्रमुख देणग्या दिलेल्या आहेत.त्या अशा....

१) नवी अन्वेषण पद्धती(बहुप्रवाही ऐतिहासिक भौतिकवाद)

२) नवे सौंदर्यशास्त्र (समाजवादी भौतिकवाद)

३) नवे तत्त्वज्ञान (सौत्रान्तिक मार्क्सवाद)

४) जाणीव-नेणिवान्वेषी तर्कशास्त्र.

डॉ.रावसाहेब कसबे यांनी त्यांच्या या नवतत्त्वज्ञाना संदर्भात प्रतिक्रिया नोंदवताना म्हटले आहे की, कॉ. शरद पाटील यांनी आतपर्यंत लिहिलेले चार खंड हे त्यांनी जागतिक विचारविश्वाला दिलेली अमूल्य देणगी आहे. परंतु तरीही ते वादातीत नाहीत किंवा तो अखेरचा शब्द नाही. 'तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रात अखेरचे असे काही नसते. कॉ.शरद पाटील यांनीही वाद चर्चेचे नेहमीच बाहू पसरून स्वागत केले. मात्र अनेकांनी मौन धारण करणेच पसंत केले. त्यांच्या साहित्याचे अभ्यासक रवींद्र घोडराज यांनी यासंदर्भात खंत व्यक्त करताना म्हटले आहे.' समर्पित जीवन जगत असताना समाजक्रांतीच्या प्रबोधनाचे शस्त्रागार तयार करण्यासाठी त्यांनी केलेली अन्वेषणपद्धती, तत्त्वज्ञान, सौंदर्यशास्त्र व नव्या तर्कशास्त्राची मांडणी साहित्य विश्वामध्ये अजरामर ठरणारी आहे.,असे असूनही अभिजन वर्गाने त्याकडे पाठ फिरवली, तर ग्रंथ समजायला कठीण म्हणून बुद्धीवाद्यानीही दुर्लक्ष केले.'कॉ.पाटील यांच्यावर हा अन्याय ठरवून केलेला अन्याय आहे असे म्हणायला पुरेशी जागा आहे. मात्र असे अन्याय केवळ एका व्यक्तीवरील अन्याय नसतात तर एकूणच परिवर्तनासाठी आसुसलेल्या सर्वांवर केलेला तो अन्याय ठरत असतो. हे सर्व मान्य करूनही एक गोष्ट नोंदवणे आवश्यक आहे आणि ते म्हणजे शोषिताच्या मुक्तीच्या तत्त्वज्ञानाची भाषा इतक्या काठीण्य पातळीची असावी का?

## :: संदर्भसूची ::


१) आंबेडकर भीमराव, शूद्र पूर्वी कोण होते, क्षितिज पब्लिकेशन्स, नागपूर, ति. आ. २००१

२) ऑम्वेट गेल, भारतातील बौद्ध धम्म ब्राह्मणी धर्म आणि जातीयतेला आव्हान, सेज पब्लिकेशन्स, नवी दिल्ली, २०१६.

३) ओक आलोक, काम्यू आल्बेर नव्या क्षितिजाचा शोध, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, प्र.आ.फेब्रुवारी २०१९.

४) कविमंडन भा.ज(अनु,/संपा.,)रसेलचे निवडक लेख, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, ति. आ. २०१२.

५) कसबे रावसाहेब, भक्ति आणि धम्म, लोकवाङ्मय गृह, मुंबई, प्र. आ. जानेवारी २०१६.

६) कसबे रावसाहेब, आंबेडकरवाद तत्त्व आणि व्यवहार, सुगावा प्रकाशन, पुणे, दु. आ. २००४.

७) कसबे रावसाहेब, मानव आणि धर्मचिंतन, सुगावा प्रकाशन, पुणे, दु. आ. डिसेंबर २००८.

८) कसबे रावसाहेब, धर्मग्रंथ आणि मानवी जीवन प्रवाह, सुगावा प्रकाशन, पुणे, नोव्हेंबर,२००८ .

९) कर्वे ईरावती,युगांत, देशमुख आणि कं., पुणे, आठवी आवृत्ती, १९९२.

१०) कांचा अइलैय्या, हिंदुत्त्व-मुक्त भारत, सेज पब्लिकेशन, नवी दिल्ली, प्र. आ. २०१७.

११) कुरुंदकर नरहर, व्यासाचे शिल्प, देशमुख आणि कं., पुणे, तिसरी आ., ९ ऑगस्ट २०१८.

१२) काळसेकर सतीश, वाचाणाराची रोजनिशी, लोकवाङ्मय गृह, मुंबई, दु. आ. जुलै, २०१३.

१३) कोसंबी दामोदर, (अनु.तुळपुळे वसंत) पुराणकथा आणि वास्तवता, लोकवाङ्मय गृह, मुंबई, सहावी आवृत्ती-२०१४

१४) कोसम्बी राहुल, उभं-आडवं, शब्द पब्लिकेशन्स, बोरीवली, तिसरी आ. २०१७.

१५) गाडगीळ, स. रा. लोकायत, लोकवाङ्मय गृह, मुंबई, चौथी आवृत्ती, जाने.२००८.

१६) गडकरी जयंत, मार्क्सने सांगितलेला मार्क्सवाद आणि जागतिकीकरण, सुगावा प्रकाशन, पुणे, प्र.आ., मार्च २००८

१७) गायकवाड जयदेव,जातीभेदाचे अंत:प्रवाह, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, प्र. आ. ऑगस्ट, २०१५.

१८) गोडबोले अच्युत / कहाते अतुल, स्पारटाकस ते ओबामा, मनोविकास प्रकाशन, पुणे, सातवी आवृत्ती, डिसेंबर-२०१५

१९) चव्हाण दिलीप, जातिअंताच्या दिशा, हरिती पब्लिकेशन्स, माण जि. पुणे, दु. आ. ६ डिसे.२०१९.

२०) चव्हाण रमेश, क्रांतिकारी सत्यशांधक कॉम्रेड शरद पाटील, हर्मिस प्रकाशन, पुणे., प्र. आ. एप्रिल २०१५.

२१) तेलतुंबडे आनंद, साम्राज्यवाद आणि जात, सुगावा प्रकाशन, पुणे, प्र. आ. मार्च, २००९.

२२) तेलतुंबडे आनंद,साम्राज्यवाद आणि जातिविनश, सुगावा प्रकाशन, पुणे, प्र. आ. नोव्हे. २००७.

२३) तेलतुंबडे आनंद, बुद्धविचार : मार्क्सवादी दृष्टीक्षेप, लोकवाङ्मय गृह, मुंबई, चौथी आवृत्ती, डिसे.२०११.

२४) नागोरी एस.एल. / नागोरी कांता, सब्लाईम प्रकाशन, जयपूर, प्रथम संस्करण, २००५

२५) पाटील शरद, अब्राह्मणी साहित्याचे सौंदर्यशास्त्र, सुगावा प्रकाशन, प्र.आ., जुलै १९८८.

२६) पाटील शरद, जातिव्यवस्थाक सामंती सेवकत्व, मावळाई प्रकाशन, शिरूर, पुणे, दु. आ., १७ सप्टे. २०१७.

२७) पाटील शरद, भारतीय प्रिमीटिव्ह कम्युनिझम, मातृसत्ता-स्त्रीसत्ता आणि भारतीय समाजवाद, मावळाई प्रकाशन, शिरूर, प्र. आ. २०१२.

२८) पाटील शरद,भारतीय तत्त्वज्ञान व नास्तिक मत, लोकसाहित्य प्रकाशन,औरंगाबाद, प्र. आ. २०१३.

२९) पाटील शरद, जात्यान्तक भांडवलदारी लोकशाही क्रांती व तिची समाजवादी पूर्ती, सुगावा प्रकाशन, पुणे, प्र. आ. २००३

३०) पाटील शरद, रामायण महाभारतातील वर्ण संघर्ष, मावळाई प्रकाशन, शिरूर, ति. आ. २०१४.

३१) पाटील शरद, दास शूद्राची गुलामगिरी, मावळाई प्रकाशन, शिरूर, दु. आ. २००८.

३२) पाटील विश्वास,(अनु.) नित्से फ्रेडरिक जीवन आणि तत्त्वज्ञान, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, प्र. आ. जून २०१४.

३३) पानसरे गोविंद, मार्क्सवादाची तोंडओळख, श्रमिक प्रतिष्ठान, कोल्हापूर, पुनर्मुद्रण, मार्च २०१५.

३४) फ्राईड सिग्मंड, मनोविश्लेषण परिचय, पब्लिकेशन्स, कोल्हापूर, आवृत्ती, ऑगस्ट २०१६.

३५) बेडेकर दि. के., विचारयात्रा, लोकवाङ्मय गृह, मुंबई, दु. आ. जुलै, २०१३, दु. आ. मे २०१४.

३६) भगतसिंग, मी नास्तिक का आहे, लोकवाङ्मय गृह, मुंबई, एकोणीसावी आ., डिसे. २०१६.

३७) भोळे भा. ल., समाजविमर्ष, लोकवाङ्मय गृह, मुंबई, प्र. आ. डिसें. २०१०, दु. आ. डिसे. १९९६.

३८) मनोहर यशवंत, साहित्याचे इहवादी सौंदर्यशास्त्र, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, प्र. आ. १४ एप्रिल २०१९.

३९) मनोहर यशवंत, परिवर्तनाचे पडघम, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, प्र. आ., जाने. २०१६.

४०) माथुर कमलेश, संस्कृती के संदर्भ, अविष्कार पब्लिकेशन, जयपूर, प्रथम संस्करण, २००५.

४१) माळी सचिन,एकाकी आणि लोकाकी प्रज्ञासूर्य कॉ.शरद पाटील, सुगावा प्रकाशन, पुणे, प्र. आ. २०१४.

४२) माळी सचिन, जातिअंतक सांस्कृतिक क्रांतीचे आत्मभान, लोकवाङ्मय गृह, मुंबई, चौथी आवृत्ती, एप्रिल, २०१८.

४३) मार्क्स/एगल्स/लेनिन, कम्युनिस्ट समाज, लोकवाङ्मय गृह, मुंबई,१९८७.

४४) मंडेला नेल्सन, संवाद स्वतःशी, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, प्र. आ., २०१६.

४५) रणसुभे विलास (संपा.) जात, वर्ग व परिवर्तनाचा लढा, लोकवाङ्मय गृह, मुंबई, ति. आ. जाने-२०१४

४६) लेनिन (अनु,दि. व. फडणीस) समाजवादी सिद्धांत आणि संस्कृती, लोकवाङ्मय गृह,मुंबई, दु. आ. एप्रिल २०१४

४७) सरदेसाई एस. जी., भारतीय तत्त्वज्ञान : वैचारिक आणि सामाजिक संघर्ष, लोकवाङ्मय गृह, मुंबई, सातवी आवृत्ती-२०१४

४८) साळुंखे आ. ह. सर्वोत्तम भूमीपुत्र : गौतम बुद्ध, लोकायत प्रकाशन, सातारा, बारावे पुनर्मुद्रण, एप्रिल २०१९.